MGM UNIVERSITY
CHHATRAPATI SAMBHAJINAGAR
Join a Holistic Education System
ADMISSIONS OPEN 2024-25
Apply Now
www.mgmu.ac.in 9067612000

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, १२ सप्टेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक १७१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मुख्यमंत्री पोहोचले लाडक्या बहिणींच्या घरी; कुटुंब भेट अभियानाचा शुभारंभ!

## आठवडाभरात एक कोटी घरांपर्यंत पोहोचवण्याचे शिवसेनेचे लक्ष्य; युवा सेनेवर या महत्वकांक्षी जनसंपर्क अभियानाची जबाबदारी

ठाणे : शिवसेनेने जाहीर केलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण कुटुंब भेट' अभियानाचा आज मंगळवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात शुभारंभ केला. ठाण्यातील किसन नगर, जय भवानी नगरमधील लाभार्थी कुटुंबाच्या घरी जाऊन मुख्यमंत्र्यांनी लाडक्या बहिणीशी संवाद साधला. यावेळी इतर शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ मिळतोय का, याची विचारपूस केली. शिवसेनेने राज्यातील दोन कोटी घरांपर्यंत पोहोचण्याचे हे महत्वकांक्षी जनसंपर्क अभियान तयार केले असून त्याची जबाबदारी युवा सेनेवर सोपवण्यात आली आहे.



ठाण्यातील कोपरी-पाचपाखाडी मतदार संघातील १५ कुटुंबियांची मुख्यमंत्र्यांनी भेट घेतली. या अभियानातून शिवसेनेचे मंत्री, आमदार, खासदार, लोकप्रतिनिधी आणि युवा सेनेचे कार्यकर्ते आठवडाभरात एक कोटी घरांपर्यंत पोहोचतील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, योजना आदेश देऊन नाही तर प्रत्यक्ष रस्त्यावर उतरुन लोकांच्या घराघरांत जाऊन त्याचे महत्व पटवून देण्यासाठी हे अभियान सुरु करण्यात आले आहे. योजनेची घोषणा होऊन महिनाभरात त्याला लाभ मिळणे हे आतापर्यंत इतिहासात कधी घडले नव्हते, असे मुख्यमंत्री म्हणाले. शासन आपल्या दारी योजनेत ५ कोटींहून अधिक नागरिकांना लाभ झाला होता. तशाच प्रकारे सरकारच्या योजनांचा सर्वांना लाभ मिळावा, यासाठी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण कुटुंब भेट' अभियान राबवले जाईल, असे ते म्हणाले.

या अभियानात मुख्य नेत्यांपासून कार्यकर्त्यांपर्यंत जवळजवळ एक लाख पदाधिकारी, कार्यकर्ते हे पुढील दोन आठवडे घरोघरी जाऊन संवाद साधणार आहेत. या अभिनायातील नोंदी ठेवण्यासाठी ॲप तयार करण्यात आले आहे. त्यातून लाभार्थींच्या अचडणी सोडण्याचा प्रयत्न असेल असे युवा सेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांनी सांगितले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण कुटुंब भेट अभियानाअंतर्गत किसन नगर २ मधील रेशमा भास्कर पांडव, अर्चना पाटील, राधा रावत या बहिणींच्या घरी मुख्यमंत्री पोहोचले. यावेळी त्यांनी कुटुंबातील सदस्यांना सरकारी योजनांबाबत माहिती दिली. जय भवानी नगरमधील शीतल कालेकर सुनंदा कालगुडे, सीमा लाटणेकर, स्वाती घाडगे यांच्या घरी जाऊन मुख्यमंत्र्यांनी संवाद साधला. सगळ्या महिला कमवत नाहीत त्यामुळे लाडकी बहिण योजनेमुळे गरजू महिलांना आर्थिक मदत होते. उशिरा अर्ज करुन देखील पैसे मिळाल्याबद्दल शीतल कालेकर यांनी शासनाचे आभार मानले. मुख्यमंत्री स्वत: घरी आले आणि विचारपूस केली खूप आनंद झाला, अशी भावना स्वाती घाडगे यांनी व्यक्त केली.

# पुणे महापालिकेच्या वतीने शाळा स्तरावर कचरा मुक्त शाळा उपक्रम

पुणे : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच कचरा व्यवस्थापनाची सवय लागावी तसेच त्यांच्यामध्ये कचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती व्हावी व महापालिकेच्या शाळा कचरामुक्त करण्यासाठी महापालिकेच्या वतीने शाळा स्तरावर कचरा मुक्त शाळा (झिरो वेस्ट शाळा) हा उपक्रम राबविणे तसेच पुणे जिल्ह्यातील २० शिक्षकांचे पिंपरी चिंचवड महापालिकेत वर्गीकरण करणे या विषयांसह विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या बैठकीत मान्यता दिली.

महापालिका सभा आणि स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक असलेले विविध विषय आज प्रशासक सिंह यांच्या मान्यतेसाठी विशेष बैठकीमध्ये ठेवण्यात आले होते. पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये पार पडलेल्या बैठकीमध्ये प्रशासक सिंह यांनी विविध विषयांना मंजुरी दिली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील,



विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त तथा नगरसचिव चंद्रकांत इंदलकर यांच्यासह विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.

महापालिकेच्या वतीने शहरात स्वच्छ पिंपरी चिंचवड शहर अभियान राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अभियानाचा भाग म्हणून महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत शाळांमध्ये झिरो वेस्ट शाळा हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये कचरा व्यवस्थापनाबाबत जागृती करून त्यांच्यात लहानपणापासूनच कचरा व्यवस्थापनाची कौशल्य विकसित करण्यास मदत होणार आहे. महापालिकेच्या शाळांमध्ये तीन महिन्यामध्ये एकूण ४ टप्प्यांमध्ये हा उपक्रम राबविण्यात येणार असून त्यासाठी शाळांना निधी देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे. एकूण ९७ शाळा या उपक्रमाअंतर्गत कचरामुक्त करण्यात येणार आहेत. त्यानुषंगाने आज हा विषय विशेष बैठकीमध्ये ठेवण्यात आला होता,त्यास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली. जिल्हा परिषदपुणे यांच्याकडील २० शिक्षकांची सेवा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे वर्ग करण्याबाबतच्या विषयाला देखील प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली आहे.राज्य शासनाच्या नगर विकास विभाग आणि ग्रामविकास विभाग यांच्या निर्णयानुसार विहित तरतुदी, न्यायालयीन प्रकरणे व इतर सर्व प्रचलित नियम या सर्व बाबींचे पालन करून वर्गीकरणाची प्रक्रिया राबविण्यात आली आहे.

# शिक्षक भरतीचा मार्ग मोकळा; टीईटी परीक्षेची तारीख जाहीर

## जाहिरात प्रसिद्ध झाल्यामुळे यंदाच्या शिक्षक भरतीचा मार्ग मोकळा

मुंबई : शिक्षक भरतीचा मार्ग मोकळा झालाय.. शिक्षक भरतीसाठी घेण्यात येणारी टीईटी महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा १० नोव्हेंबर रोजी घेण्यात येणार आहे. यावेळी या परीक्षेची जबाबदारी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेवर सोपवण्यात आली आहे.

टीईटी परीक्षेमध्ये गैरप्रकार झाल्याचं प्रकरण गेल्या वर्षी उघडकीस आलं होतं. त्या पार्श्वभूमीवर टीईटी २०२४ चा काय होणार याबद्दल साशंकता होती. मात्र आता जाहिरात प्रसिद्ध झाल्यामुळे यंदाच्या शिक्षक भरतीचा मार्ग मोकळा झालाय... राज्य परीक्षा परिषदेच्या वेबसाईटवर ऑनलाइन अर्ज भरण्याच्या सुविधेसह परीक्षेबाबतचा संपूर्ण तपशील उपलब्ध आहे.

राज्यात शिक्षकांची २४ हजार पदं भरण्यात येणार आहेत. तशी घोषणाही झालीय. मात्र शिक्षक भरतीची प्रक्रिया रखडलीय. त्याविरोधात राज्यातील डीएड, बीएडधारक उमेदवारांनी पुण्यात बेमुदत उपोषण केले होते. शिक्षक भरतीसाठी आवश्यक असलेली बिंदू नामावलीची प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. त्यासाठी शिक्षण विभाग जबाबदार असल्याचं उमेदवारांचं म्हणणं आहे. या पार्श्वभूमीवर येत्या लोकसभा निवडणुकीपूर्वी शिक्षक भरतीची प्रक्रिया पूर्ण करण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली होती.

लिपिक पदासाठीची जाचक अट अखेर रद्द

मुंबई महानगरपालिकेत लिपिक पदासाठी भरती सुरु आहे. मात्र या लिपिक पदासाठी असलेली जाचक अट अखेर रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे नव्याने भरती प्रक्रिया सुरु होणार आहे... लिपिक पदासाठी १ हजार ८४६ जागा सरळसेवेने भरण्यासाठीची प्रक्रिया सुरु करण्यात आली होती. या जागांसाठी दहावी तसंच पदवी परीक्षेत पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण असावा अशी शैक्षणिक अट लागू करण्यात आली होती. मात्र यावरुन मोठा वाद झाला. ही अट रद्द करण्याची मागणी करण्यात आली. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेने अखेर ही अट रद्द केली आहे.

# दुचाकी अपघातात दोघे गंभीर;- सोयगाव तहसील समोरील घटना

सोयगाव,दि.११(प्रतिनिधी) : सोयगाव तहसील समोर दोन दुचाकी समोरासमोर आदळून दोन गंभीर जखमी झाल्याची घटना मंगळवारी आठवडे बाजार च्या दिवशी सोयगाव तहसील कार्यालयासमोर दुपारी चार वाजता घडली घटनेची माहिती मिळताच सोयगाव पोलीसांनी घटनास्थळी धाव घेत दोंघे जखमीना ग्रामीण रुग्णालयात तातडीने उपचारासाठी दाखल केले. इम्रान तडवी वय.३० रा निंबायती व शेणफडू दंडे वय ४५ रा जवळा हे दोघे ही दुचाकी क्र-एम.एच.१९ ३४६० व एम.एच.-१९ डब्लू-८२५७ सोयगाव तहसील कार्यालयात जात असताना दोघीही दुचाकी एकमेकांवर आदळून झालेल्या अपघातात दोघे गंभीर जखमी झाले दरम्यान सोयगाव ग्रामीण रुग्णालयात त्यांना तातडीने उपचार करून जळगाव च्या सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.जमादार राजू बर्डे,रवींद्र तायडे,अजय कोळी आदींनी जखमींना सोयगाव ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते.

# इस्त्रायलमध्ये कामगारांचा तुटवडा, महाराष्ट्रातून १० हजार कामगार पाठवणार; मिळणार विमा, घर आणि पगार

नवी दिल्ली : हमाससोबत सुरू असलेल्या युद्धादरम्यान पायाभूत सुविधा आणि आरोग्य सेवेतील कौशल्याची कमतरता दूर करण्यासाठी इस्त्रायल भारतातून १०,००० बांधकाम कामगार आणि ५,००० काळजीवाहकांची नियुक्ती करणार आहे. पायाभूत सुविधा आणि आरोग्य क्षेत्रात नोकरी शोधणाऱ्यांना नोकऱ्या देण्यासाठी इस्त्रायलने भारताशी संपर्क साधला आहे. इस्त्रायलला १० हजार बांधकाम कामगार आणि ५ हजार आरोग्य सेवा कामगारांची गरज आहे. येत्या आठवड्यात इस्त्रायली कंपन्यांचे पथक भारताला भेट देणार असल्याची शक्यता आहे.

बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या भरती मोहिमेची दुसरी फेरी महाराष्ट्रात आयोजित केली जाणार आहे. इस्त्रायलमध्ये सध्या कामगारांचा प्रचंड तुटवडा आहे. काही क्षेत्रात त्यांना कामगारांची प्रचंड आवश्यकता आहे. ज्यामध्ये फ्रेमवर्क, लोखंडी वेल्डिंग, प्लॅस्टिकिंग आणि सिरॅमिक टाइलिंगचे काम करणाऱ्यांची मागणी करण्यात आली आहे. येत्या काही दिवसांत इस्त्रायली कंपन्या भारताला भेट देतील आणि त्यांच्या निकषांवर आणि कौशल्यांवर आधारित कुशल कामगारांची निवड केली जाईल. याशिवाय आरोग्य विभागातील कामगारांचीही इस्त्रायलला गरज आहे. यासाठी पाच हजार कामगारांची मागणी करण्यात आली आहे. ज्या लोकांनी किमान १० वी पूर्ण केली आहे किंवा एखाद्या मान्यताप्राप्त भारतीय संस्थेने जारी केलेलं प्रमाणपत्र किंवा किमान ९९० तासांच्या नोकरीच्या प्रशिक्षणासह नर्सिंग कोर्स पूर्ण केला आहे असे उमेदवार यासाठी अर्ज करू शकतात.

मिळणार या सुविधा

इस्त्रायलसाठी निवड झालेल्या उमेदवारांना वैद्यकिय विमा, राहण्याची आणि खाण्याची सुविधा, आणि १.९२ लाख रुपयांपर्यंत महिना पगार दिला जाणार असल्याची माहिती इस्त्रालय सीमा प्राधिकरणाने दिली आहे. याशिवाय निवड झालेल्या उमेदवारांना दर महिना १६,५१५ रुपयांचा बोनसही दिला जाणार आहे. इस्त्रायलमध्ये बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या भरतीच्या पहिल्या फेरीत एकूण १६८३२ उमेदवारांनी चाचणी दिली होती. त्यापैकी १०३४९ उमेदवारांची निवड करण्यात आली होती.

भरतीच्या पहिल्या फेरीत उत्तर प्रदेश, हरियाणआ आणि तेलंगणा राज्यातील कामगारांचा समावेश होता. नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ने नोव्हेंबर २०२३ मध्ये सरकारबरोबर करारावर स्वाक्षरी केल्यानंतर कामगारांची भरती करण्यासाठी भारतातील राज्यांशी संपर्क साधला होता.

इस्त्रायली संस्कृतीशी ओळख

इस्त्रायलसाठी निवड झालेल्या उमेदवारांना तिथे जाण्याआधी प्रशिक्षण दिलं जाणार आहे. यात इस्त्रायली संस्कृती, तिथली जीवन शैली यांची ओळख करुन दिली जाणार आहे. तसंच नव्या घरात राहाण्यासाठी नियमांचही पालन करावं लागणार आहे.

# सोलापुरातील कॉन्ट्रॅक्टर करणार काम बंद आंदोलन!

सोलापूर : ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील जल जीवन मिशनच्या कामांची बिले येत्या आठ दिवसांत न मिळाल्यास २० सप्टेंबर पासून बेमुदत काम बंद आंदोलन करण्याचा इशारा ग्रामीण पाणीपुरवठा कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे अध्यक्ष मोतीलाल राठोड यांनी दिला आहे.संघटनेची बैठक होऊन हा सामूहिक रित्या निर्णय घेण्यात आला आहे.



सोलापूर जिल्ह्यात एक हजार पाणी पुरवठ्याची कामे सुरू असून बिले मात्र वेळेवर येत नाहीत, येत्या आठ दिवसांत बिले न मिळाल्यास आणि आमच्या अडचणी सोडवल्या नाही तर २० सप्टेंबर पासून काम बंद आंदोलन करण्याचा इशारा राठोड यांनी दिला.मुदतवाढ देताना विना दंड मुदतवाढ द्या, जादा दाराच्या निविदांना प्रशासकीय मान्यता लवकरात लवकर द्या, जलजीवन मिशनच्या कामांना नैसर्गिक वाळू वापरा अशी अट असताना वाळू उपलब्ध होत नाही, कामे पूर्ण होऊनही सुरक्षा रक्कम अजूनही अदा करण्यात आली नाही अशा अनेक मागण्या संघटनेच्या आहेत.

# पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्या पुलाची दुरवस्था

पिशोर दि.११ ( प्रतिनिधी): कन्नड तालुक्यातील पिशोर येथून नादरपूर, जवखेडा खुर्द, जवखेडा बुद्रुक, सारोळा या गावांना जवळच्या अंतराने जोडणाऱ्या रस्त्याच्या कामाच्या भिजत घोंगड्याने या रस्त्याची अवस्था या भागातील रहिवाशांसाठी असून अडचण नसून खोळंबा अशी झाली आहे. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत एकूण १० किलोमीटर लांबीच्या या रस्त्याच्या कामाचा फेब्रुवारी २०२२ ला वाजत गाजत शुभारंभ झाला होता. फेब्रुवारी २०२३ पर्यंत रस्ता पूर्ण करून वापरण्यास उपलब्ध करून देण्याची मुदत ठेकेदाराला देण्यात आली होती. मुदतीचा एक वर्षाचा कालावधी संपून सदरील काम पूर्ण करण्याच्या कालावधी उलटून दीड वर्ष झाले तरी हे काम पूर्ण होऊ शकले नाही. यातच सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीला झालेल्या मुसळधार पावसाने या रस्त्याच्या मार्गात येणाऱ्या खडकी नदी व कवड्या नाल्यास मोठा पूर गेला होता. पुरामुळे दोन्ही पुलांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या रस्त्यावरून छत्रपती संभाजीनगर जाण्यासाठी वाहनांची मोठी वर्दळ सुरू होती मात्र पुराच्या पाण्याने कवड्या नाल्यावरील पुलाचा तीन चतुर्थांश भाग खचल्याने या रस्त्यावरून वाहनासह वाघूळखेडा वस्तीतील नागरिक व दुग्ध व्यावसायिकांना जीव मुठीत धरून ये जा करावी लागत आहे. अनेकांनी या धोकादायक पुलावरून जाण्याचे टाळून नादरपूरला मार्गे पिशोरला येण्यासाठी मोठा फेरा मारत आहे. शासनाने कोट्यावधी रूपये खर्च करून या रस्त्याचे काम सुरू केले. मात्र ठेकेदार कामाची मुदत संपून गेल्यावर सुद्धा आपल्या मर्जीने काम उरकत असल्याचा शेतकऱ्यांकडून आरोप करण्यात येत आहे. अर्धा महिना उलटून गेला तरी संबंधित ठेकेदाराकडून या दोन्ही पुलाच्या कामाची दुरुस्ती करण्यात आली नसल्याने शेतकरी व दुग्धव्यवसायिकाडून संताप व्यक्त केला जात आहे. अनेक वेळा रस्त्याच्या निकृष्ट कामा विषयी प्रसिद्धी माध्यमातून बातम्या झळकल्या परंतु ठेकेदार मात्र रस्त्याच्या कामात दूर लक्ष करीत आहे.या खचलेल्या पुलावरून पडून जीव



गेल्यावर ठेकेदार व प्रशासनास जाग येईल काय असा संतप्त सवाल या रस्त्यावरून वापरणाऱ्या शेतकऱ्यांकडून केला जात आहे.

# कुटुंबातील ७० वर्षांवरील वृद्धांसाठी केंद्र सरकारची मोठी घोषणा

नवी दिल्ली : भारतात आता ७० वर्षांवरील प्रत्येक वृद्ध व्यक्तीला आयुष्मान भारत (आरोग्य विमा योजना) अंतर्गत कव्हर मिळणार आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बुधवारी ही माहिती दिली. कॅबिनेट ब्रीफिंग दरम्यान त्यांनी सांगितले की, ७० वर्षांवरील वृद्ध व्यक्तींना ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार दिले जातील. याचा सहा कोटी ज्येष्ठ नागरिक आणि ४.५ कोटी कुटुंबांना फायदा होईल. या योजनेंत आधीच समाविष्ट असलेल्या कुटुंबांना त्यांच्या कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींसाठी ५ लाख रुपयांचे अतिरिक्त कव्हरेज दिले जाईल. केंद्रा सरकारच्या या निर्णयानंतर ७० वर्षे आणि त्याहून अधिक वयाचे सर्व ज्येष्ठ नागरिक, त्यांची सामाजिक-आर्थिक स्थिती विचारात न घेता, AB PM-JAY चे लाभ दिले जातील. पात्र ज्येष्ठ नागरिकांना AB PM-JAY अंतर्गत नवीन अद्वितीय कार्ड जारी केले जाईल. AB PM-JAY अंतर्गत आधीच समाविष्ट असलेल्या कुटुंबांतील ७० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना स्वतःसाठी वार्षिक ५ लाख रुपयांपर्यंतचे अतिरिक्त टॉप-अप कव्हर मिळेल. केंद्रीय मंत्रिमंडळात ६ मोठे निर्णय घेण्यात आले. आयुष्मान भारत अंतर्गत ७० किंवा त्याहून अधिक वय असलेल्या सर्व ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य कव्हरेज दिले जाईल. याव्यतिरिक्त, मंत्रिमंडळात आणखी पाच मोठे निर्णय घेण्यात आले. जलविद्युत प्रकल्पांसाठी पायाभूत सुविधा सक्षम करण्याच्या खर्चासाठी अर्थसंकल्पीय सहाय्य योजनेतील दुरुस्तीची मंजुरी देण्यात आली.

# ज्येष्ठा गौरींचे झाले मनोभावे पूजन, आज भावपूर्ण निरोप अन् विसर्जन

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : बुधवारी, ११ रोजी मांगल्यपूर्ण वातावरणात ज्येष्ठा-कनिष्ठा म्हणजे गौराईंचे माहेरी थाटामाटात यथासांगपणे मनोभावे पूजा करून महानैवेद्य दाखविण्यात आला. गुरुवारी, १२ रोजी भक्तिभावाने गौराईंना निरोप देवून विसर्जन करण्यात येईल.

भाद्रपद शुक्लषष्ठी मंगळवार, १० सप्टेंबर रोजी रात्री ०८.४ वा. पर्यंत अनुराधा नक्षत्रावर ज्येष्ठा गौरींचे आगमन होत झाले. गणपतीपाठोपाठ ज्येष्ठा-कनिष्ठा माहेरी येतात. जेष्ठा-गौरी पूजन नेहमी जेष्ठा या बुधाच्या नक्षत्रावरच केले जाते. रात्री अष्टमी तिथी रात्री ११ वाजून ४७ मिनिटांपर्यंत आपल्याकडील जेष्ठा-गौरींची प्राणप्रतिष्ठा तसेच महानैवेद्य दाखवून पूजनविधी रात्री ९ वाजून २२ मिनिटांपर्यंत करण्यात आला. गुरुवार, १२ सप्टेंबर रोजी २.५५ वाजेपर्यंत मूळ नक्षत्रावर विसर्जन म्हणजेच ज्येष्ठागौरींना विधिवत निरोप देण्यात येईल, अशी माहिती वेद शास्त्र संपन्न रामकृष्ण बारहाते गुरूजी यांनी दिली.

शनिवारी, ७ सप्टेंबरला 'श्रीं' ची घरोघर हर्षोल्हासात प्रतिष्ठापना करण्यात आली. मंगळवारी, १० रोजी घरोघरी ज्येष्ठागौरींचे सोनपावलांनी आगमन झाले. गेल्या पंधरा दिवसांपासून घरोघरी गौरी-गणपती सणाची जय्यत तयारी सुरू होती. काही ठिकाणी गौरीपूजनाला 'महालक्ष्मी पूजन' असेही म्हणतात. गौरीच्या रूपात पार्वती आपल्या बाळाला म्हणजे श्रीगणेशाला घेवून जाण्यासाठी येते, असेही मानले जाते. गौरी माहेरवाशीण असते. त्यामुळे अवघ्या दोन दिवसांचा पाहुणचार घेवून ती पुन्हा आपल्या घरी निघून जाते, अशी आख्यायिका असल्याचे वेद शास्त्र संपन्न उद्धव वजूरकर गुरूजी म्हणाले.

रांगोळी, सजावट

प्रत्येक प्रांतात गौरीपूजनाची पद्धत, कुळाचार वेगवेगळा असतो. त्यामुळे आपापल्या पद्धतीने गौरीपूजन साजरे केले जाते. गौरीला घरात आणताना रांगोळीने आठ पावले काढतात. रांगोळी काढून आकर्षक देखावे आणि सजावट केली जाते थाटामाटात घरात आणताना प्रत्येक पावलावर गौरीला थांबवून आत आणण्यात आले. महापूजनात पाना-फुलांची आरास करण्यात आली होती. शेवंतीची वेणी माळवण्यात आली होती. पुष्पहारांसह चाफा आणि केवड्याची पानेही वाहण्यात आली. महालक्ष्मी पूजनाचा असा सारा थाट होता.

१६ भाज्या, १६ पक्कान्ने

ज्येष्ठागौरीच्या महानैवेद्यामध्ये १६ भाज्या, १६ कोशिंबिरी, १६ चटण्या, १६ पक्कान्ने तसेच फराळाचे पदार्थ मांडण्यात आले होते. पुरणाच्या १६ दिव्यांनी आरती करण्यात आली. संध्याकाळी हळदी-कुंकवाचा समारंभ पार पडला. अनेक ठिकाणी रात्री झिम्मा-फुगड्या, घागर फुंकणे असे खेळ खेळून जागरण करण्यात आले.

रात्री ९.५३ पर्यंत विसर्जन

गौरी विसर्जन नेहमी मूळ नक्षत्रावर असते. गुरुवार, १२ सप्टेंबर या दिवशी सकाळपासून ते रात्री ९ वाजून ५३ मिनिटांपर्यंत गौरी विसर्जित कराव्या. नवमी तिथी रात्री ११ वाजून ३३ मिनिटांपर्यंत आहे. विसर्जन करावयाचे असल्यास ज्यांना दूर गावी परत जाणे आवश्यक आहे, त्यांनी सकाळी पूजेनंतर अक्षता टाकून इष्ट कामना सिध्दीरस्तू पुनरागमनायचं, असे ३ वेळेस म्हणून अक्षता टाकून हा मंत्र म्हणावा व साष्टांग नमस्कार करून किंचित गौरी हलवाव्या. या प्रमाणे आपणास गुरुवारी १२ सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजून ५३ मिनिटापर्यंत गौरी विसर्जन करता येईल.

# आंध्रप्रदेशात मिनी ट्रक पलटला; अपघातात ७ जणांचा मृत्यू

देवरापल्ली : आंध्र प्रदेशातील पूर्व गोदावरी जिल्ह्यात मिनी ट्रक उलटून ७ जणांचा मृत्यू झाला. ही घटना देवरापल्ली मंडलातील चिन्नईगुडेममधील चिलाका पाकला भागात मंगळवारी मध्यरात्रीनंतर २ वाजेच्या सुमाराला घडली. पूर्व गोदावरी जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक नरसिंह किशोर यांनी याबाबत माहिती दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार काजूने भरलेला मिनी ट्रक टी नरसापुरम मंडलातील बोरामपालम येथून निदादावोलू मंडलातील ताडीमल्लाकडे जात होता. यावेळी चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रक उलटला. अपघातानंतर काजूच्या गोण्यांखाली दबल्यामुळे लोकांचा मृत्यू झाला. पोलिस आणि स्थानिकांनी पोत्याखालून मृतदेह बाहेर काढून पोस्टमॉर्टमसाठी शासकीय रुग्णालयात नेले. मृतांमध्ये देबाबत्तुला बुरैया (४०), तम्मीरेड्डी सत्यनारायण (४५), पी. चिन्मुसलय (३५), कट्टाव कृष्णा (४०), कट्टावा सत्तीपांडू (४०), तडीमल्ला येथील तड्डी कृष्णा (४५) आणि कटकोटेश्वर येथील समिश्रगुडेम मंडल यांचा समावेश आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



पैठण येथे लोळगे परिवाराच्या वतीने महालक्ष्मीचे स्वागत करण्यात आले.

## मोरारी बापूंची सद्गुरु अक्काताई महाराजांच्या नाथ आश्रमास सदिच्छा भेट



तभा वृत्तसेवा.

खुलताबाद प्रतिनिधी .प्रसिद्ध राम कथाचार्य श्री संत मोरारी बापू यांनी वेरूळ येथील सद्गुरु अक्काताई महाराज यांच्या नाथ आश्रमामध्ये सदिच्छा भेट दिली. नाथ आश्रमाच्या वतीने मोरारी बापूंचे मोठ्या जल्लोषात स्वागत केले. मोरारी बापू यांचे वेरूळ येथे ७ ते १५ सप्टेंबर दरम्यान राम कथा सुरू आहे. यावेळी सतीश देवेंद्र लोखंडे यांनी मोरारी बापूंना सद्गुरु अक्काताई महाराज व त्यांच्या आश्रमाबद्दल आणि जीवन कार्याबद्दल माहिती दिली. यावेळी सरपंच प्रकाश पाटील,गणेश गायके, विवेक बापू चव्हाण कैलास, मिसाळ संतोष पांडव विलास भाऊ सोनवणे, सुनील मानघरे, नारायण भांबर्डे महाराज, छाया माळी, संजय भागवत, शेकनाथ नागे, प्रकाश वाकळे, राजू मनीठे, संतोष करपे, विठ्ठल गुमलाडू, सागर पाटील, हरीश गवळी सुनिल मांढरे यांच्यासह भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## गौरीगणपती निमित्त सजावटीतून नारीसुरक्षा, जनजागृती सन्मान देखावा केला सादर

### मयुरी गणोरकर यांचा नाचनवेल माहेरी स्तुत्य उपक्रम




तभा वृत्तसेवा

नाचनवेल:दि.११. सप्टेंबर- गौरी गणपतीचा उत्सव दरवर्षी मोठ्या उत्साहात सर्वत्र साजरा केला जातो यावर्षी देखील बुधवार दिनांक १० सप्टेंबर रोजी गौरी गणपतीचे थाटात आगमन झाले हा सण मोठ्या उत्साहात नाचनवेल येथे देखील साजरा केला जातो सुंदर अशा प्रकारे सजावट केली जाते . मात्र मयुरी गणोरकर यांनी आपल्या माहेरी नाचनवेल येथे या अनुषंगाने निमित्त गौरी गणपतीची सुंदर अशी सजावट करून सजावटीदरम्यान नारी सुरक्षा, सन्मान व जनजागृती बाबत एक संदेश सजावटीतून दिला आहे. सध्या महिलांवर होणारे अन्याय अत्याचार बघता त्याला कुठेतरी आळा बसला पाहिजे प्रतिबंध लागला पाहिजे या हेतूने उद्देशाने नुकत्याच झालेल्या कोलकत्ता येथील मोमीता देबनाथ तिच्यावर झालेल्या अन्याय अत्याचार त्यास न्याय मिळावा यासाठी मयुरी गणोरकर यांनी आपल्या माहेरी नाचनवेल येथे गौरी गणपतीच्या सजावटीतून पोस्टर दरम्यान नारी सुरक्षा सन्मान बाबत जागृती केली आहे. नारी सुरक्षा व सन्मान जनजागृती चे पोस्टर बघून मयुरी गणोरकर यांचे कौतुक होत आहे.

## कृ.उ.बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

कन्नड दि.११ सप्टेंबर - पालकमंत्री अब्दुल सत्तार व खासदार संदीपान भुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील शेतकऱ्यांचा व कन्नड कृषी उत्पन्न बाजार समितीचा कन्नड कृषी विकास साधण्यासाठी उत्पन्न आमचे संचालक मंडळ कटिबद्ध समितीची असल्याचे कृउबा सभापती डॉ. मनोज राठोड म्हणाले.कन्नड तालुका कृषी उत्पन्न बाजारसमितीच्या २१ वी वार्षिक सर्वसाधारण सभेत अध्यक्षीय भाषणात ते बोलत होते. यावेळी बाजार समितीचे माजी सभापती प्रकाश घुले, उपसभापती जयेश बोरसे, संचालक किशोर आबा पवार, कौतिक पवार, बन्सिधर निकम, साहेबराव अकोलकर, बाबासाहेब मोहिते, प्रदीप बोडखे, असद पवार,ज्ञानेश्वर निकम, भगवान कायंदे, कचरू शिरसे, शिवराम पवार यांच्यासह सभासद उपस्थित होते. वार्षिकसभेचे प्रास्ताविक व अहवाल वाचन बाजार समितीचे सचिव बाळू पवार यांनी केले. सभापती डॉ. मनोज राठोड बाजार वार्षिक सर्वसाधारण यांनी गतवर्षात केलेली विकासकामे आणि सुरु वर्षात करावयाची कामे याविषयी माहिती दिली. यावेळी साईनाथ आल्हाड, युवराज चव्हाण, शिवाजी थोरात, देविदास मनगटे, गोकुळसिंग राजपूत, सुलोचना पवार, अनिता शेलार, कांताराम सोनवणे, चंद्रभान गोरे, बाळासाहेब जाधव, दिलीप बनकर, जावेद शेख, प्रकाश अग्रवाल, शेख युसुफ उपस्थित होते. संचालक किशोरआबा पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## अभय केंद्र मार्फत पिडीत महिलांना न्यायालयात मोफत वकील

बिडकीन दि. ११ सप्टेंबर : कौटुंबिक हिंसाचारापासुन महीलांचे संरक्षण व्हावे या उद्देशाने पैठण येथे अभय केंद्र महीला व बालविकास विभागाच्या वतीने स्थापन करण्यात आले आहे या अभय केंद्र मार्फत पिडीत महिलांना, न्यायालयात मोफत विधी प्राधिकरण मार्फत मोफत वकील देखील मिळवता येते व कौटुंबिक हिंसाचारापासुन महीलाचे संरक्षण अधिनियम २००५/६ या कायदाने अत्याचारग्रस्त महिलेस, न्यायालयाने हिंसाचार करणाऱ्या विरोध काही अधिकार दिलेले आहेत ते मा . न्यायालयाच्या आदेशानुसार पिडीत महिलांना सहाय्यकते साठी उपलब्ध करून दिले जातात, तरी हिंसाचार ग्रस्त ,पिडीत महीला नी अभय केंद्र एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प १ येथे संपर्क साधावा असे आवाहन पि.डी.बमनाथ .तालुका संरक्षण अधिकारी महिला व बालविकास विभाग पैठण यांनी केला आहे.

## ग्राहकांचे खरेदीचे बजेट वाढेल

पुणे : मीशो, भारतातील एकमेव ट्रू ईकॉमर्स मार्केटप्लेसने आज आपला 'ईकॉमर्स फेस्टिव्ह फोरकास्ट २०२४' अहवाल लाँच केला. अहवालात आगामी सणांसाठी विक्रेत्यांची तयारी आणि खरेदीसाठी ग्राहकांच्या योजनांचा तपशील देण्यात आला आहे. मीशोच्या बिझनेसच्या जनरल मॅनेजर मेघा अग्रवाल म्हणाल्या, मीशोचा 'ई-कॉमर्स फेस्टिव्ह फोरकास्ट २०२४' अहवाल ग्राहक आणि विक्रेत्यांचा बदलता ट्रेंड सादर करतो. बहुतेक ग्राहक ऑनलाइन खरेदीसाठी त्यांचे बजेट वाढवणार आहेत, तर शॉपिंगमध्ये सोशल मीडियाची भूमिका देखील महत्त्वाची असणार आहे कारण आमचे अर्धे वापरकर्ते प्रभावकांकडून उत्पादन शिफारसी घेतात.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना पालकमंत्री अब्दुल सत्तार दारोदारी

सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.१०, शासनाच्या १० महत्वाच्या योजनांची माहिती घरोघरी देण्यासाठी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण कुटुंब भेट अभियाना' अंतर्गत पालकमंत्री ना. अब्दुल सत्तार यांनी सिल्लोड येथील विविध विभात जाऊन कुटुंबियांची भेट घेतली आणि योजनांचे महत्व त्याचे लाभ जनतेला समजावून सांगितले.



शहरातील गणेश कॉलनी, खोडकाईवाडी, पाबळवाडी, जमालशाह कॉलनी, टिळक नगर इत्यादी भागातील लाभार्थी कुटुंबाच्या घरी जाऊन पालकमंत्री ना. अब्दुल सत्तार यांनी लाडक्या बहिणींशी संवाद साधला. यावेळी मंत्री अब्दुल सत्तार यांनी इतर शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ मिळतोय का, याची विचारपूस केली. लाभार्थ्यांना शासनस्तरावर येणाऱ्या अडीअडचणी जाणून त्या दूर करण्याच्या दृष्टीने ना. अब्दुल सत्तार यांनी उपाययोजना केल्या. एकही पात्र लाभार्थी शासकीय योजनेपासून वंचित राहता कामा नये, सामान्यांना शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी शिवसैनिकांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन पालकमंत्री ना. अब्दुल सत्तार यांनी केले.

याप्रसंगी कृउबा समितीचे संचालक नंदकिशोर सहारे, सतीश ताठे, माजी उपनगराध्यक्षा शकुंतलाबाई बन्सोड, नॅशनल सूतगिरणीचे संचालक राजेंद्र ठोंबरे, मारुती वराडे, विठ्ठल सपकाळ,सुधाकर पाटील , राजू गौर, राजेंद्र बन्सोड, संजय मुरकुटे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# चारूतांडा मुर्ती येथे पपई बागेत लागवड गांजाची आरोपी अटकेत

तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि ११ शेतातील पपईच्या बागेत लागवड केलेला २ लाख ४८ हजार रुपये किमतीचा ४९ किलो गांजा उपविभागीय पोलीस अधिकारी व फर्दापूर पोलिसांनी जप्त केला आहे.ही कारवाई फर्दापूर पोलिसांनी (दि.१०) मंगळवारी केली असून,यात एकाला अटक करण्यात आली आहे.



फर्दापूर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या चारुतांडा (मूर्ती) ता.सोयगाव शिवारात गट नं.११० मध्ये शेतकरी आकाश भगवान राठोड (वय.२३ रा.चारुतांडा ता.सोयगाव) याने आपल्या शेतातील पपईच्या बागेत प्रतिबंधित असलेल्या गांज्याची झाडे लावली असल्याची गोपनीय माहितीच्या आधारे उपविभागीय पोलीस अधिकारी व फर्दापूर पोलिसांच्या पथकाने शेतात छापा टाकला.यावेळी पपईच्या बागेत गांज्याची सहा ते सात फूट उंचीची एकूण २४ झाडे आढळून आली. सर्व झाडे उपटून पोलीस स्टेशन मध्ये आणण्यात आली आहे.त्याचे वजन केले असता,जवळपास ४९ किलो हा गांजा भरला.त्याची अंदाजे किंमत २ लाख ४८ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलीसांनी आरोपी शेतकरी आकाश भगवान राठोड याला अटक केली असून त्याच्यावर अमली पदार्थ विरोधी कायद्याअंतर्गत फर्दापूर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

अधिक तपास उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिनेशकुमार कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक प्रफुल्ल साबळे,पोऊनि सुग्रीव चाटे,मीरखा तडवी,विनोद कोळी,प्रकाश कोळी,प्रदीप बेदरकर हे करीत आहे.

# तुकाराम मोहन चव्हाण यांच्या वारस लालीताबाई तुकाराम चव्हाण मदतीचा धनादेश पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते सुपूर्द

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.११ सप्टेंबर

सोयगाव तालुक्यातील नांदातांडा येथे वीज पडून मृत्युमुखी पडलेल्या तुकाराम मोहन चव्हाण यांच्या वारस लालीताबाई तुकाराम चव्हाण यांना ४ लाख रुपयांचा शासकीय मदतीचा धनादेश पालकमंत्री ना.अब्दुल सत्तार यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात सुपूर्द करण्यात आला.



नांदातांडा येथील शेतकरी तुकाराम मोहन चव्हाण हे घरी पोळा सण करून शेतात गेले होते. शेतातून रात्री ८ वाजेच्या सुमारास ते परत घरी येताना पाऊस सुरू झाल्याने ते वाटेतील एक झाडाखाली थांबले.यावेळी झाडावर वीज पडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.या घटनेची माहिती मिळताच पालकमंत्री ना. अब्दुल सत्तार यांनी तातडीने घटनेचा पंचनामा करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते.

दरम्यान या घटनेनंतर ना.अब्दुल सत्तार यांनी पीडित कुटुंबाची भेट घेत घडलेल्या दुर्दैवी घटनेबद्दल शोक व्यक्त केला होता.राज्य शासन आपल्या पाठीशी आहे अशा शब्दांत त्यांनी धीर दिला होता.मायताच्या वारसाला शासनाची मदत मिळवून देण्याची ग्वाही ना.अब्दुल सत्तार यांनी दिली होती.त्याअनुषंगाने ना.अब्दुल सत्तार यांनी पाठपुरावा करीत मयत तुकाराम चव्हाण यांच्या वारसाला आज ४ लाख रुपयांचा शासकीय मदतीचा धनादेश सुपूर्द केला.यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर,सोयगावच्या तहसीलदार मनीषा मेने,नायब तहसीलदार सतीष भदाणे,कृउबा समितीचे उपसभापती दारासिंग चव्हाण,संचालक नंदकिशोर सहारे,माजी सभापती धरमसिंग चव्हाण,तसेच नांदातांडा येथील पृथ्वीराज चव्हाण, दारासिंग शेषमल चव्हाण,युवराज चव्हाण आदींची उपस्थिती होती.

# आर्थिक व मानसिक छळ करून विवाहितेचा छळ करून फाशी देऊन जीवे मारण्याचा प्रयत्न उपचारा दरम्यान मृत्यू;सासरच्या सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.११ सप्टेंबर

आर्थिक व मानसिक छळ करून २४ वर्षीय विवाहितेचा छळ करून फाशी देऊन जीवे मारण्याच्या प्रयत्नात बचावलेली तरुणीचा मंगळवारी सकाळी १० वाजता सोयगाव तालुक्यातील बनोटी येथे उपचारा दरम्यान मृत्यू झाला.जळगाव जिल्ह्यातील कजगाव येथे सासरच्यांनी तिला २४ एप्रिलला फासा वर लटकविले होते तिचा तब्बल चार माहिन्यांनी मंगळवारी मृत्यू झाला आहे प्रकरणी सासरच्या सहा जणांविरुद्ध गुन्ह दाखल करुन भडगाव (जि. जळगाव) येथील पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला.नरिन मन्नान खाटीक (वय.२४) असे मयत तरुणीचे नाव आहे. बनोटी येथील चोवीस वर्षीय तरुणीचा कजगांव (जि. जळगाव) येथील सन.२०१९ साली मन्नान जाकिर खाटीक याच्या सोबत लग्न लावुन दिले तसे सासरच्या मंडळींना लग्नात मानपान दिला नाही.बर्कयांच्या व्यापारासाठी दोन लाख रुपयाची मागणी करीत शिवीगाळ मारहाण करत माहेरी पाठवुन दिले होते गावातील प्रतिष्ठित व्यक्तीच्या मध्यतीने पाठविले परंतु पती,सासू



नणद,दिर, मावस बहीण,नणंद,काका सासरा यांच्याकडून छळ,पैशाची मागणी होतच राहीली माहेरच्यांनी पैसे न दिल्याने रहात्या घरात मारहाण करीत दोराने गळा आवळून गंभीर दुखापत केली मरणासन्न पडलेल्या नैरीनला शेजारील लोकांनी चाळीसगाव येथे उपचारासाठी नेले तेथून नाशिक येथे हलविले मात्र तब्बेतीत सुधारणा होत नसल्याने बनोटी येथील घरी आणले असता मंगळवारी तिची प्राणज्योत मावळली.बनोटी पोलीस दुरक्षेत्रात मंगळवारी भाऊ अबरार खाटीक यांनी दिलेल्या प्रथम खबरीवरुन पती मन्नान खाटीक,सासु रेहानाबी खाटीक, दिर तन्वीर खाटीक, मावस सासु शबाना खाटीक, नणंद सिमरन खाटीक, काका सासरा शाकिर खाटीक यांच्यावरती गळा दाबून मारुण ठार केल्या प्रकरणी गुन्हा नोंद करुन पुढील कायदेशीर कार्यवाही करीता भडगाव (जि जळगाव) पोलीस ठाण्यात वर्ग करण्याची प्रकिया चालु आहे. तिच्या वर सायंकाळी सहा वाजता अंत्यसंस्कार करन्यात आले तिच्या पश्चत आई, वडील,एक भाऊ,एक बहीण,पती,एक मुलगा असा परिवार आहे.

# आंतरराज्य टोळीतील चौघे जेरबंद; सिडको वाळूज महानगर मधील घरफोडीची कबुली

तभा. वृत्तसेवा

वाळूज महानगर (प्रतिनिधी) : सिडको वाळूज महानगरात भरदिवसा घरफोडी करणाऱ्या टोळीतील घरफोड्यांच्या चार दिवसांतच वाळूज एमआयडीसी पोलिसांनी मुसक्या आवळल्या. त्यांच्या ताब्यातून गावठी कट्टा, गुन्ह्यात वापरलेली जीप , चोरीतील ऐवज असा एकूण सुमारे ११ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.




वाळूज महानगरातील वास्तुवैभव अपार्टमेंटमध्ये जगदीश गोविंदराव कुलकर्णी यांच्या घरात दि. ४ रोजी भर दिवसा कडी कोयंडा तोडून प्रवेश केला होता यावेळी कुलकर्णी हे घरी आले असता घरात दोन अनोळखी व्यक्ती साहित्य अस्ताव्यस्त करीत असल्याचे आढळले होते. तेव्हा कुलकर्णी यांनी या अनोळखींना हटकले. परंतु, त्यांनी कुलकर्णी यांना धक्का देऊन पळ काढत घरासमोर उभ्या केलेल्या काळ्या रंगाच्या जीपमध्ये बसून पसार झाले होते.

या घटनेत सोन्याचे दागिने व रोख १२ हजार रूपये असा एकूण १ लाख ४२ हजाराचा ऐवज चोरून नेला होता . या प्रकरणी कुलकर्णी यांच्या फिर्यादीवरुन घरफोड्यांविरुध्द वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी वाळूज एमआयडीसी पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत खबऱ्यांना कामाला लावले होते. भरदिवसा चोरी करणारे चोरटे आंतरराज्य टोळीतील असून ते शहरात बंद घराची रेकी करुन घरफोडी करीत असल्याची माहिती पोलीस तपासात समोर आली होती. या दरम्यान, रविवारी (ता. ८) सायंकाळी या टोळीतील काही घरफोडे नगर नाक्यावरुन काळ्या रंगाच्या स्कॉर्पिओमध्ये बसून वाळूजच्या दिशेने येत असल्याची माहिती वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक मनोज शिंदे यांना मिळाली. पोलिसांनी लिंकरोड चौफुलीवरील उड्डाणपुलाखाली सापळा रचला. तेव्हा सायंकाळी सहाच्या सुमारास संशयित चोरटे जीपमध्ये दिसताच पोलीस पथकाने अडवून चौघांना जेरबंद केले. त्यांच्या ताब्यातून गावठी कट्टा, स्कार्पिओ जीपसह एमएच ०१, बी. वाय.५७६३, व एम.एच.०१, बी.यु. ८८३९) या दोन नंबर प्लेटसह घरफोडीचे साहित्य जप्त करण्यात आले. त्यांच्याकडे कसून चौकशी केली असता त्यांनी सिडकोमधील घरात चोरी केल्याचे कबूल केले. तसेच ही आंतरराज्य टोळी कार्यरत असून दिवसा रेकी करुन बंद घरे फोडून चोरी करीत असल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले.

या आंतरराज्य टोळीत सचिन बलभीम कोळपे (४३. रा. येळवे वाडा, मंगळवार पेठ ता. कराड, ह. मु. पडेगाव), विवेश माधवराव देशमुख (४५, रा. प्रवीणनगर, बळसोड, ता. जि. हिंगोली), मुस्तकिन मुस्ताक शेख (४२, रा.शकरपुर, पूर्व दिल्ली), अजीज याकुब कासकर (५६ रा. दापोली जि.रत्नागिरी, ह.मु. पडेगाव) या चौघांचा समावेश आहे.

ही कारवाई पोलिस निरीक्षक कृष्णा शिंदे व जयंत राजूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक मनोज शिंदे, उपनिरीक्षक प्रविण पाथरकर, सहा. फौजदार दिनेश बन, पोहेकॉ. विनोद नितनवरे, जालींदर रंधे, बाळासाहेब आंधळे, पोकॉ. विशाल पाटील, नितीन इनामे, गणेश सागरे, समाधान पाटील, हनुमान ठोके, राजाभाऊ कोल्हे , चांदे आदींनी केली.



बीड बायपास सातारा परिसर माऊली नगर येथील गणेश मंडळाच्या वतीने गणेश मूर्तीचे प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. यावेळी तरुण भारतचे नारायण गायकवाड व माऊलीनगर येथील रहिवास सुभाष तूपशेंद्रे सहपत्नीक यांच्या हस्ते आरती करण्यात आली. यावेळी पटवर्धन गुरुजी, यांच्यासह गणेश मंडळातील सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

## एमजीएम रुग्णालयात राष्ट्रीय नेत्रदान दिनानिमित्त जनजागृतीपर कार्यक्रम संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि.११ : एमजीएम रुग्णालयातील नेत्र विभागाच्यावतीने राष्ट्रीय नेत्रदान दिनानिमित्त विशेष जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष कार्यक्रमाच्या अंतर्गत पंधरा दिवस विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी रांगोळी, चित्रकला, माहिती फलक आणि नाटक सादर करीत नेत्रदानाचे महत्व प्रभावीपणे मांडले.

या जनजागृतीपर कार्यक्रमाचा समारोप समारंभ मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या समारोप कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून एमजीएम रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.राजेंद्र बोहरा, उपअधिष्ठाता डॉ. प्रविण सूर्यवंशी,वैद्यकीय अधीक्षक डॉ.ह.रा. राघवन, डॉ. बी.के सोमाणी, नेत्र विभागाच्या प्रमुख डॉ. सारिका गाडेकर, तसेच मेडिसिन विभागाच्या डॉ. सोनाली भट्टू, डॉ.माधुरी एंगडे,डॉ.संजय गुड्डेतवार, दिपक जाधव, नेत्र विभागातील डॉक्टर्स व सर्व संबंधित उपस्थित होते.

या जनजागृतीपर कार्यक्रमात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी हिररीने सहभाग घेत जनजागृतीचे काम केले. या उपक्रमांत ज्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करीत आपले यशस्वीपणे योगदान दिले, अशा विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

**Ahmednagar Municipal Corporation, Ahmednagar**
**General Road grant - Year 2024-25**
**E Tender Notice No.: 61 to 66 - year. 2024-25**

**General Road grant - Year 2024-25** E- Tender Notice No. 61 to 66 / Year 2024-25 has been published on the website http://mahaetenders.gov.in for online bidding through e-tender mode.

However, the concerned should take note of this.

(With approval of Hon'ble Commissioner)

Sign/-
city engineer
Ahmednagar Municipal Corporation

## जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १०१/२०२४. नि. क्रं.

१. विलास आत्माराम पंडित, वय ४६ वर्षे, धंदा मजुरी, रा. रामजीनगर, आमखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर. २. ज्ञानेश्वर आत्माराम पंडित, वय ४० वर्षे, धंदा मजुरी, रा. रामजीनगर, आमखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीगनर.

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अशोक आगे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत भिकाबाई झिपरु गायकवाड (लग्नानंतरचे नांव- सुमनबाई आत्माराम पंडित) यांचा दिनांक २४/०४/२०२३ रोजी मौजे आमखेडा येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते २ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते २ हे मयत भिकाबाई झिपरु गायकवाड (लग्नानंतरचे नांव- सुमनबाई आत्माराम पंडित) यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र दंण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २७/०८/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. ०९/१०/२०२४

आदेशावरुन

विभागीय लिपीक | सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर) न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद.**

सिव्हील एम ए.क ३३६/२०२४ प्रकरणात पुढील तरीख दि. २१/०९/२०२४

अर्जदार : १) शोभा भ. राजु सातपुते, वय ४४ वर्ष, धंदा घरकाम, रा.सखाराम पंतनगर, गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद २) अभिषेख रानु सातपुते, वय २१ वर्ष, धंदा मजुरी, रा. सखाराम पंतनगर, गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत

सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. एस. के. लांडे यांच्यामार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे कामी अर्ज सादर केला आहे की, अर्नदार क १ व २ हे वर नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी यहणारे असुन अर्जदार क १ हि अर्जदार क २ ची आई आहे. अर्जदार क १ चे पति व अर्जदार क २ चे वडील नामे राजु कोंडीराम सातपुते हे दि. २७/११/२०२१ रोजी मौजे गंगापुर ता. गंगापुर नि. औरंगाबाद येथे मयत झालेले असुन मयतास अर्जदार क १ हि पत्नी व अर्जदार क २ हा मुलगा कायदेशीर चारसदार आहे. तसेच मयत रानु कोंडीराम सातपुते यांची आई म्हणजेच अर्जदार क १ ची सासु व अर्जदार क २ घी आजी नामे केसरबाई कोंडीराम सातपुते हि दि. ०१/०५/२०२४ रोजी मौजे लोणी बु. ता. राहाता जि. अहमदनगर येथे मयत झालेली असुन मयत केसबाई कोंडीराम सातपुते यांचे पति व मयत राजु कोंडीराम सातपुते यांचे वडील म्हणनेच अर्जदार क १ चे सासरेच अर्जदार क २ चे आजोबा नामे कोंडीराम तुळशिराम सातपुते हे बरेच वर्षापुर्वी मयत झालेले आहे मयतांना अर्जदार क १ व २ हेच कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरिक्त मयतांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत रानु कोंडीराम सातपुत व मयत केसरबाई कोंडीराम सातपुते यांना अर्जदार क १ व २ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे. अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतांना इतर कोणीही वारसदार नाही. मयत राजु कोंडीराम सातपुत व मयत केसरबाई कोंडीराम सातपुते यांच्या मृत्यु मुळे अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. करीला जाहीर प्रगटन,

आन दि. १०/९/२०२४ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तत्काळ नुकसान भरपाई द्या

## राज्यपाल राधाकृष्णन यांना काँग्रेसच्या शिष्टमंडळाचे विविध मागण्यांचे निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

काँग्रेस पक्षाचे शिष्टमंडळ जिल्हाध्यक्ष खा.डॉ.कल्याण काळे यांच्या नेतृत्वाखाली माजी आ.नामदेव पवार, शहर काँग्रेस अध्यक्ष शेख युसूफ, सेवादल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष विलास औताडे व जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष किरण पा.डोणगांवकर यांनी मंगळवारी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांची भेट घेतली. यावेळी पीककर्जाचे उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या बँकांवर कारवाई करणे, अतिवृष्टीने पिकांचे नुकसान झाल्याने त्यांना तत्काळ नुकसान भरपाई मिळण्यासह विविध मागण्यांचे निवेदन राज्यपाल राधाकृष्णन यांना देण्यात आले.

१) सन २०२३-२४ वर्षात छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पिक विमा रक्कम देण्यास टाळाटाळ करणाऱ्या विमा कंपनीवर कठोर व दंडात्मक कारवाई करणे बाबत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १०९१६७७ शेतकऱ्यांनी ५२५१०९.१० हेक्टर क्षेत्राचा विमा भरला होता. शेतकरी, राज्यसरकार व केंद्र सरकार मिळुन ३९६.६७ कोटी रक्कम भरलेली आहे. परंतु १०९१६७७ शेतकऱ्यांपैकी फक्त ६८१२०० एवढेच शेतकरी पात्र ठरविले. त्याची रक्कम ही २२१.४८ कोटी आहे. जालना जिल्ह्यात ८७७१३४ शेतकऱ्यांनी ५११९३२.०२ हेक्टरचा विमा भरलाा होता. त्यासाठी शेतकरी, राज्यसरकार, केंद्र सरकार मिळुन ४७१.८१ कोटी एवढी मोठी रक्कम विमा कंपनीला भरलेली आहे. ८७७१३४ शेतकऱ्यांपैकी फक्त ५६८२१६ शेतकरी पात्र ठरविले आणि त्याची रक्कम २४६.४७ कोटी आहे.

२) छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची तात्काळ भरपाई मिळणे बाबत.छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यात अतिवृष्टी झालेली आहे. त्यामुळे शेती पिकांसह, विहीरी, शेततळे अशा अनेक बाबींचे नुकसान झालेले आहे. काही ठिकाणी पाझर तलाव, साठवण तलाव फुटून नुकसान झालेले आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात मागील वर्षी जुन-सप्टेंबर या कालावधीत ४४८.९ एमएम पाऊस झाला होता तर यावर्षी ६७९.५ एमएम इतका मोठ्या प्रमाणात पाऊस झालेला आहे. जालना जिल्ह्यात मागील वर्षी ५०३ एमएम इतका पाऊस झाला होता तर यावर्षी ७३१ एमएम इतका पाऊस झालेला आहे. ३) छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगामाचे पिक कर्ज देण्याचे लाक्षांक पुर्ण न करणाऱ्या बँकांवर कठोर कारवाई करणे बाबत.छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यात शेतकऱ्यांना पिक कर्ज देण्यास बँकांकडुन टाळाटाळ करण्यांत येत आहेत. थकीत कर्जदार आणि ज्यांचे सिबील खराब आहे अशा शेतकऱ्यांना देखील पिककर्ज देण्याचे आदेश शासनाने दिलेले असतांना बँकांनी दिलेला लाक्षांक पुर्ण केलेला नाही. त्यामुळे अनेक शेतकरी हवालदिल झाले असून, खाजगी सावकारांकडुन कर्ज घेऊन शेतीचा खर्च भागवित आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्हाचा सन २०२४-२५ चा लाक्षांक १५५४.२८ कोटीचा असतांना फक्त १०८०.१७ कोटीचा लाक्षांक पुर्ण केलेला आहे म्हणजेच फक्त ६९.५० टक्केच कर्ज वितरण झालेले आहे.

जालना जिल्ह्यातील लाक्षांक १८०४ कोटीचा असतांना फक्त ५६१.५८ कोटीचा लाक्षांक पुर्ण केलेला आहे म्हणजेच फक्त ३१.१३ टक्केच कर्ज वितरण झालेले आहे. ४) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील डीएमआयसीमध्ये मोठे प्रकल्प / उद्योग मिळणे बाबत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करून १०-१२ वर्ष गेलेली आहेत. परंतु अद्यापपर्यंत मोठे प्रकल्प / उद्योग या भागात आलेले नाहीत. रोजगार निर्मिती होऊन बेरोजगारांना रोजगाराची संधी मिळेल या आशेकडे डोळे लाऊन बसलेले अनेक तरूण शैक्षणिक पात्रता असतांना देखील बेरोजगार बसलेले आहेत. शेंद्रा येथील २००० एकर जमीन संपादित केलेली आहे. प्रत्यक्षात फक्त १२० एकरवर प्रकल्पासाठी देण्यांत आलेली आहे. बिडकीन येथील २५२३ एकर जमीन संपादित करण्यांत आली आणि ५४० एकर जमीन प्रकल्पांसाठी देण्यांत आलेली आहे. ५) जालना येथील ड्रायपोर्ट चे काम सुरू करणे बाबत.जालना जिल्ह्यात ड्रायपोर्टचे काम अनेक दिवसापासून प्रलंबित आहे. संथ गतीने चालु आहे. त्यामध्ये प्रगती होतांना दिसत नाही. ड्रायपोर्ट करण्याचा निर्णय जुलै २०१५ मध्ये घेण्यांत आला. भुसंपादनाची कारवाई सन २०१६-१८ या कालावधीत करण्यांत आली. १९१ हेक्टर जमीन संपादित करण्यांत आली. भूसंपादनासाठी १०७ कोटी खर्च करण्यांत आला. मागील ७ वर्षापासून ड्रायपोर्ट करण्यासाठी १३८ कोटी खर्च करण्यांत आला. वारंवार कार्यान्वित यंत्रणा बदलण्यांत आली आहे. पोर्टकडुन नॅशनल हायवे ला काम देण्यांत आले.

६) राष्ट्रीय महामार्ग क्र.५२ सोलापुर-धुळे रस्त्यावरील कन्नड येथील औट्रम घाटातील बोगदा कामास निधी उपलब्ध करून देणे बाबत. राष्ट्रीय महामार्ग क्र.५२ सोलापुर-धुळे रस्त्यावरील कन्नड येथील औट्रम घाटातील बोगद्याच्या कामात मागील १० वर्षापासून दिरंगाई चालु असून, शासनाच्या कोट्यावधी रूपयाचे नुकसान झालेले आहे. सन २०१४ मध्ये महामार्गाचे काम सुरू केले. सन २०१६-१७ ला बोगद्याचा डी.पी.आर. मंजुर करण्यांत आला. अंबरीश कंपनीने बोगदा योग्य असल्याचा अहवाल देखील त्याच वेळी दिला. परत आता नव्याने डीपीआर बनविण्याचा घाट घातला जात आहे. त्यामुळे पुन्हा वेळ आणि पैसा खर्च होणारा आहे. परंतु वेळे बोगदा न बनविल्यामुळे १४ कि.मी. अंतराची वाहतुक ५० कि.मी. अंतरावरून करावी लागत आहे. त्यामुळे इंधन आणि आर्थिक भुर्दंड सर्वसामान्यांना सहन करावा लागत आहे.

---

## संक्षिप्त

### अहिल्यादेवी होळकर गणेश उत्सव मंडळासमोर विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद/प्रतिनिधी**

जाफ्राबाद शहरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर गणेश उत्सव मंडळ येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी विद्यार्थ्यांचे चिमुकल्यांचे कला गुण जोपासण्यासाठी सदरील गणेश मंडळ मोठ्या प्रमाणात खेळांचे व विविध स्पर्धांचे आयोजन करतात यामध्ये निंबु चमचा,संगीत खुर्ची, गायन स्पर्धा, लिखाण स्पर्धा, शुद्ध लेखन स्पर्धा, भाषण स्पर्धा,लंगडी, मटक फोडी अश्याच विविध प्रकारचे खेळांचे आयोजन करतात व सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना बक्षीस म्हणून शालेय साहित्य वाटप करतात. मंडळाचे सर्व आयोजक मंडळी हे नेहमीच विद्यार्थी हित जोपासण्यासाठी प्रयत्न करत असतात. स्थानिक लोकांच्या मते गणपती बसल्यापासून इथले वातावरण अगदी गोकुळासारखे आनंदी असते.गणपती बाप्पाची अगदी मनोभावे सेवा येथील महिला व पुरुष मंडळी करतात.आरतीसाठी सर्व जण सकाळ संध्याकाळ एकत्र येऊन बाप्पाच्या आरतीचा मोठ्या संख्येने लाभ घेतात.रात्री ०८.३० वाजता खेळांच्या स्पर्धांना सुरुवात होती आणि स्पर्धा खेळण्यासाठी व बघण्यासाठी स्थानिकांची मोठी गर्दी बघायला मिळते.

### अध्यक्षपदी मजहर खाँन पठाण यांची नियुक्ती



**तभा वृत्तसेवा**
**पारध/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील धावडा येथील पत्रकार मजहर खाँन पठाण यांची लोकशाही युवा फाउंडेशन चे शाखा अध्यक्ष पदी निवड झाली यांची नियुक्ती करण्यात आली. लोकशाही युवा फाउंडेशन संघटना जिल्हाध्यक्ष जालना सद्दाम भाई सय्यद यांच्या शिफारशीनुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. याबद्दल त्यांचे सर्वत्र स्वागत होत आहे.

### रोटरी क्लब अंबडने केले मोफत कृत्रिम हात व पायाचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

मोफत कृत्रिम हात, पाय,वाटप करण्यात आले या कार्यक्रमास उपस्थित अंबड तहसीलचे तहसीलदार मा. श्री. विजय चव्हाण साहेब,डॉ.श्री भीमराव दोडके सर (वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय अंबड) श्री. रणवीर कोळपे साहेब (आगर प्रमुख अंबड) श्री. विनोद जेठे साहेब (शाखा अधिकारी चिखली बँक अंबड) रोटरी क्लब अंबडचे अध्यक्ष श्री. डॉक्टर लक्ष्मण सावंत साहेब, श्री. डॉ. केशव मुरकुटे सर (सचिव रोटरी क्लब अंबड) श्री.राजकमल करवा सेठ(पूर्व अध्यक्ष रोटरी क्लब ,अंबड)श्री. विनोद कुलकर्णी, डॉ. रोहित भाला सर, पुरुषोत्तम सोमानी सेठ, डॉ. श्री भरत होंडे सर, श्री. जगदीश चरका,डॉ. रमेश दुधाळ साहेब, डॉ. पाईकराव साहेब,श्री गणेश बोबडे, श्री संतोष शिनगारे,श्री.बालासाहेब हमने, श्री. संभाजी बारहाते श्री. ऋषी गिल्डा तसेच रोटरी क्लबचे सदस्य उपस्थित होते.

---

## परतवाडी मधील शेकडो तरुणाचा काँग्रेस पक्षात पक्ष प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**आष्टी/प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील परतूर तालुक्यातल्या परतवाडी मध्ये भाजपला मोठा धक्का बसलाय, काँग्रेस नेते अविनाश चव्हाण व युवा नेते नितीन जेथलिया यांच्यावर विश्वास ठेवत परतवाडी येथील भाजपच्या शेकडो तरुणानी काँग्रेसमध्ये पक्षप्रवेश केला आहे, परतवाडी ग्रामपंचायत मागील २० वर्षांपासून भाजपच्या ताब्यात आहे, परतवाडी भाजपचा बालेकिल्ला म्हणून मानला जात आहे मात्र, याच बालेकिल्ल्यात काँग्रेस पक्षात शेकडो तरुण आणि पक्षप्रवेश केला आहे, संदीप आढे,अनिल जाधव,अजय आढे,संजय राठोड, विनोद आढे या तरुणांनी पक्ष प्रवेश केला आहे.यावेळी अविनाश चव्हाण आणि नितीन जेथलिया यांच्या हस्ते काँग्रेसच्या शाखेचे उद्घाटन करण्यात आले आहे, परतवाडी च्या शाखाध्यक्षपदी प्रधाना आढे तर शाखाउपाध्यक्षपदी विजय राठोड, सचिव गणेश आढे, राहुल आढे,मिथुन चव्हाण, समाधान चव्हाण, सचिन आडे, बळीराम राठोड पंजाब आडे, शरद आडे सुनील राठोड रामेश्वर नायक दिलीप आडे संतोष चव्हाण विलास चव्हाण माधव चव्हाण राजेश आडे नरेश आडे अजय आडे सुनील राठोड संतोष राठोड अरविंद जाधव, सुनील आडे यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली..

---

### जैन श्वेतांबर सोशल ग्रुपची महाआरती!

## अनोखा तर्फे आजपासून प्रसादी, हरियाणा येथील सजीव देखावा -अनिल गोयल



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातील श्री अनोखा गणेश मंडळाच्या बाप्पांची बुधवारी ( ता. ११) जैन श्वेतांबर सोशल ग्रुप तर्फे महाआरती करण्यात आली.

यावेळी जैन सोशल ग्रुप जालना चे संस्थापक अध्यक्ष हर्षद - ज्योती चोरडिया , अध्यक्ष मनोज - वैशाली बम्ब , सचिव अशोक - मोनिका कोलानी, पुनम सुराणा , कोषाध्यक्ष अनिल - भारती रुणवाल , पी आर सचिव शितल - राखी आबड , गौतम - शितल चोरडिया , जयेंद्र - पुजा भंडारी , सज्जन - राखी लुणिया , शितल - सेजल लुंकड , मनिष - कल्पना लोढा , निलीमा देसरडा , मंजु आबड , सुवर्णा रेदासनी , अरुणा छाजेड , संतोष कोलानी , परिणी सुराणा, मंडळाचे संस्थापक अजय ( जगदीश) भारतिया, कार्याध्यक्ष संजय अग्रवाल ( रूपम), पुरूषोत्तम भक्कड, राजकुमार दायमा (सरकार), गणेश तिवारी, आर्दीची उपस्थिती होती. मंडळाच्या वतीने जैन सोशल ग्रुपच्या सदस्यांचा सत्कार करण्यात आला. मंडळास ग्रुपचे सहकार्य सदैव आहे असे संस्थापक हर्षद चोरडिया, अध्यक्ष मनोज बंब यांनी सांगितले.

दरम्यान प्रति वर्षाप्रमाणे आकर्षक, मनमोहक देखावे आणि सलग पाच दिवस प्रसादीची परंपरा यंदाही कायम राहणार असून गुरूवारी ( ता. १२) प्रसाद वितरणास प्रारंभ होईल. दररोज १५ ते २० हजार भाविकांना वडापाव, डाळ वडा, साबुदाणा खिचडी ,इडली, मोतीचूर चे लड्डू, वितरित केले जाणार आहे. विशेष म्हणजे यंदा हरियाणा येथील २४ कलावंतांचे पथक जालना शहरात दाखल झाले आहे. पथकाद्वारे दररोज वेगवेगळ्या प्रकारचे सजीव देखावे सादर केले जाणार असून भाविकांनी मोठ्या संख्येने प्रसाद आणि देखावे पाहण्याचा आनंद घ्यावा असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष अनिल गोयल यांच्यासह मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

---

## विकास कामांसाठी प्राधान्याने निधी उपलब्ध करून देणार -आ.गोरंटयाल



**तभा वृत्तसंस्था**
**जालना/प्रतिनीधी**

खुल्या जागेच्या सुशोभीकरण, संरक्षण भिंतीसह विकासाच्या अन्य कामांना प्राधान्य देण्यात येईल अशी ग्वाही आ. कैलास गोरंट्याल यांनी काल मंगळवारी येथे बोलतांना दिली. जालना शहरातील अंबड चौफुली परिसरातील महेश नगर गणेश मंडळ आणि राजपूत वाडी येथील श्रीची आरती आ.कैलास गोरंटयाल यांच्या हस्ते करण्यात आली. या आरतीनंतर परिसरातील रहिवाशी नागरिकांनी विकास कामांसाठी साकडे घातल्यानंतर त्यांनी उपरोक्त ग्वाही दिली.यावेळी अंबड चौफुली प्रभागातील नागरिकांनी अंबड रोड ते अंतर्गत गंगाधरवाडी - सामंनगाव रोडची मागणी पूर्ण करून दर्जेदार काम करून दिल्याबद्दल आ. गोरंटयाल यांचा सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी धर्मा खिल्लारे, राम सावंत, योगेश पाटील, बापू साळवे, शेख इब्राहिम, नंदाताई पवार, शेख इम्रान, गणेश चांदोडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सूत्रसंचालन युवा काँग्रेसचे गजानन ठोंबरे यांनी केले. यावेळी विठ्ठलराव ठोंबरे, जायभाये,दामोदर वाघमारे, किंगरे, साखरे, काळुसे, जनार्दन गजर, मुंढे, विनोद राठोड, सावता वाघमारे, गोरख किंगरे, गोपाल ठोंबरे, गजानन राजपूत, परमेश्वर वाघमारे, परमेश्वर शेरकर, राजू राठोड, कासंडे, घुगे, राजू अंभोरे, यांच्यासह परिसरातील रहिवाशी, महिला युवक कार्यकर्ते यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

---

## वडीगोद्री येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचा लिलाव उधाळून लावणार -मनसे जिल्हाध्यक्ष बळीराम खटके

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

वडीगोद्री कृषी उत्पन्न बाजार समिती मुख्य बाजारपेठ वडीगोद्री उप बाजारपेठ अंबड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळ व चेअरमन व व्हाईस चेअरमन यांनी येणाऱ्या १६ सप्टेबर सोमवार रोजी वडीगोद्री येथील बाजार समितीच्या ताब्यात असलेल्या जमिनीच्या प्लॉट त्याचा लिलावाचे आयोजन केले आहे. उपबाजारपेठ अंबड या जागेचा पहिलेच वाटोळे करून ठेवलेले असून आता वडीगोद्री मार्केट कमिटीच्या जागेवर संचालक मंडळ चेअरमन व्हाईस चेअरमन यांचा डोळा असून या जमिनीचे प्लॉट पाडून मोठ्या प्रमाणात आर्थिक रक्कम जमा करायची व यातून स्वतःचा फायदा करून घेण्याचं काम या लोकांनी लावले असल्याचा आरोप मनसेचे जिल्हाध्यक्ष यांनी करत हा लिलाव उधळून लावणार असल्याचा इशारा दिला आहे.



वडीगोद्रीच्या लोकांनी ही जमीन ज्या हितासाठी दिली ते हित साध्य होताना दिसून येत नाही जमीन देण्याचा हेतू असा होता वडीगोद्री मध्ये काहीतरी मार्केट कमिटी डेव्हलप करून येथील तरुण मुलांना स्वतःचा धंदा टाकण्यासाठी व रोजगार उपलब्ध होण्यासाठी फायदा होईल पण असे होताना दिसून येत नाही शेवटी असेच म्हणावे लागते आगीतून निघालो फुफ्फुट्यात पडलो ज्या वडीगोद्री करानी ही जमीन ज्या हेतूसाठी दिली तो हेतू साध्य होताना दिसून येत नाही लिलाव करायचाच असेल त र वडीगोद्रीकरांसाठी २० टक्के जागा राखीव ठेवण्यात याव्यात व आजूबाजूच्या खेडयातील तरुणासाठी म्हणजेच दोदडगाव रामगव्हाण टाका नालेवाडी अंतरवाली ढाकलगाव शिरसगाव या खेड्यातील तरुणासाठी दहा टक्के जागा राखीव ठेवण्यात यावे व तसेच ज्या लोकांनी वडीगोद्री मार्केट कमिटीला जागा दिलेली आहे त्या लोकांसाठी दहा टक्के जागा राखीव ठेवण्यात येण्यात तरच हा लिलाव आम्ही होऊन देऊ नसता येणाऱ्या १६ तारखेला होणारा लिलाव आम्ही उधळून लावू असा इशारा श्री. खटके यांनी दिला आहे.

---

# लेकरांच्या खाऊवर मारला अंगणवाडी सेविकेने डल्ला!

### विचारणा करण्यासाठी गेलेल्या नागरींकांसोबत अंगणवाडी सेविकेची अरेरावी?


### व्हिडोओ मध्ये सापडलेल्या त्या अंगणवाडी सेविकावर कारवाई होणार का? ग्रामस्थांचा प्रश्न

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/नागेश कुलकर्णी**

अंगणवाडीतील गोरगरीब आणि सर्वसामान्य कुटूंबातील लहान मुलांसाठी केलेल्या मुलाांसाठी टीएचआर (पोषण आहार) सुरू केला. मात्र राजकीय पुढाऱ्यांचा आर्शिवादाने ज्या अंगणवाडी सेविका रूजु झाल्या त्यांनी भ्रष्ट्राचार केल्या त्याच प्रमाणे त्या अंगणवाडी सेविका देखील भ्रष्ट्राचार करण्याचा प्रयत्न करतांना दिसून येत आहे, असाच प्रकार मंठा तालुक्यातील उमरखेडा येथे घडला असुन येथील अंगणवाडी क्रं.२ मध्ये देखील घडला असुन याकडे प्रशासन कश्याप्रकारे लक्ष देणार हे पाहणे गरजेचे आहे.







या संदर्भात अधिक वृत्त असे की, मंठा तालुक्यातील उमरखेडा अंगणवाडी क्रमांक दोन मध्ये बालकांसाठी असलेल्या खाऊच्या पाकिटाची अंगणवाडी सेविका विक्री करत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केल्यानुसार एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी या अंगणवाडीचा पंचनामा केला असता या अंगणवाडीत अनेक गैरप्रकार आढळून आले. अंगणवाडीतील बालकांसाठी असलेले खाऊची पाकिटे रिक्षा चालकाच्या मदतीने परस्पर विक्री करताना ग्रामस्थांनी रंगेहात पकडले. त्या संदर्भातील व्हिडिओक्लिप सोशल मीडियावर चांगलीच व्हायरल होत आहे. एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारीच्या पथकाने दिलेल्या भेटीत अंगणवाडी सेविका रेणुका गणेश चव्हाण या पाकिटे विकत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली. ही पाकिटे भिजलेली असल्यामुळे विकत असल्याचा खुलासा अंगणवाडी सेविकेने केला. मात्र, शासनाकडून आलेला बालकांसाठीचा खाऊ विकता येत नाही असे अधिकाऱ्यांनी सुनावले. खाऊच्या पाकिटाची तपासणी केली असता ही पाकिटे भिजलेली नसल्याचे आढळून आले. तसेच अंगणवाडी नियमित उघडत नसल्याचीही तक्रार ग्रामस्थांनी केली. या प्रकरणामध्ये अंगणवाडी सेविकेसह बालकांच्या पाकिटांची ने - आण करणारा संबंधित रिक्षा चालक चौकशीच्या फेऱ्यात अडकला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## अग्रलेख...

# नेमेचि येते रोगराई...

नेमेचि येतो पावसाळा आणि नेमेचि येते रोगराई, असे आपल्या देशाचे झालेले आहे. पूर, अतिवृष्टीमुळे होणारे नुकसान, भूस्खलन यांच्या बरोबरीने आजारांचा प्रसार हाही आता चिंतेचा विषय बनत चाललेला आहे. नागपूर आणि महाराष्ट्रात चिकनगुनिया आणि डेंग्यूचा व्यापक प्रादुर्भाव चिंताजनक पातळीवर पोहोचला आहे. हजारो लोकांच्या जीवनमानावर त्याचा गंभीर परिणाम झाला आहे. एकट्या नागपूर शहरात २० हजारांहून अधिक रुग्ण आहेत. शारीरिक, आर्थिक त्रासात तर ढकललेच, शिवाय वरकरणी काहीही कारण नसताना आपण नीट चालू शकत नाही, ही भावना त्यांच्या मानसिक स्वास्थ्यासाठी घातक ठरते आहे. चिकनगुनिया आणि डेंग्यू हे दोन्ही विषाणूजन्य संसर्गातून होणारे आजार आहेत, जे प्रामुख्याने एडिस इजिप्ती या प्रजातीतील डासांच्या माध्यमातून पसरतात. वैद्यकशास्त्राच्या भाषेत ते काही जीवघेणे आजार नाहीत. पण त्रासदायक, नुकसानदायक जरूर आहेत. एडिस ही प्रजाती उष्णकटिबंधीय आणि उपोष्णकटिबंधीय हवामानात वाढते. हे दोन्ही वेगवेगळे आजार असले तरी संक्रमण आणि लक्षणांच्या बाबतीत त्यांच्यात अनेक साधर्म्ये आढळतात. चिकनगुनिया हा आजार चिकनगुनिया विषाणूमुळे (CHIKV) होतो. त्या आजारात खूप ताप, तीव्र सांधेदुखी, डोकेदुखी, स्नायू दुखणे आणि शरीरावर पुरळ येणे अशी गंभीर लक्षणे दिसतात. यामुळे सांधेदुखीच्या दीर्घकालीन समस्या उद्‌भवू शकतात आणि परिणामी रुग्ण अनेक महिने किंवा वर्षांसाठी दुर्बल होऊ शकतात. त्यांना चालणे, कामावर जाणे, बसणे कठिण होऊ शकते. दुसरीकडे, डेंग्यू हा आजार डेंग्यू विषाणूमुळे (DENV) होतो आणि ताप, तीव्र डोकेदुखी, डोळ्यांच्या मागच्या भागात वेदना, सांधे आणि स्नायू दुखणे आणि त्वचेवर पुरळ उठणे अशी लक्षणे दिसतात. हा आजार बळावला तर डेंग्यू हेमोरेजिक ताप (DHF) किंवा डेंग्यू शॉक सिंड्रोममध्ये (DSS) त्याची परिणती होऊ शकते.

नागपूर, विदर्भ आणि महाराष्ट्रात चिकनगुनिया आणि डेंग्यूचा मोठ्या प्रमाणावर प्रसार होण्यास अनेक घटक कारणीभूत आहेत. आपल्या बहुतांश भागात मान्सूनमध्ये देखील उष्ण आणि दमट वातावरण असते. असे वातावरण डासांच्या प्रजननासाठी उत्तम असते. पावसाळ्यात डबके साचणे आणि मोकळ्या जागेत साचलेल्या पाण्यामुळे या रोगांचा प्रसार वाढतो. याशिवाय, पाऊस पडल्यानंतर, खड्डे, बादल्या, उघडे नाले, फुलांच्या कुंड्या आणि इतर कंटेनर्समध्ये पाणी साचते. त्यामुळे डासांची पैदास वाढते. झपाट्याने होत असलेल्या शहरीकरणामुळे झोपडपट्ट्यांमध्ये वाढ झाली आहे. बहुतांशी शहरांमध्ये, गावांमध्ये कचरा व्यवस्थापन प्रणालींचा अभाव आहे. असल्यास ती पुरेशी सक्षम नाही. त्यामुळे डासांसाठी अतिरिक्त प्रजनन स्थळे निर्माण होऊन अशा आजारांच्या समस्या वाढतात.

नागपूरसारख्या शहरांमध्ये वाढत असलेली लोकसंख्येची घनता हे एरवी चर्चेत न येणारे एक कारण. दाट लोकवस्ती असलेल्या शहरी भागांत एकाला चावा घेतलेला डास दुसऱ्या व्यक्तीला चावण्याची शक्यता लक्षणीयरीत्या वाढते. शहरी झोपडपट्ट्यांमध्ये स्वच्छ पाणी आणि योग्य ड्रेनेज सिस्टिम यासारख्या मूलभूत सुविधांचा अभाव असतो. बाजारपेठा आणि गर्दीच्या भागांत कचरा व्यवस्थापनातील गोंधळ आणि अपुऱ्या ड्रेनेज सिस्टिम हे चित्र आता सरावाचे झालेले आहे. त्यामुळे ठिकठिकाणी पाणी साचते आणि ते रोगराईचे जन्मस्थळ ठरत असते. स्थलांतरित मजूरवर्ग शहरांमध्ये स्वच्छतेच्या अपुऱ्या सोयी असलेल्या तात्पुरत्या घरांमध्ये राहतो. त्यामुळे संक्रमण चक्राला गती मिळते. सार्वजनिक आरोग्य सेवा सुधारण्याचे प्रयत्न करूनही, महाराष्ट्राच्या आरोग्यसेवा सुविधांमध्ये लक्षणीय उणिवा आहेत. डॉक्टर्सचा अभाव, औषधांचा अभाव, वैद्यकीय उपकरणांचा अभाव, सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा अभाव अशा उणिवा प्रगत महाराष्ट्राला अद्याप दूर करता आलेल्या नाहीत. निदान लवकर झाले तर हे आजार नियंत्रणात येतातही. पण, त्यासाठी सरकारी दवाखान्यांमध्ये पुरेशी व्यवस्था हवी. ती नसणे ही फार मोठी समस्या आहे. गरिबांना खाजगी डॉक्टर किंवा रुग्णालयांमध्ये जाणे परवडत नाही. ते सरकारी इस्पितळांत जातात. पण, तेथे रुग्णांच्या रांगेसोबत अभावांची देखील रांगच असते. त्यामुळे निदान व उपचाराला वेळ लागतो आणि स्वाभाविकच रोगाचा प्रसार वाढत राहतो.

चिकनगुनिया आणि डेंग्यूचा प्रसार होण्यास कारणीभूत ठरणारा एक महत्त्वाचा घटक म्हणजे डास नियंत्रण आणि वैयक्तिक संरक्षणाबाबत जनजागृतीचा अभाव. अनेक रहिवाशांना डास चावण्यापासून बचाव कसा करावा किंवा प्रजनन स्थळे कशी संपवावी, याबद्दल माहिती नसते. मच्छरदाणी, रिपेलेंट्स वापरणे आणि लांब बाह्याचे कपडे घालणे यासारखे साधे प्रतिबंधात्मक उपाय मोठ्या प्रमाणावर वापरले जायला हवेत. घरे आणि कामाच्या ठिकाणांभोवती साचलेले पाणी काढून टाकले गेले पाहिजे. तेथे फवारणी केली गेली पाहिजे. बरेच लोक या आजारांना सामान्य विषाणूजन्य तापाची लक्षणे समजून वैद्यकीय उपचार घेण्यास उशीर करतात. त्यामुळे हे आजार गंभीर रुप धारण करतात आणि प्रसार सुलभ होत असतो. चिकनगुनियाबाबतीत सांधेदुखी आणि ताप यासारखी लक्षणे आठवडे किंवा महिनाभर टिकतात. चिकनगुनियाने ग्रस्त असलेल्या रुग्णांना वारंवार सांधेदुखीचा त्रास होतो. त्यामुळे दैनंदिन कामे करणे कठीण होते. या उद्रेकामुळे विशेषतः गरिबीत जगणाऱ्यांवर प्रचंड आर्थिक ताण पडला आहे. अनेक लोक आजारात काम करू शकत नाहीत. त्यामुळे त्यांचे उत्पन्न बंद होते. त्याच वेळी डॉक्टरकडे जाणे, औषधे आणि निदान चाचण्यांसह आरोग्यावरील खर्चाचा भारही वाढतो. सध्याच्या उद्रेकाचे परिणाम नियंत्रित करण्यासाठी आणि भविष्यात होणारे परिणाम रोखण्यासाठी, बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक आहे. रोगाचा प्रसार नियंत्रित करण्यासाठी तात्काळ उपाययोजना, सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा आणि दीर्घकालीन प्रतिबंधात्मक धोरणांचा विचार आता तरी प्राधान्याने व्हायला हवा. जास्त जोखीम असलेल्या भागात नियमित फॉगिंग केल्याने प्रौढ डासांची संख्या कमी होण्यास मदत होते. जनजागृती मोहिमा सुरू केल्या पाहिजेत. हे सारे करतानाच प्रादुर्भाव अधिक चांगल्या प्रकारे हाताळण्यासाठी आरोग्य व्यवस्था मजबूत करणे आवश्यक आहे. यामध्ये इस्पितळांच्या पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करणे, डॉक्टर्स आणि निमवैद्यकीय कर्मचाऱ्यांची संख्या वाढवणे, निदान साधने आणि उपचारांची उपलब्धता सुनिश्चित करणे यावर सरकारने लक्ष दिले पाहिजे. वेळेवर निदान आणि उपचार सुनिश्चित करण्यासाठी डेंग्यू आणि चिकनगुनियासाठी जलद निदान किट्सचे वितरण केले पाहिजे. तातडीची वैद्यकीय सेवा देण्यासाठी आणि शहरातील रुग्णालयांवरील भार कमी करण्यासाठी दुर्गम भागांत आणि झोपडपट्ट्यांमध्ये फिरते दवाखाने सुरू केले जाऊ शकतात.

चिकनगुनिया किंवा डेंग्यूसाठी कोणतेही विशिष्ट अँटीव्हायरल उपचार नाहीत. लस आणि अँटीव्हायरल औषधांवर संशोधन चालू आहे. सरकार आणि आरोग्य सेवा संस्थांनी लस विकसित करण्यासाठी आणि उपचार व्यवस्था सुधारण्यासाठी या रोगांवरील संशोधनासाठी निधी देण्यास प्राधान्य दिले पाहिजे. जागतिक आरोग्य संघटनेने डेंग्यू लसीची शिफारस केली आहे. डेंगव्हॅक्सिया या नावाच्या लसीचा वापर आपल्याकडे होतो, असे ऐकिवात आले नाही. पण, इतरत्र तिचा फायदा होत असल्यास भारतातही वापर व्हायला हरकत नाही. उच्च प्रसारण दर असलेली क्षेत्रे, उच्च जोखीम असलेल्या भागात लक्ष्यित लसीकरण मोहिमेचा फायदा महाराष्ट्राला होऊ शकतो. संशोधक चिकनगुनिया लसीवरही संशोधन करीत आहेत. तिचा विकास आणि वितरण जलदगतीने करण्यासाठी क्लिनिकल चाचण्या आणि संशोधनासाठी पाठबळ दिले पाहिजे. या संकटाचा सामना करण्यासाठी सरकार आणि स्थानिक समुदायांचा सहभाग आवश्यक आहे. सार्वजनिक शिक्षण, आरोग्यसेवा पायाभूत सुविधा आणि नियंत्रणात्मक उपायांची सांगड घालून या आजारांचा प्रसार रोखला जाऊ शकतो. पण, त्यासाठी समज हवी आणि इच्छाशक्तीही हवी.

## चिंतन

**गुरुदत्त दिनकर वाकदेकर**

# सायबर फसवणुकीचे कारण - लोभ

आज इंटरनेट हा सर्वसामान्यांच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे, या तंत्रज्ञानावरील वाढत्या अवलंबित्वामुळे त्याच्याशी संबंधित समस्याही समोर येऊ लागल्या आहेत. सायबर फसवणुकीशी संबंधित बातम्या मिळत नाहीत, असा एकही दिवस जात नाही. या फसवणुकीपासून सामान्य जनतेचे रक्षण करण्यासाठी बँका, पोलिसांसह सर्व यंत्रणांद्वारे सातत्याने आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी बँक खाते क्रमांक, पिन, पासवर्ड, ओटीपी इत्यादी कोणत्याही व्यक्तीला सांगू नयेत, कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक करू नये. व्हिडीओ कॉलमुळे लोक या टोळीच्या तावडीत अडकत आहेत आणि आयुष्यभर कष्टाने कमावलेले पैसे गमावत आहेत. एक निवृत्त अधिकारी सायबर गुंडांच्या जाळ्यात अडकून एक कोटींहून अधिक रुपये गमावल्याची घटना नुकतीच समोर आली आहे. या प्रकरणात, फसवणूक करणाऱ्या टोळीच्या सदस्याने बँकेतील घोटाळ्याचा हवाला देत व्हॉट्सॲप कॉलद्वारे वापरकर्त्याच्या खात्याची संपूर्ण माहिती मिळवली आणि त्याच्या खात्यामधून एक कोटीहून अधिक रुपये ट्रान्सफर केले. दुसरी घटना राजधानीमधील आहे, जिथे फसवणूक करणाऱ्यांनी एका इंस्टाग्राम वापरकर्त्या डॉक्टरला गेमिंग कंपनीत पैसे गुंतवून ४० टक्के नफा देण्याचे आश्वासन देऊन ९० लाख रुपयांची फसवणूक केली. शेअर बाजारात पैसे दुप्पट करून, घरी बसून लाखोंची कमाई आणि मोठमोठी बक्षिसे मिळवण्याची स्वप्ने सर्वसामान्यांना दाखवून सायबर घोटाळेबाज लाखो-करोडो रुपयांची फसवणूक करत आहेत, हे विशेष. आजकाल चोरी, दरोडा, फसवणूक आणि महामार्गावरील दरोड्याच्या घटनांमध्ये घट झाली आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही, उलट फसवणूक करणाऱ्यांनी लूटमारीचा, डिजिटल फसवणुकीचा नवा मार्ग शोधला आहे. आश्चर्याची बाब म्हणजे केवळ अशिक्षित किंवा कमी शिकलेले लोकच सायबर फसवणुकीचे बळी ठरत नाहीत तर डॉक्टर, सॉफ्टवेअर इंजिनीअर, उच्चशिक्षित प्राध्यापक, लष्करी आणि उच्च प्रशासकीय अधिकारीही बळी पडत आहेत.

सायबर गुन्ह्यांचे संशोधन करणाऱ्या आंतरराष्ट्रीय अहवालानुसार सायबर गुन्ह्यांमध्ये भारत दहाव्या क्रमांकावर आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मते २०२३-२४ मध्ये कार्ड आणि इंटरनेट फसवणुकीची एकूण २९०८२ प्रकरणे नोंदवली गेली आहेत. इंडियन सायबर क्राईम कोऑर्डिनेशन सेंटरच्या म्हणण्यानुसार, या वर्षी जानेवारी ते मे दरम्यान १२०३ कोटी रुपयांच्या डिजिटल फसवणुकीची ४५९९ प्रकरणे नोंदवण्यात आली. एका अंदाजानुसार, गेल्या चार महिन्यांत सुमारे ४०० कोटी रुपयांची डिजिटल फसवणूक झाली आहे. या प्रकारच्या फसवणुकीच्या प्रकरणांवर नजर टाकली तर, लोभ, भीती, व्यक्तीचे अज्ञान ही कारणे त्याला प्रामुख्याने कारणीभूत आहेत. संसदेत सादर केलेल्या अहवालानुसार, देशातील पाच राज्ये उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान आणि हरियाणा ज्यामध्ये उत्तर प्रदेश यात आघाडीवर आहे. सायबर गुन्ह्यांशी संबंधित प्रकरणांचा तपास करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मते, दक्षिण पूर्व आशियातील प्रमुख शहरांसह देशातील विविध राज्यांमधून सायबर फसवणुकीत एक टोळी कार्यरत आहे. भारतात झारखंडचे जामतारा शहर या फसवणुकीसाठी सर्वाधिक कुप्रसिद्ध होते, परंतु आता देवधर, दिल्ली, उत्तर प्रदेशचे आझमगढ, मथुरा, बिहारचे गोपालगंज, हरियाणाचे मेवात, भिवानी आणि नूह, गुजरातचे अहमदाबाद आणि सुरत, राजस्थानचे भरतपूर, पश्चिम बंगालचे दुर्गापूर आणि आसनसोल आणि आंध्र प्रदेशचे चित्तूर फसवणुकीसाठी कुप्रसिद्ध झाले आहेत. आश्चर्याची बाब म्हणजे या आंतरराज्य टोळीचे दुबई, चीन, श्रीलंका, नेपाळ, कंबोडिया, म्यानमार आणि लाओससारख्या देशांशी संबंध जोडलेले आहेत.

तथापि, भारतातील मुख्यतः सामान्य लोक हॅकिंग, खंडणी, बनावट समाजमाध्यमाची खाती आणि बनावट व्हॉट्सॲप कॉल, बनावट ट्रेडिंग ॲप्स, कर्ज, गेमिंग, मनी लाँड्रिंग, डेटिंग आणि मॅट्रिमोनियल ॲप्स, क्रिप्टो, पेटीएम आणि यूपीए पासवर्ड किंवा पिन यामुळे चिंतेत आहेत. मिळालेल्या ओटीपीद्वारे ते सायबर फसवणुकीचे बळी ठरत आहेत. सेक्सटोर्शन हे खरे तर 'सेक्स' आणि 'एक्सटॉर्शन' या दोन शब्दांचे मिश्रण आहे, हे एक प्रकारचे ब्लॅकमेलिंग आहे. यामध्ये सायबर गुन्हेगार महिला किंवा मुलीच्या नावाने सोशल मीडियावर मैत्रीचे मेसेज पाठवतात, ते स्वीकारल्यानंतर ही टोळी लोकांशी अश्लील बोलू लागते आणि चॅटिंग करून, त्यांना व्हिडीओ कॉलसाठी प्रवृत्त करतात. या सापळ्यात अडकल्यानंतर, जेव्हा वापरकर्ते व्हिडीओ कॉल करतात तेव्हा गुन्हेगार त्याचा एक नग्न व्हिडीओ बनवतो. यानंतर टोळीचे सदस्य पोलिस अधिकारी म्हणून वापरकर्त्याला धमकावत अनेकवेळा हा अश्लील व्हिडिओ यूट्यूबवर अपलोड करण्याची धमकी देतात. बदनामी होण्याच्या भीतीने सहसा पीडित पक्ष हे प्रकरण पोलिसांकडे नेण्यास टाळाटाळ करतात आणि फसवणूक करणाऱ्या टोळीच्या तावडीत अडकून लाखोंचा ऐवज गमावतात. मिळालेल्या माहितीनुसार, अनेक प्रभावशाली अधिकारी, व्यापारी, राजकारणी, सेवाभावी लोक आणि तरुण वर्ग सायबर चोरीच्या चक्रव्यूहात अडकत असून, त्यांची प्रतिष्ठा धुळीस मिळण्याच्या भीतीने त्यांना आपल्या भांडवलासह आपला जीव गमवावा लागत आहे. तथापि, सावधगिरी आणि संयमाने सेक्सटोर्शनसारखी फसवणूक टाळता येऊ शकते. कोणत्याही महिलेची किंवा मुलीची फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारण्यापूर्वी वापरकर्त्यांनी योग्यरीत्या पडताळणी करावी. समाजमाध्यमांवर कोणत्याही वापरकर्त्याने तुम्हाला अश्लील मेसेज किंवा व्हिडीओ पाठवल्यास त्याची तक्रार तात्काळ सायबर सेलकडे करावी जेणेकरून गुन्हेगारांवर अंकुश ठेवता येईल.

भारतात सायबर फसवणुकीच्या वाढत्या घटनांच्या संदर्भात, हे लक्षात घेण्यासारखे आहे की, देशातील मोठी लोकसंख्या डिजिटल तंत्रज्ञानाच्या बाबतीत जवळजवळ निरक्षर आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच 'एआय' आता अशा घटनांमध्ये आणखी वाढ करत आहे. सायबर फसवणुकीची वाढती प्रकरणे सरकार आणि समाजासाठी सतत आव्हान बनत आहेत, यात शंका नाही, परंतु लोभ, भीती आणि अज्ञान यांसारख्या वृत्ती त्याला प्रामुख्याने जबाबदार आहेत. केवळ आत्मनियंत्रण, चारित्र्य शुद्धता, डिजिटल जागरूकता आणि याद्वारे फसवणुकीचे प्रकार थांबवता येतात. दक्षता या प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी, फसवणूक झाल्याचा संशय असलेल्या अज्ञात क्रमांकांवरून येणारे व्हिडिओ कॉल त्वरित ब्लॉक केले जावेत. याशिवाय तुम्ही तुमचा एटीएम कार्ड पिन, मोबाईल फोनचे पासवर्ड आणि इतर डिजिटल गॅजेट्स कधीही कोणाशीही शेअर करू नका. तुम्ही फसवणुकीला बळी पडल्यास, संबंधित बँक आणि सायबर क्राईमशी त्वरित संपर्क साधा. दुसरीकडे, माहिती तंत्रज्ञान कायदा २००० आणि दुरुस्ती २००८ व्यतिरिक्त, देशातील सायबर गुन्ह्यांबाबत तक्रारी नोंदवण्यासाठी हेल्पलाईन क्रमांक आणि वेबसाईटसह भारतीय दंड संहिता १८६० च्या विविध कलमांतर्गत कारवाईची तरतूद आहे, परंतु इंटरनेटमुळे निर्माण होणारे धोके अमर्यादित आहेत, त्यामुळे भारत सरकारने असा कडक कायदा बनवला पाहिजे की ज्यामुळे लोकांची सुरक्षा आणि आर्थिक सुविधा तसेच सायबर गुन्हेगारांवर त्वरित कारवाई होईल.

९९८७७४६७७६


## वेध

**गिरीश शेरेकर**

# धरणांची चिंता मिटली, पिकांची मात्र कायम

जून महिन्यात पावसाने अपेक्षेनुरूप हजेरी न लावल्याने सर्वांचीच चिंता वाढली होती. जूनच्या शेवट व जुलैच्या सुरुवातीला पाऊस आला. पण, अपेक्षित सरासरी इतकी त्याची नोंद झाली नसली तरी पिकांची स्थिती चांगली होती. हवामान विभागाने अंदाज वर्तवून जुलैच्या शेवटी व ऑगस्ट महिन्यात पाऊस तुट भरून काढेल, असा अंदाज वर्तविला. त्यानुसार पावसाने तुट भरून काढली असून राज्यात आतापर्यंत सरासरी ९० टक्क्यांपेक्षा जास्त पाऊस झाला आहे. पावसाळ्याचे आणखी २० दिवस शिल्लक आहेत आणि वातावरण ढगाळ आहे. या दिवसात पावसाची टक्केवारी शंभरपार होण्याची शक्यता आहे. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात राज्यातील १० जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी झाल्याने ८.५ लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. अन्य काही ठिकाणी अतिपावसाने पिके थोडी खराब झाली आहे. हे एक संकट वगळता आतापर्यंतचा पाऊस सगळीकडे समाधानकारक झाला आहे. बहुतांश भागात पिकांची स्थिती चांगली आहे. धरणे भरली असून पिण्याच्या पाण्याची, सिंचनाची आणि उद्योगांना लागणाऱ्या पाण्याची चिंता मिटली आहे. चांगल्या पावसाचा रब्बी हंगामाला फायदा होतो.

चांगल्या पावसामुळे राज्यातील १३८ मोठ्या धरणांतील सरासरी पाणीसाठा ९२ टक्क्यांपेक्षा जास्त झाला आहे. २६० मध्यम प्रकल्प ७१ टक्के भरले असून २,५९९ लघु प्रकल्पांत ५० टक्के साठा झाला आहे. विद्यमान स्थितीत सर्व प्रकल्प मिळून ४१७१२.९७ दशलक्ष घनमीटर इतका पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. १३८ मोठ्या धरणांपैकी ४० धरणे शंभर टक्के भरली आहेत. तर ४५ धरणांमध्ये ९० टक्क्यांच्या वर पाणी आहे. ३५ धरणे ७० टक्क्यांच्या वर भरली आहेत. ९० टक्क्यांच्या वर भरलेल्या धरणातून नियमानुसार विसर्ग सुरू आहे. राज्यातल्या मोठ्या प्रकल्पांची साठवण क्षमता ३५५४३.२९ द.ल.घ.मी असून सध्या ३३५८६.०१ द.ल.घ.मी. इतका साठा आहे. त्याची टक्केवारी ९२.८९ आहे. राज्यातल्या २६० मध्यम प्रकल्पांची साठवण क्षमता ६१८२.४४ दलघमी आहे. सध्या या प्रकल्पांमध्ये ४५९३.२७ दलघमी म्हणजे ७१.३५ टक्के साठा आहे. राज्यातील २,५९९ लघु प्रकल्पांची साठवण क्षमता ६५२९.११ दलघमी असून या प्रकल्पात सध्या ३५३३.४५ दलघमी साठा आहे. टक्केवारीत तो ४९.४१ टक्के आहे. एकत्र सर्व प्रकल्पांची उपयुक्त पाणीसाठ्याची टक्केवारी ८३.६० आहे. गतवर्षी ती याचवेळी फक्त ६६.३ टक्के होती. जवळपास २० टक्के वाढ झाली आहे.



मोठी व मध्यम धरणे पूर्ण क्षमतेने भरली की दोन वर्षांची चिंता मिटते, असे म्हटले जाते. यंदाच्या पावसामुळे खरोखरच ती मिटली आहे. कारण, याच प्रकल्पांवर पाणी पुरवठा योजना व सिंचनाला पाणी देण्याची व्यवस्था केलेली असते. उद्योगांना पाणी देणे शक्य होणार आहे. चांगल्या पावसाने पुढचा धोका संपुष्टात आला आहे. धरणांमध्ये उपयुक्त पाणी नसले की पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. राज्याने अनेकवेळा दुष्काळाची स्थिती अनुभवली आहे. मराठवाडा व विदर्भाला त्याच्या झळा तीव्रतेने बसतात. यंदा हा धोका खूप कमी झाला आहे. पावसाळ्यात धरणे भरली नाही तर त्यात अन्य ठिकाणांवरून पाणी आता येत नाही. पावसाच्या पाण्याशिवाय त्याला पर्याय नसतो. एकवेळ जास्त पावसामुळे खरिपातील पीक उत्पादनात तूट आली तर रब्बी हंगामात ती भरून काढता येते. अनेकदा असे झाले आहे. यंदा सप्टेंबरच्या सुरुवातीला काही ठिकाणी झालेली अतिवृष्टी वगळता राज्यात पिकांची स्थिती चांगली आहे. आता चिंता आहे ती परतीच्या पावसाची! हा पाऊस हातातोंडाशी आलेला घास हिसकावून घेतो, हा पुर्वानुभव आहे. त्यानुसार त्याने यंदा धुमाकूळ घालू नये, अशी माफक अपेक्षा शेतकऱ्यांना आहे. यावेळी तो शांतपणे निघून गेला तर शेतकऱ्यांसाठी तो मोठा दिलासा असेल. स्थिती लक्षात घेता त्याची तीव्रता कमी राहण्याची शक्यता आहे. तसे झाले तर खरिपातील उत्पादन चांगले होईल. रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांमध्ये उत्साह संचारेल. पाऊस व्यवस्थित झाल्याने रब्बीतले उत्पादन वाढू शकते. दोन्ही हंगामाचे उत्पादन समाधानकारकपणे शेतकऱ्यांच्या पदरात पडले तर, तो त्यांच्यासाठी सुवर्णकाळ ठरेल. हा काळ शेतकऱ्यांना अनुभवायला मिळेल, अशी प्रार्थना आपण वरुणराजाकडे करूया.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# ज्ञानेश्वर माउलींनी चितारलेला वाङ्मय गणेश!

भगवान गणेशांना हिंदू संस्कृतीत अग्रपूजेचा मान आहे. गणपती बाप्पा म्हटलं की, त्यांचे रूप आणि स्वरूप डोळ्यांसमोर येते ते गजमुख, लंबोदर, शूर्पकर्ण, चतुर्भुज, पाशांकुश इत्यादी. हेच स्वरूप माउलींनाही अपेक्षित आहे, पण माउली म्हणजे महावैष्णव आहेत. त्यामुळे त्यांनी श्रीगणेशाचे अरूपाचे वाङ्मय रूप ज्ञानेश्वरीत गोड शब्दात मांडले आहे. ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायातच-

*देवा तुची गणेशु । सकलार्थ मती प्रकाशू ।*
*म्हणे हा निवृत्तीदासू । अवधारिजोजी ॥२॥*

भगवान गणपतीला 'मती प्रकाशू' म्हटले आहे. सकलांना सकल मती देणारे, ज्ञानाचा प्रकाश देणारे बुद्धिदाता गणेश आहेत. भगवान गणेशाचे मूर्तिमंत वाङ्मय स्वरूप उपजतांच ज्ञानी असल्यामुळे केवळ ज्ञानेश्वर माउलीच रेखाटू शकतात. माउलींनी पहिल्याच अध्यायात केलेले गणेश वर्णन म्हणजे 'शब्द जैसे कल्लोळ अमृताचे' असेच आहे. पुढील दिव्य वर्णनावरून आपल्याला ते सहज लक्षात येईल.

*हें शब्दब्रह्म अशेष । तेचि मूर्ति सुवेष । तेथ वर्णवपु निर्दोष । मिरवित असे ॥३॥*

भगवान गणेश 'शब्दब्रह्म' म्हणजे वेद स्वरूप आहेत. आता या पलीकडे काहीच शिल्लक नाही. त्यात वर्णमालेतील सर्व निरातिशय निर्दोष असे वर्ण हेच त्यांचे उपांग, असे त्यांचे स्वरूप.

*स्मृति तेचि अवयव । देखा आंगिक भाव ।*
*तेथ लावण्याची ठेव । अर्थशोभा ॥४॥*

आपल्या सनातन संस्कृतीत निरनिराळ्या स्मृती सांगितल्या आहेत. अशा याज्ञवल्क्यादी स्मृती म्हणजे भगवान श्रीगणेशाची अवयवे आहेत. या स्मृतीतील गर्भितार्थ सौंदर्य म्हणजे गणेशाचे लावण्य लक्षण होय.

*अष्टादश पुराणें । तिची मणिभूषणें । पदपद्धति खेवणें । प्रमेयरत्नांचीं ॥५॥*

अठरा पुराणे म्हणजे भगवान गणेशाचे रत्नजडीत अलंकार होत. बरं! हे अलंकार साधेसुधे नसून या पुराणरूपी अलंकारात सिद्धांत आणि दृष्टांतरूपी हिरेमोती रत्ने आणि तीही काव्यशास्त्र-विनोदाच्या पद्यकोंदणात म्हणजे काव्यकोंदणात नेमकी जडणघडण केलेली आहेत.

*पदबंध नागर । तेंचि रंगाथिले अंबर ।*
*जेथ साहित्य वाणें सपूर । उजाळाचें ॥६॥*

भगवान गणेशाचे वर्णन करताना माउलींनी गोड शब्द वापरला 'पदबंध नागर.' इथे पदबंध म्हणजे शब्दसौंदर्य, शब्दबद्धता आणि नागर म्हणजे नागरी अर्थात आपली वाटणारी, सहज उमगणारी अशी सुंदर मातृभाषा होय. अशा सहज संक्रमित होणाऱ्या शब्दांचे विविधरंगी वस्त्र आणि तेही साहित्य धाग्यांनी विणलेले आणि शब्दरचनेत अनुप्रासादी वाङ्मयीन अलंकार वापरले जातात; तो या वस्त्राचा पोत आहे. असे वस्त्र श्रीगणेशांनी परिधान केलेले आहे.

*देखा काव्य नाटका । जे निर्धारितां सकौतुका ।*
*त्याचि रुणझुणती क्षुद्रघंटिका । अर्थध्वनि ॥७॥*

काव्य नाटकरूपी घुंगुरतोडे त्यांच्या पायात ज्यांच्यातून येणारा गोड ध्वनी रुणझुणतो.

*नाना प्रमेयांचि परी । निपुणपणें पाहतां कुसरी ।*
*दिसती उचित पदें माझारीं । रत्नें भलीं ॥८॥*

भगवान गणेशाने जी रत्ने परिधान केली ती प्रमेयरूपी आहेत.

*तेथ व्यासादिकांच्या मतीं । तेचि मेखळा मिरवती ।*
*चोखाळपणें झळकती । पल्लवसडका ॥९॥*

भगवान गणेशाच्या कमरेला बांधलेला शेला हा व्यासांसारखे अनेक जे कविगण आहेत, त्यांच्या बुद्धिमतीचा आहे.

*देखा षड्दर्शनें म्हणिपती । तेची भुजांची आकृति ।*
*म्हणवोनी विसंवादे धरिती । आयुधें हातीं ॥१०॥*

आपल्या संस्कृतीतील षड्दर्शने म्हणजे गणेशाची आयुधे. एरवी श्रीगणेश चतुर्हस्तम् आहेत, पण माउलींचा गणेश सहा हातांचा आहे.

*तरी तर्कु तोचि फरशु । नीतिभेदु अंकुशु ।*
*वेदांतु तो महारसु । मोदकु मिरवे ॥११॥*

त्यातील तर्कशास्त्र म्हणजे श्रींच्या हातातील परशू, न्यायशास्त्र जणू अंकुश तर हातातील मोदक म्हणजे वेदांत महारस होय.

*एके हातीं दंतु । जो स्वभावता खंडितु ।*
*तो बौद्धमतसंकेतु । वार्तिकांचा ॥१२॥*

एका हातातील खंडित दंत म्हणजे भगवान बुद्धांचा अज्ञेय शून्यवाद होय.

*मग सहजें सत्कारवादु । तो पद्मकरु वरदु ।*
*धर्मप्रतिष्ठा तो सिद्धु । अभयहस्तु ॥१३॥*

सांख्यशास्त्र, धर्मसूत्रे म्हणजे अभयकर अर्थात वरदहस्त होय.

*देखा विवेकवंतु सुविमळु । तोचि शुंडादंडु सरळु ।*
*जेथ परमानंदु केवळु । महासुखाचा ॥१४॥*

निरक्षिर विवेकाची महासुख देणारी सरळ सोंड ज्यांची आहे ते गणेश.

*तरी संवादु तोचि दशनु । जो समता शुभ्रवर्णु ।*
*देवो उन्मेषसूक्ष्मेक्षणु । विघ्नराजु ॥१५॥*

आपले तत्त्वज्ञान संवादावर आधारित आहे. भगवान गणेशाचा शुभ्र दात म्हणजे विधायक संवाद आहे.

*मज अवगमलिया दोनी । मीमांसा श्रवणस्थानीं ।*
*बोधमदामृत मुनी । अली सेविती ॥१६॥*

पूर्वमीमांसा आणि उत्तरमीमांसा हे श्रीगणेशाचे कान असून त्यांच्या गंडस्थळातून पाझरणारे ज्ञानामृत मुनीरुपात असणारे भुंगे ग्रहण करीत आहेत.

*प्रमेयप्रवाल सुप्रभ । द्वैताद्वैत तेचि निकुंभ ।*
*सरिसेपणें एकवटत इभ । मस्तकावरी ॥१७॥*

जिथे द्वैत आणि अद्वैत एकवटतात असे श्रीगणेशाचे शरीर ज्यावर श्रुतिस्मृतीतील तत्त्वज्ञान पोवळ्यांच्या रूपाने आहे.

*उपरि दशोपनिषदें । जियें उदारें ज्ञानमकरंदे ।*
*तियें कुसुमें मुगुटीं सुगंधें । शोभती भलीं ॥१८॥*

श्रीगणेशाच्या अंगावरील सुगंधित फुले म्हणजे दशोपनिषद आहेत.

*अकार चरणयुगल । उकार उदर विशाल ।*
*मकार महामंडल । मस्तकाकारें ॥१९॥*

भगवान गणेशाचे नितांतसुंदर असे ओंकार स्वरूप माउलींनी शब्दात चितारले आहे. ॐकारातील अकार हे चरणयुगुल आहे, उकार गणेशाचे विशाल उदर तर मकार हे मस्तक आहे.

*हे तिन्ही एकवटले । तेथ शब्दब्रह्म कवळलें ।*
*तें मियां श्रीगुरुकृपा नमिलें । आदिबीज ॥*

हे अकार, उकार आणि मकार एकवटून शब्दब्रह्म तयार झाले. तेच आदिबीज म्हणजे ॐ कार गणेश होय. माउलींनी चितारलेले हे वाङ्मय गणेश माउलींच्या उपजत प्रतिभेचे दर्शन होय. चार वेद, सहा शास्त्र, विविध उपनिषद, अलंकार, प्रमेय या सर्व साहित्य कृती आणि साहित्य भागांच्या वापरातून निर्माण केलेले भगवान गणेशस्वरूप अनन्यसाधारण आहे. हाच तर ब्रह्मरस गणेश आहे.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### समाज दखल घेतो...

रविवार ८ सप्टेंबरच्या तरुण भारतात 'श्रीमद्‌भागवत श्रवण- दिव्य अनुभूती' हे ज्येष्ठ माजी संपादक व समीक्षक ल. त्र्यं. जोशी यांचे पत्र वाचण्यात आले. त्यांनी त्यांच्या आठवणी, अनुभव कथन करताना भागवत कथाकार ह. भ. प. अभिजीत श्रीराम जोशी यांची वैशिष्ट्येदेखील नमूद केली आहेत.

अभिजीत हे सुप्रसिद्ध भागवत कथाकार श्रीरामपंत जोशी यांचे चिरंजीव असून त्यांचा सशक्त वारसा पुढे नेत आहेत. प्रताप नगरमधील श्री दुर्गा मंदिर देवस्थानमध्ये श्रीरामजी यांनी तब्बल १६ वर्षे भागवत कथा सेवा दिली आहे. सध्या त्यांच्या वार्धक्यामुळे अभिजीत यांनी ही उणीव भरून काढली, ही देवस्थान व सर्व श्रोत्यांसाठी आनंदाची बाब आहे. लक्ष्मणरावांनी या आयोजन निमित्ताने देवस्थान व्यवस्थापनाबद्दल जे कौतुकास्पद लिहिले आहे, त्याकरिता विश्वस्त मंडळ त्यांचे आभारी आहे. देवस्थानने आयोजित केलेल्या कार्यक्रमांचे कसे सकारात्मक पडसाद उमटतात, हे या सूचक समीक्षेतून कळते आणि कौतुकाची थाप पाठीवर पडली की विश्वस्त मंडळींना देखील हुरूप येतो. समाजातील भाविकांच्या सात्त्विक आनंदासाठी विश्वस्त मंडळी सतत कार्यरत राहतील, अशी एक विश्वस्त म्हणून ग्वाही देतो.

**संजय पाठक**/९४२२१४७६७७

### कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ

'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' जेव्हा आपलाच सगासोयरा, नात्यातला, गोतातला आपल्या जिवावर उठतो तेव्हा ही म्हण वापरली जाते. कुऱ्हाडीचा दांडा लाकडाचाच असतो व तो उचलूनच झाड म्हणजे त्या लाकडाचेच गणगोत, भाऊबंद तोडले जातात. एक प्रकारे लाकडी दांडाच आपल्याच गणगोताचा काळ ठरतो. आजच्या शिवसेना उद्धव ठाकरे यांच्या पक्षाबाबत ही उक्ती तंतोतंत लागू पडते. पक्षाचे नेते, प्रवक्ते खासदार संजय राऊत सातत्याने आपल्या विधानाने पक्षाचे म्हणजे उद्धव ठाकरे तसेच स्वतःचे हसू तर करून घेतात पण त्यापेक्षा पक्षाचे नुकसान जास्त करतात. आज शिवसेना उद्धव ठाकरेंची जी अवस्था आहे तिला पक्षातील नेते मंडळीच कारणीभूत आहेत. भाजपा आणि शिवसेना यांच्यात मुख्यमंत्री पदावरून गेल्या विधानसभा निकालानंतर जे राजकारण झाले त्यावेळी स्वतः उद्धव ठाकरे यांनी राजकीय सामंजस्य दाखविणे आवश्यक होते. काही मार्ग निघतो का, हे पाहणे गरजेचे होते. पण आपल्या पक्षाचे सर्व अधिकार संजय राऊत यांच्यासारख्यांना त्यांनी दिले असल्याने त्यांनी आपल्या कुवतीप्रमाणे शरद पवार यांच्याशी युतीसंबंधी बोलणे सुरू ठेवले. शरद पवारांनी आपल्या राजकीय अनुभवाचा फायदा घेत मुख्यमंत्रिपद उद्धव ठाकरे शिवसेनेला देऊन एका फटक्यात शिवसेनेचे हिंदुत्वाचे राजकारण पूर्णतः संपविले. पण त्यापेक्षा एकसंघ शिवसेना त्यांनी संपवली. आज शिवसेना पक्षात फुट पडून अडीच तीन वर्षे पार पडली आहेत. यानंतर देशाच्या लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या त्या निकालात दोन शिवसेना गटांपैकी कोणत्या गटाला राज्यातील जनतेचा पाठिंबा आहे, हे दिसून आले आहे. या निकालाचे खरे तर उद्धव ठाकरे यांनी विश्लेषण करावयास पाहिजे होते पण आज ही तीच जपमाळ ते ओढताना दिसतात. आज त्यांनी राजकीय परिपक्तता दाखवत आपला कोण हितचिंतक आणि कोण हितशत्रू ओळखले पाहिजे. कारण, येणारी विधानसभा निवडणूक उद्धव ठाकरेंना तसेच त्यांच्या पक्षाला राज्यात पुढे भवितव्य आहे की नाही, हे ठरविणार आहे.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

### ढोल-ताशे, डीजे आणि लेझर

यंदाच्या गणेशोत्सवात गणेश चतुर्थीच्या दिवशी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांत बाप्पांचे अगदी थाटात आणि उत्साहात आगमन झाले. यावेळी ढोल-ताशा पथकांचा वापर अनेक मंडळांनी बाप्पाच्या आगमनप्रसंगी केला. त्याच्या प्रचंड आवाजाचा विचार मंडळांनी का केला नाही? लहान बालके आणि वृद्धांना त्याचा किती त्रास होतो, याबाबत बाप्पाच्या भक्तांनी विचार करणे आवश्यक आहे. त्यांच्यात श्रवणदोष निर्माण होऊ शकतो. डीजेवर अप्रासंगिक गाणी अतिशय मोठ्या आवाजात वाजवून त्यावर ओंगळ नृत्य करणे अशोभनीय आहे. आजकाल अतिशय प्रखर लेझर किरणांचा वापर बाप्पाच्या मिरवणुकीत करण्यात येतो. त्याच्या दुष्परिणामाचा विचार कोण करणार? मिरवणुकीत सहभागी झालेल्या अनेकांचे डोळे इजा झाल्याने लाल झाल्याचे आढळले आहे. काही व्यक्तींना नेत्ररोग तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा लागलेला आहे. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाचे आजकालचे स्वरूप योग्य आहे का? बाप्पांच्या मिरवणुकीमुळे नागरिकांना मनस्ताप आणि आरोग्यावर घातक परिणाम होणे गणेशोत्सव मंडळांना आवडेल का? अनंत चतुर्दशीला बाप्पांच्या विसर्जन मिरवणुकीत ढोल-ताशे आणि डीजे यांच्या आवाजावर नियंत्रण असावे. लेझर आणि बीम लाईटचा वापर अजिबात करू नये, ही आग्रही सूचना आणि कळकळीची विनंती!

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

तरुण भारत

# छोटे उस्ताद

## तुम्हाला माहिती आहे का?

- ‘वॉर ॲण्ड पीस’ हे पुस्तक लिओ टॉलस्टॉय यांनी लिहिले आहे.
- पहिल्या अफगाण युद्धाला १८३९ मध्ये सुरुवात झाली.
- ग्रीनलॅण्ड हे पृथ्वीवरील सर्वात मोठे बेट आहे.
- आफ्रिका हा पृथ्वीवरील सर्वात उष्ण खंड आहे.
- कोला हे प्राणी नीलगिरी झाडाची पानं खातात.

## अशी पाखरे येती...

**निशिकांत मायी** / ९८८११५२४३९

## कस्तूर

भर पावसाळ्यात डोंगररांगांमध्ये भटकंती करीत असताना अनेक पर्यटकांना संमोहून टाकणारी सुरेल अशी लांबलचक शीळ ऐकू येते अन्? अनायास पर्यटकांचे कान टवकारले जातात, त्या सुमधूर आवाजाच्या दिशेने! नेमका आवाज कुठून येतो, हे मात्र कळत नाही. मात्र, कुणी व्यक्तीच शीळ घालत असावी, असे काही क्षण वाटून जाते. खरं तर ती शीळ असते कस्तूर या पक्ष्याची! कस्तुराच्या कंठातून बाहेर पडणारी शीळ वातावरणाला रम्य करते. साधारणपणे कबुतराच्या आकाराचा कस्तूर हा पक्षी जंगलातील पाणथळ जागेच्या परिसरात आढळून येतो. याला काळा कस्तूर किंवा कस्तुरी, गायकवाड, सालई आदी नावांनीही ओळखतात. कस्तूरची चोच पिवळी असून रंग संपूर्ण काळा असतो. मादीचा कंठ




काळ्या रेषा असलेला पिवळट तपकिरी वर्णाचा असतो आणि चोच काळी असते. केवळ भारत आणि श्रीलंकेच्या डोंगराळ भागात आढळून येणारा कस्तूर हिवाळी पक्षी म्हणून अन्यत्र स्थलांतरितही होतात. सदा बहरलेल्या वनांमध्ये ते आपले वास्तव्य करतात. लांब आणि टोकदार चोच असणा?्या कस्तूरच्या पंखांवर ठिपके असल्याचे दिसून येते. वृक्षवासी असणारे कस्तूर मध्यम आकारमानाचे असतात. फळे, कीटक, कृमी आणि गोगलगाय हे यांचे भक्ष्य असून गाणारे पक्षी म्हणून सकाळ-संध्याकाळ अक्षरश: शीळेच्या माध्यमातून गात सुटतात. मात्र, प्रजोत्पादनाच्या काळातच नर मंजुळ स्वरात गातो. अन्य पक्ष्यांच्या आवाजाची नक्कलही करतो. यांचे घरटेही लक्षणीय असते. वाटीसारखे सपाट असलेल्या कस्तुरीच्या घरट्यात मादी तब्बल ३५ अंडी घालते. सर्वभक्षी कस्तूर झाडावर फळे खातानाही दिसतो. जंगलातील जमिनीवर गांडुळे व तत्सम कीटक शोधण्यात रमलेला जमिनीवर उड्याही मारतो. असे असले तरी, लाजरी अशी ही जमात असल्याने शक्यतो मनुष्य वस्तीजवळ येत नाहीत. पावसाळा हा या पक्ष्यांचा अतिशय आवडीचा काळ आहे. याच कालावधीत मादीच्या विणीचा हंगाम असतो. यामध्ये, निळ्या रंगांचेही कस्तूर असतात. त्यांच्या पंखांवरील निळाई ही डोंगरांवर किंवा किल्ल्याच्या भिंतींवर चालताना झळाळून उठते अन्? पाहणाऱ्याला या निळ्या रंगाचे सहज दर्शन होते. या निळ्या टोपीचा कस्तूर असेही म्हणतात.

## पुस्तके वाचतांना...

थुंकी लावून पुस्तकांची,
उलटू नयेत पाने
वाचतांना दुमडू नयेत,
त्यांचे कानेकोने

शब्द आणि वाक्याखाली,
ओढू नयेत रेघा
वेड्यावाकड्या चित्रांनी,
रंगवू नयेत जागा



कानेकोपरे फाडून, त्यांना
पोहचवू नये इजा
हेळसांड टाळून, त्यांच्या
सुरक्षेस्तव झिजा

ओबड धोबड दाढी मिशा,
काढू नयेत चित्रांना
वेळीच अद्दल घडवावी,
अशा वेड्या मित्रांना

पुस्तकं देतात ज्ञान,
म्हणून राखा त्यांचा मान
करू नये पुस्तकांचा,
कधीच असा अवमान

मोरपीस, पिंपळ पान
हरकत नाही ठेवायला
कुठून सुरू, कुठे संपलं...
मदत करेल सांगायला

**- भानुदास धोत्रे**
७९७२६२५०८६




मागील चित्रबोधचे उत्तर :– आडवे चित्र संकेत :– १. राणी लक्ष्मीबाई ५. आग ६. बदू ७. वारकरी १०. पेटी ११. रावण १३. गड्डू १४. कुंतल १५. खाट १६. शेज १७. आर १८. तरवार उभे चित्र संकेत :– १. रामबलराम २. लक्ष्य ३.बाजारपेठ ४. नाग ५. आरी ८. कटी ९. मणगट १२. कलदार १४. कुंजर १५. खार १६. शेत

Uday Munde, Nagpur

## वंडर बॉय
## अधिराज जाधव

**बालमित्रांनो,** अभ्यास तर करायलाच हवा पण, योग्य वेळापत्रक आपण आपलं तयार केलं तर अभ्यासाशिवाय बरंच काही करता येणं आपल्या हातात असतं. आपल्या आईवडिलांची इच्छा नेहमीच आपण मोठं व्हावं...महापुरुषांसारखं! असं त्यांना वाटत असतं आणि त्याकरीता ते प्रयत्नशील असतात आणि आपल्याला ‘आळस झटकून’ अभ्यासाशिवाय आपल्याला बरंच काही करणं शक्य असतं. आता बघा ना, अधिराज आज अकरा वर्षांचा आहे. त्याचे पणजोबा डोमाजी जाधव नागपूर महानगरपालिकेत महापौर होते. त्यांच्याकडून त्याने बरीचशी प्रेरणा घेतली आणि अभ्यासाचं वेळापत्रक सांभाळून विशेषत: अभिनय, घोडेस्वारी, लाठीकाठी, तलवारबाजी, दांडपट्टा आणि गाण्याची आवड जोपासताना त्याला पाककलेमध्येदेखील रस आहे. या सगळ्या त्याच्या आवडीसाठी वडील मनोज आणि आई प्रीती त्याचं वेळापत्रक सांभाळत असतात.



**संजय पेंडसे**/९४२२४४३२९५

भवन्सच्या श्रीकृष्ण नगर शाखेचा विद्यार्थी अधिराज सहाव्या वर्गात शिकतो आहे. त्याला आवडणारे शिक्षक हिंदीमधील विजय-लक्ष्मी आणि गणितासारखा कठीण विषय समजावून सांगणाऱ्या प्रियंका जिचकार यांचा त्याच्यावर प्रभाव आहे. आपले मित्र शिवांश, रिशिक, अक्षद यांच्याशी मैत्री करून त्याने बरंच काही साध्य केलं आहे. सातारा आणि अमरावती येथे लाठीकाठी या क्रीडाप्रकारामध्ये प्राविण्य मिळवलं. विविध स्पर्धांमधून कांस्यपदक आणि सुवर्णपदक प्राप्त केलं. आपला दहाव्या वर्षीच्या वाढदिवशी त्याने रुबाबदारपणे घोड्यावर स्वार होऊन प्रवेश केला. घोडेस्वारी करताना त्याला एक वेगळाच आत्मविश्वास मिळतो, असं त्याचं म्हणणं आहे. ज्या घोड्यावर तो प्रेम करतो, त्याला तो प्रतिसादही देतो किंबहुना घोडाही त्याच्याशी बोलतो. त्याच्या स्वप्नात येतो, असं त्याचं म्हणणं आहे. अभिनयामुळे आत्मविश्वास वाढला आहे, असं त्याला वाटतं. त्याच्या म्हणण्याप्रमाणे अभिनय मानसिक ताण कमी करतो.

रायपूर येथे झालेल्या अभिनय स्पर्धेमध्ये त्याला गौरव सन्मान प्राप्त झाला. अधिराज कधीही कोणाविषयी गैर बोलत नाही, हे विशेष! शांतपणे विषय समजून त्याविषयी तो विचार करून अभिनय करतो. आपल्या देशातील थोर पुरुषांप्रमाणे आपणही काहीतरी करावं, यासाठी निश्चित प्रयत्नशील अधिराज या सर्व गोष्टींचं वेळापत्रक सांभाळतो. अभ्यासाचंही वेळापत्रक सांभाळतो आणि मनमिळावू अधिराज पहिल्याच भेटीत ‘मैत्री करतो’ अशा मैत्री सांभाळणाऱ्या अधिराजचे छोटे उस्तादकडून अभिनंदन आणि भावी आयुष्याकरता खूप खूप शुभेच्छा !

## माझी दंतकथा

**हेमा नागपूरकर** /९८९०११९८७४



आई गं ! दातातून निघालेली कळ झणझणत थेट मस्तकात गेली आणि झोपच उडवली तिनं माझी ! नंतर नुसतीच ठुसठुस थोडया वेळाने पुन्हा एक कळ! घड्याळ्यात बघितलं रात्रीचे दोन वाजले होते. ही दातदुखी अशी अवेळीच का उगवावी? मग मी आपला आजीबाईचा बटवा काढला. निलगिरीचा फोवा दाताखाली दाबून धर, कापूर कापसात गुंडाळून तो दातात ठेव, लवंगीचं तेल लाव असे उपाय मी करीत राहिले. उजाडलं तशी शरण गेले प्राचीला! ‘दात दुखतोय गं रात्रीपासून!’ तिनं मला गोळी दिली.

‘ही घ्या ! दु:ख कमी होईल, क्लिनिक उघडले की, पहिल्यांदा तुम्हालाच बघते. बहुतेक ट?ीटमेंट करावी लागेल दाताची! सुष्मिता, यांचा एक्स रे करून घे म्हणजे मग ठरवता येईल आपल्याला,’प्राचीने आपल्या असिस्टंटला सूचना दिल्या. सुष्मितानं तारेला लावलेलं एक गठ्ठळं माझ्या गालफडात खुपसलं. टुंग टुंग करत एक्स रे निघाला तो लॅपटॉपवरून घेऊन मग दोघींचं संभाषण सुरू झालं.

‘अगं बघ, यांची अक्कलदाढ झोपलीय चक्क गालात अन् त्याच्या बाजूचा तो सेव्हन, बाहेर निघतांना त्याची मुळ भांडत असतील एकमेकांशी!’ ‘बाप रे मॅडम! या दातातली कीड काढणं आणि रूट कॅनल म्हणजे दिव्यच आहे.’ ‘हो नं! अगं यांचे बरेचसे दात असेच आहेत. थांब, तुला दाखवते.’ तिच्या लॅपटॉपमध्ये माझ्या दातांची कुंडलीच मांडलेली होती. ‘हा बघ उजवीकडचा! सिक्स कॅप दिली मी त्याला तेव्हा पण खूप त्रास झाला. अन् तिथलीच अप्पर एट (अक्कलदाढ) काढताना पण त्रेधातिरपीट झाली होती. बघ, बघ...अशी होती ती!’

सगळं ऐकता ऐकता माझीच मला लाज वाटू लागली. ‘बसा तुम्ही चेअरवर,’ प्राचीने निर्देश केली. या डेंटलच्या चेअरची शान काही औरच बघ! एकतर या चेअरवर बसणाऱ्या माणसाला बिनदिक्कत पाय पसरून बसण्याची मुभा असते. ही खुर्ची चतुर्भुजा! दोन हात पेशंटसाठी दिल्यावर एका हातात पाण्याचा ग्लास घेऊन अदबीने उभी! तर, दुसरा हात तुमच्या तोंडात कारभार करणारी बोटं घेऊन सज्ज! डोक्यावर हिच्या लखलखता मुकुट दिव्यांचा! ती हसून मला बोलावतेय, असा भास झाला मला! ‘पुन्हा माझ्या दातांचं इन्स्पेक्शन सुरू झालं. सुष्मिता आणि प्राची दोघी बोलघेवड्या! ‘बचपनमें इनकी अर्थो ट?ीटमेंट करनी चाहिये थी। तो फिर इतने टेढेमेढे नही रहते इनके दांत!’ बाई गं ! माझ्या लहानपणी हा शब्द तरी माहीत होता का? कुणास ठाऊक! दात दुखल्यानंतर डेंटिस्टकडे जायचं. तो दात उपटूनच हातात द्यायचा. फार त्रास घ्यायला लागले तर सगळेच काढून कुंदकळ्यांसारखी कवळी बसवायची. एवढाच डेंटिस्ट माहिती होता आम्हाला! ‘आपण वाचवून बघू या दाताला! त्याची कीड संपूर्ण काढता आली तर रूट कॅनल कॅप बसवू या,’ प्राची सांगत होती. ‘दात खूप आत आहे. मला काहीच दिसत नाही. आणखी तोंड उघडा ना!’ ‘सुष्मिता, कॅनल मिळाला पण, माझं इन्स्ट्रुमेंट जात नाहीये. तू बघतेस जरा. मग, दोघींची मिळून माझ्या दाताशी झटापट सूरू झाली. बघ...बघ या बकुल साईडने ॲक्सेस नाही मिळत आहे. क्राऊन चढवायचा म्हणे!

हा क्राऊन तयार करण्यासाठी दाताचं माप घ्यावे लागतं म्हणे! त्यासाठी ‘इंप्रेशन’ त्याचा ठसा घेतात प्लास्टर ऑफ पॅरिसवर! आपल्या तोंडात लावून ठेवतात ते घट्ट होत जातं. इंप्रेशन आलं की, मिनिटभरात काढतात. तोंडात ते लावले की, क्षणाक्षणाला काहीतरी आवळतंय दाताला, असं वाटत राहातं. प्राचीने सांगितलेलं आठवलं मला! समजा, ते जास्त वेळ राहिलं तर? माझी आपली शंका हो! ‘ते पक्कं होऊन गेलं तर हातोडी घेऊन काढावं लागतं का गं? मी प्राचीला विचारलं.

तुम्ही काळजी नका करू! मी बघतेय बरोबर!’ ‘पण, म्हणजे वेळेवर नक्की काढ बरं का नाहीतर नसती पंचाईत,’ मी माझ्या सा-सू (सारख्या सूचना) बिरादरीला बट्टा नाही लागू दिला.

तोंडात टोचणाऱ्या सुया, त्याने येणाऱ्या झिणझिण्या, वासलेल्या तोंडामुळे लागून आलेला जबडा याचं दु:खवेगळंच! दात मात्र माझा गालाच्या खिंडीत पाय रोवून उभा! अगदी बाजीप्रभूंच्या अभिनिवेशात दोघींच्याही हल्ल्यांना परतवून लावत होता. मी थोडं उं-आ केलं की, प्राची म्हणायची,‘बस्स...दोनच मिनिटं!’ पण, तिची ही दोन मिनीटं कुंभकर्णाच्या जांभईसारखी, संपेचनात!

माझ्या दाताला मनसोक्त तासून, घासून, टोचून शेवटी प्राचीनं ऐलान केलं. आजचं काम संपलंय. आता, दोन दिवसांनी पुढला सुटकेचा नि:श्वास टाकून मी उठले. दोन दिवसांनंतर सुरू झाली सेकंड इनिंग! आता त्याच्यात सिमेंट भरायचं म्हणे! आपण तर या बाबतीत अडाणीच! उगाच बोल म्हणून बोलले, ‘ब्रॅन्डेड टाका. म्हणजे, चांगलं पण होईल ना!’ माझा विनोद फारसा कुणाला आवडला नसावा. जाऊ दे! मी आ वासून गप्प बसले. माझ्यासमोर चारपाच शेडचे कृत्रिम दात ठेवत प्राची म्हणते,‘बघा! कुठली शेड मॅच होतेय? हा आरसा!’

बाई गं, कुठलीही शेड घे ना! माझ्या तोंडात तर सगळ्या प्रकारचे दात आहेत. तू लावलेले कुंदकळ्यासारखे शुभ्र, रंग उडालेले, पिवळे पडलेले अन् दातावरचं आवरण जाऊन काळवंडलेलेसुद्धा. शेवटी तिनेच त्यातून निवडून क्राऊन बनवायला पाठवला. नंतर, दोन दिवसांनी आमच्या दाताचा ‘क्राऊनिंग सेरेमनी’ झाला. मुकुट चढलेला दात देखणा दिसत होता म्हणे! आता तो कधी त्रास देणार नाही, ही माझ्यासाठी सगळ्यात जास्त आनंदाची बाजू! ‘आता तुम्ही या बाजूने पण खाऊ शकता.’ प्राचीने सांगितलं. खरं तर मला आनंद व्हायला हवा होता. पण, काय झाले होतं, डावीकडून काही खायचे नाही म्हणता, सगळं लोड उजव्या बाजूकडे आलं. म्हणून की काय, दोन दिवसांपासून उजवीकडचा दात ठसठसायला लागला. बरं वाटेल म्हणून आधी दुर्लक्ष केलं. पण, आज जरा जास्तच दुखत होतं. म्हटलं बघूनच घे बाई एकदा!

पुन्हा एक्स-रे वगैरे सगळे सोपस्कार झाले आणि प्राचीने सांगितले, इथल्याही दातात कीड आहे. त्याची पण ट?ीटमेंट करावीच लागेल. मी वर बघितलं. डेंटुकली चेअर मला हसून खुणावत होती.

## बंटीची बंडखोरी

**(भाग २०)**

**प्रीती वडनेरकर** /९८२३९९४७९२



सात वाजल्यानंतर सारं काही सुरळीत सुरू झालं. इंद्रप्रस्थ सोसायटीचे सगळे जण पार्किंग लॉटमध्ये जमले. कुणाला तरी कुठून तरी बातमी कळली की, कोणीतरी आपल्या, मंदिराच्या आराशीत काहीतरी गडबड केली आहे. काय गडबड आणि कोणी केली, याबद्दल मात्र काहीच कळायला मार्ग नव्हता. पण, आज प्रत्येक फ्लॅटमधला प्रत्येक जण खाली उतरला. खाली सगळंच व्यवस्थित सुरू होतं. लालजर्द जास्वंदाचा भला मोठा हार, दुर्वांच्या एकवीस जुड्यांचा हार, जाईजुईचे हार, अगरबत्त्यांचा आणि धुपाचा साऱ्या आसमंतात पसरलेला परिमल, गणपतीच्या मूर्तीवर पसरलेलं तेज आणि शांतपणे तेवणाऱ्या भल्या मोठ्या समयीतील वाती...सारं वातावरण मंगलमय आणि पवित्र होतं.

‘हे पहा दोस्तांनो, आपल्या मंदिराची कोणी मोडतोड केली, काय केली? याबद्दल कुणीही अवाक्षरही काढायचं नाही,’ बंटीनं साऱ्यांना बजावलं. ‘पण, बंटी SS आपल्याला तर कळलंय की, सायंताराच्या गौरवचं काम आहे हे म्हणून...मग? त्याला का सोडायचं?’ शिरीषनं विचारलं.

‘हो यार बंटी...त्याला शिक्षा झालीच पाहिजे. काही कारण नसताना, उगाचच्या उगाच कोणीही उठावं आणि आपल्याला त्रास द्यावा, हे चांगलं आहे का?’ यशनं आपली खदखद व्यक्त केली. ‘मला तर इतका राग आलाय नं त्या गौरवचा की, असं वाटतंय त्याच्या पाठीवर चांगला सोटा हाणावा,’ स्वानंदनं आपला राग व्यक्त केला. ‘मित्रांनो, मला कळतोय तुमचा राग आणि तो अगदी स्वाभाविक आहे. पण, क्रोधावर आवर घाला. या गणपती उत्सवात भांडाभांडी, बाचाबाची, मारामारी करून, मंगल उत्सवाचा विचका करायचा का? आणि, मुळात कुणी आपल्याला अरे केलं तर लगेच कारे करायचं नसतं. मग, त्याच्यात आणि आपल्यात फरक काय राहिला? उलट, आपण काहीच झालं नाही, असं दाखवलं तर तो मनोमन खजील होईल. त्याच्या वाईटावर, आपल्या चांगुलपणनं मात करायची. म्हणजे, पुढे काही वाईट करायला तो धजणार नाही. काय? पटतंय का?’ बंटीनं विचारलं.

‘हो... पटतंय बंटी महाराज... स्वामी सदगुरू’ सगळे एका सुरात उत्तरले आणि खो खो हसू लागले. आरती सुरू झाली. अचानक परिक्षक मंडळी आली. आरतीला प्रेक्षक म्हणून उभी राहिली. त्या मंडळींच्या मागे ‘सायंतारा’चं उत्सव मंडळही होतं. गौरवची गँग आणि स्वप्नीलही त्यात होता. त्यानं बंटीला अंगठा दाखवला. बंटीनेही अंगठा दाखवून त्याला प्रतिसाद दिला. आज इंद्रप्रस्थाच्या मंदिराची काही वेगळीच शान वाटत होती. मंदिर अगदी भक्कमपणे उभं होतं. लाईटच्या सिरीजमुळे सप्तरंगी दिव्यांच्या रांगा, उघडमीट करत होत्या. आरती संपली. आज नैवेद्याचा मान बंटीच्या आईचा होता. सत्यनारायणच्या प्रसादाचा, साजूक तुपातला, काजूविलायची घालून केलेला शिरा होता. बंटी ग्रुपनं, दादा लोकांनी सर्वांना खुर्च्यांवर बसण्याची विनंती करून, द्रोणात शिरा भरून, प्रत्येकाला नैवेद्य वाटला.

स्टेजवर उभं राहून, बंटीनं आजच्या कार्यक्रमांची घोषणा केली. आज बाबा लोकांच्या विनोदी किस्स्यांचा कार्यक्रम होता. त्याप्रमाणे, भाग घेणाऱ्यांची नावं जाहीर केली. टाळ्यांचा कडकडाट झाला. थेऊरच्या मंदिराची प्रतिकृती, तिथली सजावट, आरास, पडद्यांच्या भिंती, रांगोळ्या, पूजा-आरती, नैवेद्य, प्रेक्षक, शिस्त, कार्यक्रमाची रूपरेषा, बंटी ग्रुप आणि दादा लोकांचं स्वयंसेवकांचं काम अशा साऱ्याच गोष्टींनी परिक्षक मंडळी भारावून गेली होती. त्यांना तिथून उठावंसंच वाटत नव्हतं. गौरव ग्रुप, तीन-तीनदा मंदिराच्या मागच्या बाजूला जाऊन काय भानगड केली, ते बघण्याचा प्रयत्न करत होता. पण, दादा मंडळी त्यांना आत शिरायला सक्त मनाई करत होते, वाट अडवून उभे होते.

‘हे काय? आम्हाला मंदिराला प्रदक्षिणा घालायची आहे. अडवताय काय?’ गौरवनं चिडून विचारलं. ‘हे काही नेहमीच्या देवाचं मंदिर नाहीये, प्रदक्षिणा घालायला! जे काय दर्शन घ्यायचं असेल ते समोरून घ्या आणि नमस्कार करा! चला... इकडे यायचं नाही,’ एक दादा म्हणाला. गौरव रागारागानं परिक्षक मंडळींच्या जवळ गेला. ‘काका SS हे मंडळ, काहीतरी लपवतंय. आम्हाला प्रदक्षिणा घालू देत नाहीत. तुम्ही त्यांना ओरडा. काहीतरी गडबड आहे, शोधा,’ तो तावातावानं म्हणाला. ‘हे पहा गौरव SS काय करायचं, काय नाही, ते आम्ही ठरवू. तुम्ही लोक जास्त लुडबुड करू नका,’ परिक्षकांपैकी एक जण म्हणाला. विनोदी किस्से सांगण्याचा कार्यक्रम सुरूव्हायला थोडा अवकाश होता.

परिक्षक मंडळी उठली. त्यांच्या मागोमाग गौरव ग्रुपही उठला. परिक्षकांनी देखाव्याचा, सजावटीचा आणि आरासीचा आढावा घेतला. मंदिराच्या मागच्या बाजूला जाऊनही निरीक्षण केलं. त्यांना आक्षेपार्ह काहीच सापडलं नाही. उलट सारे खुश झाले. उत्तमोत्तम कलाकृतींचे नमुने, लाऊड स्पीकरवर वाजणारी मंद स्वरातील गणपतीची गाणी, ऊद-धूपाचा सुवास, आबालवृद्धांची गर्दी, बंटी ग्रुपचं सुपरव्हिजन, पूजा, आरत्या, सारं शिस्तबद्ध, मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळच्या सप्तरंगी रांगोळ्या... सारंच उत्कृष्ट!

परिक्षक मंडळाचं बंटी ग्रुपनं अतिशय आस्थेनं स्वागत केलं. चहापाणी, प्रसाद दिला. मुख्य परिक्षक स्टेजवर गेले. ‘इंद्रप्रस्थ, सभासदांनो नमस्कार, आत्तापर्यंत तुमच्या लक्षात आलंच असेल की, आम्ही परिक्षक मंडळी आहोत. आत्तापर्यंत आम्ही एक हजार गणेश मंडळांना भेटी दिल्या. अर्थात, सोसायटीची मंडळं! तुमच्या सोसायटीचं मंडळ हे शेवटचं मंडळ होतं. ‘सायंतारा’ सोसायटीची राम मंदिराची प्रतिकृती अतिशय सुबक, देखणी ठरली. पण, त्यांनी ती प्रोफेशनल आर्टिस्टकडून करवून घेतल्यामुळे त्यांना पूर्ण गुण मिळाले नाहीत. त्याउलट, तुमच्या सोसायटीचे थेऊरच्या चिंतामणीचे मंदिर, हे मुलामुलांनी तयार केल्याने पूर्ण गुण मिळाले. इतर मंडळांच्या देखाव्यांमधे काही ना काही उणीवा निघाल्या. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची मुहूर्तमेढ रोवली ती, स्वातंत्र्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन! समाजातील सामान्यजनांनी एकत्र येऊन, स्वातंत्र्याच्या रणनीतीची आखणी त्यातून केली जात होती. ‘इंद्रप्रस्थ’ मंडळ सोडून, इतर मंडळांनी नुसती डीजे वर कुठलीही फिल्मी गाणी, तारस्वरात वाजवून, त्यावर धांगडधिंगा डान्स करण्याचा सपाटा लावला. त्यामुळे, सर्वच बाबतीत ‘इंद्रप्रस्थ’ मंडळ सरस ठरलं असून, या वर्षीची ढालही तुमच्याकडेच राहणार यावर आम्ही शिक्कामोर्तब केलं आहे.’ सर्व प्रेक्षकांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. गौरव ग्रुप मात्र रागाने पाय आपटत तिथून निघून गेला. बंटीला सर्व ग्रुपनं आणि दादा मंडळींनी, आनंदानं उचलून घेतलं. ‘बंटी की जय हो। हिप हिप हुर्रे... हिप हिप हुर्रे...’

बंटीला स्टेजवर बोलावून, मंडळाकडे असलेली ढाल परिक्षक मंडळानं, बंटीच्या हातात दिली आणि म्हटलं,‘आता ही ढाल नेहमीच तुमच्या मंडळाकडे राहणार. तुम्हा सर्वांचं, हार्दिक अभिनंदन!’ बंटीनं, आपल्या यशाचं श्रेय, आपला ग्रुप, दादा मंडळी, आपले आईबाबा आणि सोसायटीच्या सर्व सभासदांना दिलं. ढाल उंचावून, सर्वांसोबत फोटो घेतला. सर्वांच्या चेहऱ्यावर विजयाचं हास्य झळकलं.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# देवडी शिवारात बिबट्याने काळविटाचा फाडशा पाडला ;नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ सप्टेंबर**

वडवणी तालुक्यातील देवडी रेथे एका शेतकऱ्याचा उसाच्या शेतामध्ये बिबट्याने काळवीटाची शिकार करुन अर्धवट खाल्लेले काळवीटाचे शरीर दिसून आल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वनविभागाने तात्काळ पिंजरा बसवण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

वडवणी तालुक्यातील देवडी रेथील शेतकरी रामप्रसाद बाबुराव आगे यांच्या शेतातील गट नंबर ७७ मध्ये ऊसाच्या शेतात अर्धवट खाल्लेले काळवीटाचे शरीर शेतकर्‍याला दिसून आले.काळवीटाच्रा अवतीभवती बिबट्या सदृश्य ठसे दिसून आले.राची कल्पना धारूर वन विभागाच्रा अधिकार्‍यांना देण्रात आली.वन विभागाचे अधिकारी दुर्घटनाग्रस्त शेतात गेले असता.त्रा ठशांची पाहणी केली.अर्धवट खाल्लेल्या काळवीटाची पाहणी केली असता.रा काळवीटाची शिकार बिबट्याने केली असल्याचे त्यांचा निदर्शनास आले.त्रामुळे नागरिकांमध्ये व शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.वन विभागाने तात्काळ पिंजरा आणून बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी शेतकऱ्यांमधून केली जात आहे. तर रावेळी वनविभागाचे अधिकारी संभाजी पारवे ,एस आर मात्रे, एल ए गंगावने,रांच्रासह शेतकरी उपस्थित होते.देवडी व पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी आपली जनावरे उघड्यावर बांधू नरे,शेतात आखाड्यावर उजेड



करावा,टेप मोबाईलची गाणी लावावी,शेतात रात्री अपरात्री जाणे टाळावे,अधिसूचना वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना व नागरिकांना सूचना देण्यात आल्या आहेत.

## होमिओपॅथी महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त भव्य राष्ट्रीय सेमिनारचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ सप्टेंबर**

येथील स्व.माजी खा.केशरकाकू क्षीरसागर यांनी १५ सप्टेंबर १९७४ साली स्थापित केलेल्या सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने बीड येथे नॅशनल होमिओपॅथिक सेमिनार तसेच बीड येथून उत्तीर्ण झालेल्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा दि.१५ सप्टेंबर रोजी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेला आहे.

या कार्यक्रमासाठी केंद्रातील आयुष मंत्री ना.प्रतापराव जाधव तसेच ना.टोकन साहू शहरी विकास राज्यमंत्री प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे. तसेच यावेळी संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर अध्यक्षस्थानी राहणार आहेत तर राष्ट्रीय होमिओपॅथिक आयोगाचे चेअरमन डॉ.अनिल खुराना, राष्ट्रीय होमिओपॅथी संस्थांचे संचालक डॉ.सुभाष सिंग, रजिस्ट्रेशन बोर्डाचे प्रेसिडेंट डॉ.पिनांकिन त्रिवेदी राष्ट्रीय होमिओपॅथी आयोगाचे सचिव डॉ.संजय गुप्ता महाराष्ट्रातील आयुष्यमान भारत या योजनेचे प्रमुख डॉ.ओमप्रकाश शेटे व राष्ट्रीय आयोगाच्या मेडिकल असेसमेंट अ‍ॅण्ड रेटिंग बोर्डाचे सदस्य डॉ.आंनद चतुर्वेदी, आयोगाचे रजिस्ट्रेशन बोर्डाचे सदस्य डॉ.सेंथीलकुमार,आयोगाच्या एज्युकेशन बोर्डाचे डॉ.मंगेश जतकर, राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ.राजकुमार पाटील हे उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमात या सेमिनारचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये याच महाविद्यालयातुन उत्तीर्ण झालेल्या व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध असलेल्या माजी विद्यार्थ्यांचे विविध विषयांवर व्याख्यान होणार आहे तर दुपारी



महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेल्या व प्रथितयश संपादन केलेल्या होमिओपॅथिक डॉक्टरांना मंत्री महोदयाच्या हस्ते अवॉर्ड ऑफ एक्सलन्स या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच डिप्लोमा, डिग्री, पोस्ट ग्रॅज्युएट झालेल्या व पीएचडी झालेल्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आल्याची माहिती महाविद्यालाचे सल्लागार डॉ.अरुण भस्मे व प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल यांनी दिली आहे. सकाळी १० वाजता नॅशनल होमिओपॅथिक १२ ते १ या वेळात माजी विद्यार्थ्यांचे मनोगत तसेच दुपारी २ वा कार्यक्रमाचे उद्घाटन आयुष्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे.यावेळी केंद्रातील शहरी विकास राज्यमंत्री टोकन शाहू हेही प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. संध्याकाळी ७ ते १० या वेळात कल्चरल प्रोग्रामचे सुद्धा आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन संस्थचे अध्यक्ष नानासाहेब काकडे यांनी केले आहे.

## २९ सप्टेंबर रोजी बीडमध्ये मराठवाडा केसरी भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन – राजेंद्र मस्के

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ सप्टेंबर**

भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के मित्र मंडळाच्या वतीने दिनांक २९ सप्टेंबर रविवार रोजी बीडमध्ये मराठवाडा केसरी भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले आहे. मागील शर्यती दरम्यान घोषणा केल्या प्रमाणे सोनालीका ट्रॅक्टर पहिले बक्षीस ठेवण्यात आले आहे. बैलगाडा शर्यत शौकीन शेतकरी बांधवांनी रीतसर नाव नोंदणी करून, या शर्यतीत बहुसंखेने सहभाग घ्यावा. असे आवाहन शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

बैलगाडा शर्यत महाराष्ट्रातील पारंपारिक हौसी खेळ आहे. गावोगावी सन उत्सव किंवा विशेष कार्यक्रमाच्या निमित्ताने शेतकरी बांधवाना प्रोत्साहित करण्यासाठी बैलगाडा शर्यतीचे अनेक गावात नियोजन केले जाते. बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील खेडोपाडी बैलगाडी शर्यत लोकप्रिय झाली. हौसी शेतकऱ्यांसाठी यापूर्वी दोन वेळा राजेंद्र मस्के मित्र मंडळाच्या वतीने स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. उदंड प्रतिसाद लक्षात घेऊन याही वर्षी भव्य बैलगाडा शर्यतीचे भव्य बक्षीसासह आयोजन केले आहे. बीड शहरालगत बीड - अहमदनगर हायवे, तळेगाव शिवारात या स्पर्धा संपन्न होतील. प्रथम बक्षीस सोनालिका ट्रॅक्टरसह अन्य रोख बक्षिसे देण्यात येतील. नोंदणीकृत स्पर्धकांनाच शर्यतीत सहभाग घेता येईल. संघर्षयोद्धा भाजपा जनसंपर्क कार्यालय, बीड येथे नाव नोंदणी सुरु आहे. अशी माहिती राजेंद्र मस्के मित्र मंडळाने कळवली आहे.संपर्क - ९९२१११४९५४, ९१३०८८७८८८, ९३५९००५८७९, ९८६०९११०९९

## संस्थान थोरले पाटगंण येथे दि.१२ ते १८ सप्टेंबर दरम्यान आचार्य श्री हेमंतशास्त्री व्यास यांच्या श्रीमद् भागवत कथेचे आयोजन

बीड दि.११ (प्रतिनिधी):- शहरातील संस्थान थोरले पाटगंण येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी म्हणजेच उद्या भाद्रपद शु. ९ गुरुवार दि.१२ ते भाद्रपद पोर्णिमा/कृ.१ बुधवार दि. १८ सप्टेंबर २०२४ दरम्यान आचार्य श्री. हेमंतशास्त्री व्यास (गुजरात) यांच्या मधूरवाणीतुन श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन करण्यात आले असून या भागवतकथेची वेळ दुपारी २ ते ६ आहे.



आचार्य हेमंतशास्त्री व्यास भागवत कथेच्या निमित्ताने विविध कथा, प्रसंग सुंदर पध्दतीने मांडणार असून अत्यंत रसाळ आणी श्रवणीय कथा श्रवणाची पर्वणी बीडकर भाविकभक्तासाठी मागील अनेक वर्षांपासून मिळत आहे. या भागवत कथेत संहिता वाचन श्री. प्रसाद महाराज शिवणीकर हे करणार आहेत. तरी सर्व महिला, पुरुष भाविकभक्तांनी कथा श्रवणासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन वे.शा.स.विनायक धुंडीराज महाराज पाटांगणकर यांनी संस्थांन थोरले पाटंगण यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## आ.क्षीरसागरांची जिल्हाधिकाऱ्यांसमवेत बैठक

### कपिलधारवाडीत उपाययोजना, शेतकऱ्यांना सरसकट भरपाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ सप्टेंबर**

बीड तालुक्यातील कपीलधारवाडी येथे भुस्खलनाचा मोठा धोका आहे. याठिकाणी कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी सर्वेक्षण करून तातडीने उपाययोजना करण्यासंदर्भात आ.संदीप क्षीरसागर यांनी मा.जिल्हाधिकार्यांसोबत बैठक घेतली.



बीड तालुक्यात कपीलधारवाडी गावामध्ये भुस्खलनाचा धोका असल्याचे गेल्या अनेक दिवसांपासून जाणवत आहे. येथील नागरिकांचे सुरक्षेच्या दृष्टीने पुनर्वसन होणे अत्यंत आवश्यक आहे. दरम्यान कपीलधारवाडी गावच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव गेल्या अनेक वर्षांपासून शासनस्तरावर प्रलंबित आहे. मागील वर्षी रायगड जिल्ह्यातील इर्शाळवाडी येथे भुस्खलन होऊन मोठी दुर्दैवी घटना घडली होती. याचसारख्या घटनेची पुनरावृत्ती पुन्हा आपल्याकडे होऊ नये याची काळजी प्रशासनाने घेतली पाहिजे. इर्शाळवाडी घटनेसारखा अनर्थ टाळायचा असेल तर, कपीलधारवाडी येथे प्रशासनाकडून तातडीने आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात तसेच या भागाचा पुनर्वसनाचा प्रस्ताव लवकरात लवकर मंजूर करण्यासाठी कार्यवाही करावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली.

## आधार प्रमाणीकरणासाठी १७ सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ सप्टेंबर**

महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर योजनेसाठी पात्र ठरलेल्या शेतक-यांना आधार प्रमाणीकरणा करिता १७ सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. बीड जिल्हयात आधार प्रमाणीकरण न झालेले ३९६ शेतकरी शिल्लक होते. त्यापैकी १७० शेतकऱ्यांनी सप्टेंबर-२०२४ मध्ये आधार प्रमाणीकरण करुन घेतलेले आहे. उर्वरित २२६ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण अद्याप झालेले नाही. त्यामुळे त्यांना महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर योजनेचा लाभ प्राप्त झालेला नाही.

तरी सदर शेतक-यांनी १७ सप्टेंबर २०२४ पर्यंत आधार प्रमाणीकरण करुन घ्यावे असे आवाहन श्री. समृत जाधव, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांनी केले आहे.

मयत शेतकर्यांच्या वारसांनी नोंद करावी

जिल्हयातील २२६ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण झालेले नाही. त्यापैकी जे कांही शेतकरी मयत झालेले आहेत त्या शेतकऱ्यांच्या वारसांनी संबंधित संस्था/बँक यांच्याशी संपर्क साधुन खातेदाराच्या वारसाची नोंद करुन घ्यावी. त्यानंतरच प्रोत्साहनपर योजनेचा लाभ संबंधीत मयत शेतकर्यांच्या वारसांना प्राप्त होणार आहे.

## होमिओपॅथी महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त दिव्यांग रूग्ण साठी होमिओपॅथिक शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ सप्टेंबर**

होमिओपॅथी महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त जगप्रसिद्ध होमिओपॅथिक तज्ञ कै.डॉ.प्रफुल्ल विजयकर यांच्या संकल्पनेतून आणि आधारस्तंभ माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या प्रेरणेतून २००९ पासून सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक महाविद्यालय बीड येथे मतिमंद, गतिमंद, सेरेब्रल पल्सी (cerebral palsy), कर्णबधीरता, मूकबधिरपणा, लहान मुलांचे असाध्य आजार, Rare Syndromes, झटके येणे (epilepsy) अशा विविध प्रकारच्या आजारांवर होमिओपॅथिक औषध-उपचार शिबिर आयोजित होत आहेत. आतापर्यंत जवळपास ५००० हून अधिक रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला आहे. हे शिबिर दर तीन ते चार महिन्यांच्या अंतराने नियमितपणे आयोजित होत आहेत. होमिओपॅथिक चिकित्सा पद्धतीच्या सिद्धांतानुसार रुग्णाची सखोल माहिती घेऊन होमिओपॅथिक औषध उपचार केले जातात.

या वेळेस सदर शिबिर दि.१५ सप्टेंबर २०२४ रविवार रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत होणार आहे. ज्या रुग्णांना याचा लाभ घ्यायचा आहे त्यांनी मुळी ए.ए. ९५०३८७५३११ (सोशल वर्कर, SKHMCB, बीड) यांना संपर्क करून नाव नोंदणी करावी. असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ महेन्द्र गौशाल यांनी केले. कृपया नोंद घ्यावी नाव नोंदणी बंधनकारक आहे असे डॉ. गणेश पांगारकर यांनी व डॉ. अमित भस्मे यांनी कळविले आहे.

शिबीराचे ठिकाण: सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल, विद्यानगर बीड, महाराष्ट्र.

## सौ.के.एस.के.महाविद्यालयात आपला भोवताल आपली जबाबदारी या विषयावर डॉ.शुभदा राठी लोहिया यांचे व्याख्यान संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ सप्टेंबर**

येथील नवगण शिक्षण संस्थेच्या सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील पर्यावरण समितीच्या वतीने पर्यावरण प्रदुषण आरोग्य विकासाच्या संदर्भात जाणीव जागृती व्हावी. यासाठी डॉ.शुभदा राठी लोहिया वैद्यकीय समुपदेशक व पक्षी निरिक्षक अंबाजोगाई यांचे व्याख्यान झाले. नवगण शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ.दीपाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली व्याख्यान आयोजित केले होते.



डॉ.शुभदा राठी लोहिया यांनी आपल्या व्याख्यानात म्हणाल्या की, वाढते तापमान हा अत्यंत गंभीर असा प्रश्न जगाच्या समोर निर्माण झालेला आहे. जग हे विविध समस्याने ग्रासले आहे. वाढत्या तापमानामुळे भाविष्यात गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात म्हणून प्रत्येकाने एक झाड लावले पाहिजे.तसेच प्लॉस्टीक कचर्याची विल्हेवाट कशी लावावी या संदर्भातील देखील सखोल असे मार्गदर्शन केले.पक्षी संवर्धनासाठी लोकसहभाग वाढविणे त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांचा आणि समाजाचा सुध्दा यात सहभाग असावा असे सांगण्यात आले.तसेच भविष्यात जैविक विविधतेचा धोका कसा निर्माण झाला आहे या बद्दल सविस्तर माहिती दिली.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर म्हणाले की, प्रदुषण ही एक समस्या दिवसंदिवस जगाला भेडसावत आहे. त्यामुळे निसर्गातील अन्न साखळी अबाधीत राहण्यासाठी सर्वांनी काळजी घेतली पाहिजे.त्यासाठी सर्वांनी गाडीचा आवाज कमी असणे, टी.व्ही. ,मोबाईलचा कमी वापर करणे जास्तीत जास्त कचर्या कुंड्याचा वापर आणि योग्य त्याच ठिकाणी कचरा टाकणे, सर्वांनी हवेच्या नियमाचे पालन करणे त्यासाठी सर्वांनी जास्ती जास्त झाडे लावणे व नियमाचे पालन करणे आवश्यक आदीवर त्यांनी प्रदूषणावर सविस्तर माहिती दिली.यावेळी कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर,संस्थेचे पदाधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, डॉ.विश्वांभर देशमाने, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर,उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर सह महाविद्यालयातील पर्यावरणशास्त्र समिती प्रमुख डॉ.प्रेमचंद सिरसट व आभार डॉ.संध्या जोगदंड यांनी मानले तस कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.दीपाजी चव्हाण यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आदी उपस्थित होते.

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# वॉटर संस्थेमार्फत पाणलोट विकास कामांचे लोकार्पण

**कळंब, दि.११ सप्टेंबर -**

तालुक्यातील मस्सा खं येथे संत ज्ञानेश्वर माऊली मंदिराच्या सभागृहात वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट अहमदनगर यांच्या म ार्गदर्शनाखाली बॉस कंपनी यांच्या अर्थसहाय्यातून मस्सा खं येथे चालू असलेल्या शाश्वत कृषी उपजीविका सक्षम करणारी जल सुरक्षा निर्माण करणे प्रकल्पा अंतर्गत पूर्ण करण्यात आलेल्या



कामांचे लोकार्पण व फंडर विजिट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मस्सा खं ग्राम विकास समिती व ग्रामपंचायत यांच्यामार्फत प्रमुख पाहुण्यांचे स्वागत सत्कार करून बैलगाडी मधून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी बॉस कंपनीचे जेकाब पीटर, मिस्टर आदित्य, शिल्पा देवधर 'मॉलि. टी तसेच वॉटर संस्थेचे सह संस्थापक क्रिस्पीनो लोबो वॉटर, अभिजीत कवठेकर श्याम वादे ,मुकुंद शिंदे, उज्वला कवठेकर, प्रोजेक्ट मॅनेजर अनिल वांढेकर यांच्या हस्ते झालेल्या कामाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी मस्सा खं सरपंच त्रिंबक कचरे, उपसरपंच संदीप तांदळे, ग्रा.पं.सदस्य श्रीगणेश शेळके, जालिंदर किलचे, नेमीनाथ इंगोले, संभाजी वरपे, सतीश वरपे, रामराजे थोरात, बाळासाहेब वरपे, तुकाराम थोरात, बिभीषण शिंदे, दत्तात्रय घाडगे, स्वाती सावंत, सविता थोरात, सुवर्णा किलचे, सीमारांनी फरताडे, करुणा शिंदे, महिला, शेतकरी व ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### काँग्रेस तालुका कार्याध्यक्ष गपाट यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**वाशी, दि.११ सप्टेंबर -**

वाशी तालुका काँग्रेस कार्याध्यक्ष बाळासाहेब गपाट यांच्या संपर्क कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी काँग्रेस जिल्हा अध्यक्ष धीरज पाटील, जिल्हा संघटक राजाभाऊ शेरखाने, जिल्हा उपाध्यक्ष विलास शाळू, विधी विभाग जिल्हा उपाध्यक्ष ॲड. उमेश गवळी, विधी विभाग वाशी तालुका अध्यक्ष गणेश कवडे, वाशी काँग्रेस तालुकाध्यक्ष राजेश शिंदे, भूम काँग्रेस तालुकाध्यक्ष रूपेश शेंडगे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### गायकवाड यांच्या पुण्यस्मरणनिमित्त गणवेशाचे होणार वाटप

**जळकोट, दि.११ सप्टेंबर -**



तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील नेहा क्लिनिकचे डॉ.चंद्रशेखर गायकवाड यांच्या मातोश्री कै.सोजरबाई गोविंदराव गायकवाड यांच्या तिसऱ्या पुण्यस्मरण दिनानिमि त्त सचिन काळे व ज्ञानेश्वर पात्रे मित्र मंडळ यांच्या सहकार्याने जळकोट येथील अंगणवाडी क्रमांक १ते ७ म धील एकूण २५१ विद्यार्थ्यांना स्कूल युनिफॉर्म वाटप करण्यात येणार आहे. डॉ. चंद्रशेखर गायकवाड हे गेल्या दोन वर्षापासून आपल्या आईच्या पुण्यस्मरणादिनानिमित्त विविध समाज उपयोगी कार्यक्रम घेत आहेत. याही वर्षी त्यांनी अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना पूर्ण युनिफॉर्म वाटप करणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभावती बाळू माने ह्या उपस्थित राहणार आहेत. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून गुंजोटी गावचे माजी सरपंच शंकरराव पाटील, माजी उपसरपंच शिवाजीराव गायकवाड व सचिन काळे, ज्ञानेश्वर पात्रे मित्र मंडळाचे कार्यकर्ते यावेळी उपस्थित राहून कार्यक्रम पार पाडणार आहेत. तरी या कार्यक्रमास सर्व नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ.चंद्रशेखर गायकवाड व दीपा गायकवाड यांनी केले आहे.

### घरगुती गणपती, गौरी सजावट स्पर्धेत सहभाग घ्यावा : ॲड.आकांक्षा चौगुले

**लोहारा, दि.११ सप्टेंबर -**



भव्य घरगुती गणपती व गौरी सजावट स्पर्धा-२०२४ ज्ञानज्योती सामाजिक बहुउद्देशीय संस्था उमरगा यांच्या वतीने भव्य घरगुती गणपती व गौरी सजावट स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे. तरी उमरगा लोहारा तालुक्यातील जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन आयोजिका तथा संस्थेच्या अध्यक्षा ॲड. आकांक्षा चौगुले यांनी केले आहे. गौरी सजावटी साठी प्रथम पारितोषिक ११ हजार रुपये, द्वितीय ७ हजार रुपये, तृतीय ५ हजार, उत्तेजनार्थ ३ हजार रुपये पारितोषिक ठेवण्यात आले आहे. व तसेच गणपती घरगुती सजावटसाठी प्रथम पारितोषिक ७ हजार रुपये, द्वितीय ५ हजार, तृतीय ३ हजार रुपये, उत्तेजनार्थ २ हजार रुपये पारितोषिक ठेवण्यात आले आहे. उमरगा तालुका व लोहारा तालुका स्वतंत्र बक्षीसे देण्यात येतील उत्तेजनार्थ विजेत्यांना पैठणी व सहभागी स्पर्धकांना आकर्षक भेटवस्तु देण्यात येतील. स्पर्धकांनी आपल्या घरी गणपती व गौरी महालक्ष्मी सजावट केल्यानंतर ६० सेंकदाचा एक मिनिटाचा व्हिडीओ शुट करुन दि.१३ सप्टेंबर रात्री १२ वाजेपर्यंत संस्थेचे सचिव प्रदिप मदने मो.नं.८००७७२९८११ व शुभांगी जगताप मो.नं.९३२५१२७२८२ यावरती व्हिडीओ पाठविण्यात यावेत, असे आवाहन आयोजिका तथा संस्थेच्या अध्यक्षा ॲड.आकांक्षा चौगुले यांनी केले आहे.



### रक्तदान शिबीरात ३८ रक्तदात्यांनी केले रक्तदान

**लोहारा, दि.११ सप्टेंबर -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील क्रांती तरूण गणेश मंडळ यांच्या वतीने १० सप्टेंबरला आयोजित रक्तदान शिबीरात ३८ रक्तदात्यानी रक्तदान केले. रक्तदान या स्तुत्य उपक्रमास आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी भेट देऊन रक्तदान शिबीर आयोजित केल्याबद्दल गणेश मंडळांच्या पदाधिकारी यांचे अभिनंदन केले. यावेळी अमोल भातभागे, प्रवीण साळुंके, नवनाथ पसारे, विशाल नाईकवाडी, अमोल कासार, शरद मेंगले, आकाश लोखंडे, शितल बुबणे मयूर भातभागे, सुमित भातभागे, काका काळे, माऊली मुळे, राहुल पवार, राहुल गाडे, सोन्या काळे, किरण चव्हाण, अमर गोडसे, बंटी निर्मळ, अजित मोरे, सुरज गाडे व मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

# नळदुर्ग अप्पर तहसील कार्यालयास उच्चस्तरीय समितीची मंजुरी

## नवीन तालुका निर्मितीच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल, अनेक दशकांच्या मागणीला महायुती सरकारकडून न्याय : आमदार पाटील यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.११ सप्टेंबर -**

नळदुर्ग तालुका निर्मितीच्या दिशेने पाहिले महत्त्वाचे पाऊल पडले आहे. अनेक दशकांपासून हा प्रश्न प्रलंबित होता. तालुका निर्मितीच्या अनुषंगाने नवीन अप्पर तहसील कार्यालयाच्या प्रस्तावास बुधवारी राज्य सरकारच्या उच्चस्तरीय सचिव समितीने मंजुरी दिली आहे. त्यामुळे नळदुर्गवासीयांच्या स्वतंत्र तालुक्याच्या मागणीला न्याय मिळण्यास सुरुवात झाली आहे. आता लवकरच या कार्यालयाचे कार्यक्षेत्र व पद निर्मितीचा शासन निर्णय निर्गमित होणार असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

नळदुर्ग च्या या प्रस्तावस तत्कालीन ठाकरे सरकारने सहकार्य केले न्हवते परंतु महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मदतीने हा प्रस्ताव पुन्हा सादर केला.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या प्रस्तावास वित्त विभागाची मान्यता दिली आणि आज गौरी गणपतीच्या शुभ मुहूर्तावर नळदुर्ग येथे अपर तहसील कार्यालयाच्या प्रस्तावास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता मिळाली आहे. स्वतंत्र तालुका निर्मितीच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग शहर तथा अणदूर, जळकोट, नंदगाव व शहापूर या महसुली मंडळातील नागरिकांची अनेक दशकांपासूनची स्वतंत्र नळदुर्ग तालुका निर्मितीची मागणी होती. तुळजापूर तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र व गावांची संख्या विचारात घेवून नळदुर्ग येथे अतिरिक्त तहसील कार्यालय मंजूर करण्याच्या म ागणीसाठी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचा सातत्याने पाठपुरावा सुरु होता.

राज्यात नवीन जिल्हे व नळदुर्गसह इतर तालुके निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू आहे, मात्र त्यासाठी मोठ्या आर्थिक तरतुदीची गरज असल्यामुळे या प्रस्तावांना विलंब होत आहे. नागरिकांची गरज ध्यानात घेत अप्पर तहसील कार्यालयाचा मार्ग वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून मार्गी लावला आहे. त्यासाठी महसूल मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे सातत्याने या विषयाची आग्रही मागणी करण्यात आली.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्याने मान्यतेच्या प्रक्रियेला गती मि ळाली.

पाच ऑगस्ट रोजी अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभाग यांच्या उपसमितीच्या बैठकीत नळदुर्ग ला अपर तहसील कार्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली होती आणि सदरील प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीकडे पाठविण्यात आला होता. आज त्यास उच्चस्तरीय सचिव समितीकडून मान्यता देण्यात आली असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

स्वतंत्र नळदुर्ग तालुका निर्मितीच्या अनुषंगाने व नागरिकांना सुविधा देण्यासाठी नळदुर्ग येथे होत असलेल्या अप्पर तहसील कार्यालयाच्या मान्यतेबद्दल आमदार पाटील यांनी महायुती सरकारचे आभार व्यक्त केले आहेत. तसेच स्वतंत्र तालुका निर्मितीसाठी यापुढेही सातत्याने पाठपुरावा सुरु राहणार असल्याचे सांगितले आहे.

# दुरुस्ती कामाचे मंत्री तानाजी सावंत यांच्या हस्ते भुमीपुजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ सप्टेंबर -**

शेतकऱ्याचा जिव्हाळ्याचा असलेल्या खंडेश्वर प्रकल्पाच्या दुरुस्ती कामाचे पुजन मंत्री तानाजी सावंत यांच्या हस्ते आज दि. १० रोजी खंडेश्वर मध्यम प्रकल्प स्थळी करण्यात आले. सदरील कामास मंत्री तानाजी सावंत यांनी नऊ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करू दिला असुन या कामाचे वर्क ओर्डर ऑगस्ट महिन्यात निघाले आहे, असे त्यांनी सांगितले.

पावसाच्या अडचणीमुळे काम पावसाळा संपल्याबरोबर सुरू करण्यात येईल व पुढे येणाऱ्या पावसाळया पर्यंत हे काम पुर्ण होणार असल्याचा शब्द सावंत यांनी भुमी पुजनाच्या वेळी उपस्थित शेतकऱ्यांना दिला.



पुढील वर्षी या कामाचे लोकर्पण २०२५ ला मीच करणार असल्याचा विश्वास देखील सावंत यांनी यावेळी व्यक्त केला. यापुढे येणाऱ्या विधानसभा निवडणूकीत काम व विकास पाहुणच मतदान करा असी विनंती सावंत यांनी शेतकऱ्यांना केली.

येणाऱ्या पाचवर्षात मतदार संघात एकही विकास काम सिल्लक ठेवणार नाही एवढी विकास कामे करणार असल्याची ग्वाही मंत्री सावंत यांनी ग्रामस्थानां भुमीपुजन प्रसंगी दिली. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख दत्ता साळुंखे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख दत्ता मोहिते,संजय गांधी निराधारचे तालुकाध्यक्ष जयदेव गोफणे, ॲड.सुभाष मोरे व परिसरातील कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुरणपोळीसह सोळा भाज्यांच्या नैवेद्याने जेष्टा गौरी स्थिरावल्या..!

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.११ सप्टेंबर -**

हिंदू धर्मातील महत्वाच्या सणांपैकी एक असा जेष्टा गौरी अर्थात लक्ष्मीचा सण. हा सण महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी वेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. कोकण, विदर्भ, खानदेश या ठिकाणी आगळा वेगळा हा सण असतो तसच मराठवाड्यातही या सणाला वेगळेपण असतेच.

मंगळवारी आलेल्या जेष्टा गौरी संध्याकाळी आठ वाजेपर्यंतच्या म ुहुर्तावर अनेक घरात स्थापित झाल्या.

आपआपल्या घरातील महिला या लक्ष्मीचे मुखवटे व त्यांचे मुलं अर्थात पिलवंडे यांना अंगणातील तुळशी वृंदावनाजवळ मोठ्या ताटात ठेवले जाते. तिथून त्यांना वाजतगाजत घरात आणले जाते.कोणी ताट वाजवितात तर कोणी हलगी वाजवीत लक्ष्मी आणतात. देवघरात देवापुढे ठेवून त्यांना शेवया दुधभात नैवेद्य दाखविला जातो. त्यानंतर त्यांना मकरात किंवा दोरीच्या पडद्याच्या आत स्टँडवर उभे केल्या जातात. अनेक ठिकाणी लक्ष्मीचे मुखवटे हे प्रामुख्याने प्लॉस्टर ऑफ पॅरीसचे,जुन्या काळातील पुर्वीचे मातीचेपण पाहायला मिळतात. त्याचबरोबर काही ठिकाणी ते पितळेचे असतात हे विशेष.जेष्टा गौरी लक्ष्मी ज्या मखरात उभ्या केल्या जातात तो सजवून यात त्यांचा संसार मांडला जातो. शिवाय त्यांच्यापुढे अनेक धान्याच्या राशी मांडलेल्या असतात.लक्ष्मीआवाहन करण्याच्या अनेक पद्धती निरनिराळ्या प्रांतांनुसार प्रचलित आहेत. मराठवाड्यात दुसऱ्या दिवशी जेष्टा गौरी यांना पुरणपोळी दुध यासह सोळा प्रकारच्या भाज्यांचा नैवेद्य केळीच्या पानावर विधिवत दाखविला जातो. यानंतर घरातील मंडळी जेवनाचा आनंद घेतात. या दिवशी जेष्टगौरी यांच्यापुढे अनेक विविध प्रकारची खेळणी, धान्याच्या छोट्या राशी, अनेक प्रकारची फळे, फराळीचे जिन्नस ठेवले जातात. वेगवेगळ्या पद्धतीचा देखावा,सजावट अनेक ठिकाणी पाहायला मिळते.

तिसऱ्या दिवशी जेष्टा गौरी यांना खिर काणवले करंजी यांचा नैवेद्य दाखवला जातो.

# सोयाबिनला ६ हजार ९४५ रुपये दर द्या

## भारतीय किसान संघ जिल्हा धाराशिवच्या वतीने मागणी




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ सप्टेंबर -**

महाराष्ट्रात सोयाबीन हे क्रमांक दोनचे मुख्य नगदी पीक आहे. राज्यात यावर्षी सुमारे ५० लाख हेक्टर क्षेत्र या पीकाखाली आहे. राज्याची सरासरी उत्पादकता हेक्टरी १४.५६ क्विंटल आहे. राज्याचा सरासरी उत्पादन खर्च ६०३९ रु. क्विंटल आहे. त्या अनुशंगाने राज्य सरकारने कृषि लागत एवं मुल्य आयोगाकडे प्रती क्विंटल ६ हजार ९४५ रुपये दर दिला जावा अशी शिफारस केली आहे, ती रास्त आणि योग्य आहे. म्हणून चालू हंगामात सोयाबीनला ६ हजार ९४५ रुपये क्विंटलला दर द्यावा अशी मागणी आज भारतीय किसान संघाच्या वतीने करण्यात आली आहे.

याबाबत बुधवारी दि. ११ सप्टेंबर रोजी भारतीय किसान संघच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. ज्यात म्हटले आहे की, बाजारात यावर्षी सोयाबीन खरेदीदारानी संघटीत प्रयत्नातुन दरावर नियंत्रण ठेवुन दर साडेचार हजारच्या वर जावू दिले नाहीत. अश्या परिस्थितीत जर शेतकऱ्याला उत्पादन खर्चावर लाभकारी किंमत मिळत नसेल तर राज्य सरकारने भावांतर पद्धतीने किंवा बोनसच्या माध्यमातून फरक देण्याची व्यवस्था करावी. लाडक्या बहिणीचा विचार केलात तसा लाडक्या शेतकरी दादाचा पण निश्चित विचार करून वरील निर्णय घोशित कराल अशी आशा असल्याचे म्हटले आहे. निवेदनावर जिल्हाध्यक्ष नितीन घुले, जिल्हा उपाध्यक्ष भागवत माळी, तुळजापूर तालुकाध्यक्ष अभिजित पांढरे, कळंब तालुकाध्यक्ष गणेश अडसूळ, लोहारा तालुकाध्यक्ष काशीनाथ लकडे, बिपीन घुले, प्रशांत संडसे, विकास लंगडे, आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना : खाजगी आस्थापनांना केंद्र शासनाचे नोंदणी प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार

## खाजगी आस्थापनांनी सहभागी होण्याचे जिल्हाधिकारी डॉ.ओंबासे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ सप्टेंबर -**

राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार मिळण्याची क्षमता वाढविण्याकरीता मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेच्या अंम लबजावणीबाबत विविध क्षेत्रीय कार्यालयांना निदर्शनास आलेल्या अडचणी दूर करण्यासह योजनेचा व्यापक होण्याच्या दृष्टीने अतिरिक्त सूचना देण्यात आल्या आहेत.

आता केंद्र शासनाकडे नोंदणी केलेले आस्थापनासाठीचे कोणतेही नोंदणी प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार आहे. या योजनेत खाजगी आस्थापनांनी सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

या योजनेत सहभागी होण्यासाठी खाजगी आस्थापनांनी विभागाच्या ु.ेक्षसरी.ारहीुूरा. सीें.ळप या संकेतस्थळावर नोंदणी करताना EPF, ESIC,GST,DPIIT, Certificate of Incorporation, केंद्र शासनाचे उद्योग आधार यांच्याकडील नोंदणी प्रमाणपत्र यापैकी कोणतेही एक प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार आहे. कोणतेही एक प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक आहे.

योजनेंतर्गत उत्पादन (Manufacturing) क्षेत्रातील खाजगी आस्थापना /उद्योजकांना एकूण कार्यरत मनुष्यबळाच्या १० टक्के व सेवा (ड्ढर्शीीळलश) क्षेत्रातील खाजगी आस्थापना/ उद्योजकांना एकूण कार्यरत मनुष्यबळाच्या २० टक्के इतके उमेदवार कार्य प्रशिक्षणासाठी रुजू करुन घेता येणार आहेत.

उद्योग आधार/उद्योग उद्यम यांच्याकडे नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म, लघु व म ध्यम उपक्रमांतील (MSME) आस्थापनांना खालील प्रमाणात उमेदवार कार्य प्रशिक्षणासाठी रुजू करुन घेता येणार आहे.तसेच या योजनसाठी सुधारीत वाढीव उद्दीष्ट जिल्हयासाठी देण्यात आलेले आहे.

जिल्हयात या योजनेची प्रभावी अंम लबजावणी होण्यासाठी खालीलप्रमाणे संनियंत्रण अधिकारी नेमण्यात आले आहे.

ग्रामीण भागासाठी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना तर शहरी भागासाठी नगरपालिकांचे मुख्याधिकारी यांची संनियंत्रण अधिकारी म्हणून निवड करण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थी उमेदवारांना आता सुयोग्य विमाछत्र प्रदान करण्यात येणार आहे.

त्याबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येणार आहेत.केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय/ निमशासकीय आस्थापना/उद्योग/महामंडळे/ स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत वगळून) यांना त्यांच्या मंजूर पदांच्या ५ टक्के इतके उमेदवार या योजनेंतर्गत कार्य प्रशिक्षणासाठी रुजू करुन घेता येतील.

तसेच, मंजूर पदसंख्या २० पेक्षा कमी असलेल्या शासकीय/ निमशासकीय आस्थापनांमध्ये व ग्रामपंचायत कार्यालयात तसेच सहकार विभागाने निवड केलेल्या सक्षम प्राथमिक कृषि सहकारी सोसायटी (Primary griculture Cooperative Society-P-CS ) कार्यालयात प्रत्येकी एक उमेदवार प्रस्तुत योजनेंतर्गत कार्य प्रशिक्षणासाठी रुजू करुन घेता येणार आहे.

या योजनेत सर्व आस्थापनांनी आणि रोजगारक्षम प्रशिक्षणार्थी यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा.असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी केले आहे.

# पोलिस काका, पोलिस दिदी' विद्यार्थ्यांना करणार मदत

## विद्यार्थ्यीनींना त्रास देत असणाऱ्यांबाबत तक्रार करण्याचे पोलिस निरीक्षक अश्विनी भोसले यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.११ सप्टेंबर -**



उमरगा पोलीस स्थानक अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक शाळा-महाविद्यालयातील मुलींच्या रक्षणासाठी त्या त्या हद्दीतील पोलिस ठाण्यातील दोन पोलिस कर्मचाऱ्यांकडे पालकत्व देण्यात आले आहे. त्यानुसार शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनींना होणारा त्रास तसेच त्यांना माहिती पडणाऱ्या कुठल्याही प्रकारच्या गुन्ह्यांबाबत आता पोलीस काका व दीदी याकडे विशेष लक्ष देणार आहेत.

> विद्यार्थ्यांना पोलिस आणि शालेय विद्यार्थ्यांचा सुसंवाद वाढविण्याच्या दृष्टीने वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस काका, पोलिस दीदी या उपक्रमाअंतर्गत उमरगा पोलिस ठाण्याच्या काही कर्मचाऱ्यांवर, त्या त्या शहरासह ग्रामीण भागातील शाळा- महाविद्यालयांची जबाबदारी दिली आहे. त्यांचेही क्रमांक शाळांमध्ये देण्यात आले आहेत. अनुचित घटनेबद्दल तत्काळ माहितीशालेय परिसरात किंवा इतरत्र अनुचित प्रकार घडत असेल किंवा विद्यार्थिनींची कोणी छेड काढत असेल तर निर्भयपणे या घटनेबाबत पोलिसांना माहिती द्यावी.
>
> **-अश्विनी भोसले, पोलीस निरीक्षक, उमरगा**

पोलीस अधीक्षक यांनी म हिला व लहान मुलीवर होणाऱ्या अत्याचाराबाबत काही सूचना दिला होत्या.

त्यानुसार पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले यांनी पोलीस काका, पोलीस दीदी, या उपक्रमाचे नियोजन केले आहे.

पोलीस काका व दीदी उपक्रमाअतर्गत प्रत्येक शाळेत एक पोलीस पुरुष कर्मचारी म्हणजेच पोलीस काका आणि महिला कर्मचारी म्हणजेच पोलीस दिदी अशी दोघांची नियुक्ती करण्यात आली आहे. हे दोन्ही पोलीस अधिकारी नेहमी शाळेच्या आणि विद्यार्थ्यांच्या संपर्कात राहणार आहेत.

शाळांमधील अल्पवयीन मुली, महाविद्यालयातील युवतींना कोणीतरी छेड काढली किंवा कोणी त्रास देत असल्यास त्यावेळी पोलीस काका व दीदी यांना माहिती देण्यात यावी.

याशिवाय कोणत्याही व्यक्तीला विशेषत: मुलीला, महिलेला काही अडचण आली आणि त्यांना तातडीने पोलिसांची मदत हवी असल्यास त्यांनी '११२' या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा असे पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले यांनी सांगितले.

# कदेर उपकेंद्रात प्रौढ बीसीजी लसीकरण मोहीम



**तभा वृत्तसेवा**
**कदेर, दि.११ सप्टेंबर -**

उमरगा तालुक्यातील कदेर गावातील उपकेंद्रात प्रौढ बिसीजी लसीकरण मोहीम राबविण्यात आला.या लसीकरणाचा मुख्य हेतू म्हणजे टिबी मुक्त भारत करण्याचा आहे.जो कोणी तंबाखू,सुपारी, सिगारेट, दारू असे व्यसन आहेत त्यांना प्रथम ही लस घ्यावे असे आव्हान केले आहे.

तर अशा प्रौढ व्यक्ती शोधून त्यांना लस देण्याचे काम या मोहिमेचे आहे.

यावेळी गावचे सरपंच सतीश जाधव, तंटामुक्त अध्यक्ष महादेव साखरे, डॉ.बालाजी राजपुत आलुर, महादेव, शिवपुरे घोडके, मडिवाळ, अनिता पाटील, जाधव मिरा, सिस्टर संतोष पवार आवटे यलो, गायकवाड गणेश, सुनिल पाटिल, दयानंद जाधव, भरत कलबुर्गे, सुधिर येवते, गिता कदम, आशा कार्यकार्त्या गावातील महिला आणि गावातिल जेष्ट नागरीक उपस्थित होते.

# सिडकोतील मुख्य रस्त्याच्या दुर्तफा घाणीचे साम्राज्य

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. ११ सप्टेंबर -**

आगामी चालू असलेल्या गणेश उत्सव, महालक्ष्मी, दुर्गा उत्सव, या काळात सिडको हडकोतील मुख्य रस्त्याच्या बाजूने व चौकातील काही बाजूनी केरकचरा व घाणीचे साम्राज्य झाले आहे. त्याकडे मनापाचे स्वच्छता निरीक्षक व अधिकारी यांना वारंवार सांगूनही याकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते.



सिडको हडकोतील मुख्य रस्त्याच्या बाजूने घाणीचे साम्राज्य असल्याचे दिसून येत. सिडको भागातील उस्मान नगर रोड ते हडको बस स्टँड कडे येणारा मुख्य रस्त्याच्या बाजूला ढगे यांच्या दवाखान्याच्या दोन्ही बाजूनी घाणकचरा मोठ्या प्रमाणात आहे तर त्याच मार्गावर समोर छत्रपती उद्यान हाडको येथे ही केरकचरा व घाण साफ होत नाही तर हडको बस स्टॉप येते झाडाच्या फांद्या टाकल्या असून ते उचलण्यासाठी तीन दिवसापासून स्वच्छता निरीक्षक अर्जुन बगाडे यांना सांगूनही त्यांनी उचललेला नाही. तसेच हडको बस स्टॉप ते इंदिरा गांधी हायस्कूल येथे चौरस्त्याच्या बाजूला अतिशय घाण व कचरा झाला आहे तरी ते देखील साफसफाई वाले करत नाही आणि त्यावर कोणताही अधिकारी यांचे नियंत्रण नाही ते त्यांच्या मनमानी कारभार चालवत असतात. मुख्य ठिकाणच्या व मोजक्याच ठिकाणचे ते कचरा भरून नेऊन साफसफाई करत असतात याविषयी नागरिकांनी तक्रार केल्यास त्यांचे कोणी ऐकत नाहीत तुम्हीच घाण करता ते तुम्ही साफ करावी असे उलट सुलट प्रश्न नागरिकांना केले जातात. सदरील सणासुदीच्या काळात सिडको हडको परिसर स्वच्छ ठेवण्यात यावा अशी नागरिकांतून मागणी होत आहे तेव्हा यासाठी मनपाचे आयुक्त महेश कुमार डोईफोडे यांनी सिडको क्षेत्रीय कार्यालय याकडे लक्ष द्यावे अशी मागणी नागरीकांनी केली आहे.

# जिल्ह्यामध्ये ४०० पैक्षा जास्त तांड्याना महसुल दर्जा व २०० पेक्षा जास्त तांडयाना ग्राम पंचायतचा दर्जा मिळणार - भगवान राठोड

**तभा वृत्तसेवा**
**कंधार, दि. ११ सप्टेंबर -**

महाराष्ट्रात गेल्या ७५ वर्षात बंजारा लमान समाजाचा विकास म्हणाव तसा झालेला नाही.अनेक तांडे प्राथमिक व मूलभूत सुविधा पासून वंचित आहेत,त्यांच्या विकासासाठी स्वतंत्र योजना असणे आवश्यक होते. श्री संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृद्धी योजना राज्य शासनाने कार्यान्वित केलेली आहे. त्यामुळे बंजारा समाज विकासाच्या मूळ प्रवाहात येणार असून, येत्या काळात जिल्ह्यामध्ये ४०० पेक्षा जास्त तांड्यांना महसूल दर्जा व २०० पेक्षा जास्त तांड्यांना ग्रामपंचायत दर्जा मिळणार असल्याचे 'संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी'योजनेचे अशासकीय सदस्य भगवान राठोड यांनी सांगितले.



कंधार येथील बीजेपी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत पत्रकारांशी हितगुज करताना ते बोलत होते. बंजारा लमाण/ तांड्यांना स्वतंत्र महसुली गावाचा दर्जा देणे व तांडयांमध्ये स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करून बंजारा समाजाला राजकीय प्रवाहात आणणे गरजेचे होते. यासाठी पुनर्वसित गावांच्या धरतीवर महसुली गावांचा दर्जा देऊन ग्रामपंचायत स्थापन करुन पाणी,वीज,शाळा अंगणवाडी,आरोग्य पदथदिवे, गटारे अंतर्गत रस्ते इत्यादी सोयी सुविधा निर्माण करणे गरजेचे होते.

महाराष्ट्र राज्यात बंजारा लमाण समाजाचे अनेक तांडे असून, अशा तांड्यामध्ये बंजारा समाज अनेक वर्षांपासून राहत असला तरी बंजारा लमाण समाजाच्या प्राथमिक, मूलभूत सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत. त्यासाठी तांड्याच्या विकासात स्वतंत्र योजना असणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊन बंजारा लमाण तांड्यासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करणे व सामूहिक विकासाच्या विविध मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संत सेवालाल महाराज बंजारा लमाणतांडा समृद्धी योजना सुरू करण्यात करण्याची आली असल्याचे त्यांनी सांगितले.

बंजारा लमातांड्याच्या विकासासाठी संत सेवालाल महाराज बंजारा लमाणतांडा स्मृती योजनेअंतर्गत सर्व आवश्यक मूलभूत सुविधा या शासनाच्या प्रचलित मूलभूत सुविधा पुरविण्याच्या धोरणानुसार उपलब्ध करून देण्यात याव्यात असे यावेळी सांगितले. महाराष्ट्रात बंजारा समाजाची लोकसंख्या असलेल्या वस्तीत ताड्यांचा टोच नकाशा तयार करण्याचे काम युद्ध पातळीवर चालू आहे.तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम चार अनुसार महसुली गावाचा दर्जा देण्यासाठी भूमापक क्रमांकाची माहिती तलाठी यांच्याकडून घेण्यात चालू असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.यावेळी भाजप तालुकाध्यक्ष प्राचार्य किशनराव डफडे,तालुका सरचिटणीस मधुकर पाटील डांगे,सतीश कांबळे उपस्थित होते.

## जिल्हा रुग्णालयात जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन साजरा

**नांदेड** -जिल्हा रुग्णालय नांदेड येथे प्रेरणा प्रकल्प शेतकरी समुपदेशन व जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नीलकंठ भोसीकर यांनी शेतकरी आत्महत्या व तरुणांच्या आत्महत्या कशाप्रकारे थांबवता येतील याबाबत मार्गदर्शन केले.

## राष्ट्रवादी काँग्रेसचे पार्टीचे प्रवीण घुले यांच्या प्रयत्नाला यश
# शहरातील अतिवृष्टी भागाचे सर्वेक्षण सुरू

**तभा वृत्तसेव**
**नांदेड, दि. ११ सप्टेंबर -**

नांदेड शहर व जिल्ह्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शहरातील प्रभाग क्रमांक सात व परिसराममधील सखल भागातील नागरी वस्त्यांमधील घरांमध्ये पाणी शिरून मोठे नुकसान झाले होते. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा शहर सरचिटणीस प्रवीण घुले यांनी मदत व पुनर्विकास मंत्री ना. अनिल पाटील यांच्याकडे व राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे पाठपुरावा करून नुकसानग्रस्तांना मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा केला होता. त्यास यश आले असून शहरातील प्रभाग क्रमांक - सात सह सखलभागाचे सर्वेक्षण सुरू केल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केल्या जात आहे.



नांदेड शहर व जिल्ह्यामध्ये दि. ३१ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर दरम्यान मोठी अतिवृष्टी झाली होती. ग्रामीण भागातील हाताला आलेली पिके बाधित झाली. त्याचप्रमाणे शहरातील सखलभाग असलेल्या जयभीमनगर , श्रावस्तीनगर , सीतामाई कॉलनी , तेहरानगर येथील नागरिकांच्या घरामध्ये पाणी शिरून जनजीवन व्यस्त झाले व मोठी आर्थिक हानी झाली होती. या परिसरातील सर्व नागरिक मजूर , कामगार व मागासवर्गीय असल्याने त्यांना हे नुकसान सहन होणे अवघड असल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा शहर सरचिटणिस प्रवीण घुले व संदीप नवघडे यांनी जिल्हाधिकारी तसेच नांदेड येथे मदत पुनर्वसन मंत्री नामदार अनिल पाटील आले असता त्यांच्याशी संवाद साधून याबाबत बाजू मांडून नुकसानग्रस्तांना अनुदान मिळवून देण्याची मागणी केली होती. तसेच प्रवीण घुले यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याशी देखील संवाद साधून लक्ष देण्याचे विनंती केली होती.

प्रवीण घुले यांच्या मागणीला यश आले असून राज्य शासनातर्फे जिल्हातील सखल भागासह शहरातील प्रभाग क्रमांक सात सह इतर नागरी वस्त्यांचे महानगरपालिकेने सर्वेक्षण सुरू केले असून लवकरच या सर्व नागरिकांना सांत्वनपर अनुदान मिळणार असल्याने नागरिकांनी कोणतीही काळजी न करता सर्वेक्षण करणाऱ्यांना सहकार्य करण्याचे आवाहन प्रवीण घुले यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त



### कारला येथील दोन युवकांची पोलीस दलात निवड

**उमरी** -उमरी तालुक्यातील कारला येथील दोन युवकांची पोलीस भरतीमध्ये निवड झाली असून त्यांच्या निवडीमुळे येथील पवळे परिवाराच्या वतीने त्यांचा व वडिलांचा सह नातेवाईकांचा सन्मान करून सत्कार केला आहे. तालुक्यातील कारला येथील मुस्लिम समाजातील दोन युवकांनी मेहनत व जिद्दीच्या बळावर काही करू शकता हे दाखवून देत मोठे परिश्रम घेऊन पोलीस भरतीमध्ये भाग घेतला होता यामध्ये सय्यद मोहसीन सय्यद मोहिनुद्दीन व शेख अलाउद्दीन शेख अमीर या दोन युवकांची पोलीस भरतीमध्ये निवड झाली आहे एकाची ठाणे तर दुसऱ्याची नागपूर येथे निवड झाली आहे त्यांची निवड झाल्यानंतर गावातील सामाजिक कार्यकर्ते मोहनराव पाटील कार्लेकर यांनी त्यांच्या निवासस्थानी बोलावून त्यांचा सत्कार केला व त्याचबरोबर त्यांचा वडिलांचा व नातेवाईकांचाही सत्कार केला आहे यावेळी नियुक्ती झालेल्या दोन्ही युवकांचे नातेवाईक सह पवळे परिवारातील सदस्यांची उपस्थिती होती.

### मुदखेड भाजपा युवा मोर्चाची तालुकास्तरीय संघटनात्मक बैठक



**मुदखेड**-मुदखेड येथील शासकीय विश्राम गृह येथे भाजपा युवा मोर्चाची बैठक नुकतीच संपन्न झाली. या बैठकीचे औचित्य म्हणजे नांदेड जिल्हा उत्तर भाजपच्या युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष पदात तडका फडकी बदल झाल्या नंतर नवंनियुक्त जिल्हाध्यक्ष म्हणून किनवट येथील तेलगू भाषिक असलेले स्वागत आयनेनीवार यांची नियुक्ती करण्यात आली. हे दाईत्व स्वीकारून स्वागत यांनी जिल्हा प्रवासास सुरवात केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून मुदखेड तालुका भाजपा व युवा मोर्चाची तालुकास्तरीय संघटनात्मक बैठक घेण्यात आली. या बैठकीचे नियोजन भाजपा युवा मोर्चा ता.अध्यक्ष सतीश पाटील मुंगल, शहराध्यक्ष गजानन कमळे यांच्या नेतृत्वात करण्यात आले होते. यावेळी भाजपा जिल्हा महामंत्री प्रवीण गायकवाड, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष स्वागत आयनेनीवार,मुदखेड भाजपा ता.अध्यक्ष बालाजी पाटील खटिंग, युमो जिल्हा महामंत्री सुभाष गरडे,भोकर विधानसभा प्रमुख विलास पाटील कल्याने,शहराध्यक्ष संजय सोनटक्के, ता.सरचिटणीस पुरुषोत्तम चांडक, माजी नगरसेवक गोविंद गोपनपल्ले,संजय आऊलवार,ओबीसी जिल्हा उपाध्यक्ष संजय चव्हाण,शहर महामंत्री गोविंद उर्फ कानोबा बिसमिले, बाळू उर्फ प्रभाकर पांचाळ, देवा पाटील धबडगे, युवती ता.अध्यक्ष कोमल जयस्वाल,यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बालाजी खटिंग, सुभाष गरडे, प्रवीण गायकवाड, स्वागत आयनेनीवार यांची संघटनात्मक विषयावर समायोचित भाषणे झाली, कार्यक्रमाचे सूत्र संचालन शहर युमो सरचिटणीस संतोष सावंत यांनी केले तर प्रास्ताविक गजानन कमळे यांनी मांडले आणि आभार कानोबा बिस्मिल्ले यांनी व्यक्त केले. यावेळी उपस्थित मान्यवरांचे हस्ते संघटनात्मक नियुक्ती पत्र देण्यात आले. या बैठकीचे औचित्य साधून युवा मोर्चा शहर उपाध्यक्ष पदी मानव संजय आऊलवार, शैलेश बालाजी बोडके, म.खाजा अ.हमीद, दिनेश संजय सूर्यवंशी यांची निवड करण्यात आली. यावेळी वसंत शिंदे, यु.मो.शहर उपाध्यक्ष शिवा तोटेवाड,शिवा पाटील तरोडेकर, प्रथमेश पडोळे, दिनेश सूर्यवंशी,जांबुवंत मुंगल, निखिल मुंगल, ,भुजंग वडजे यांच्यासह तालुक्यातील व शहरातील शेकडो भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

### १० नोव्हेंबर रोजी 'महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा-२०२४

**नांदेड** -प्राथमिक शिक्षक पदाकरिता फक्त पात्रता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने १० नोव्हेंबर २०२४ रोजी 'महाराष्ट्र शिक्षक पात्रता परिक्षे'चे (च-क-ढएढ) आयोजन करण्यात आले आहे. या परिक्षेसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३० सप्टेंबर २०२४ आहे.

# उमरी मुख्यधिकारी निलम कांबळे यांनी स्वच्छतासाठी हाती घेतला झाडू

**तभा वृत्तसेवा**
**उमरी, दि. ११ सप्टेंबर -**

उमरी शहरातील गणेश मंडळापुढे स्वच्छता राहावी म्हणून प्रथमरित्या मुख्यधिकारी उमरी निलम कांबळे यांनी हाती झाडू घेवून स्वच्छता अभियानाचा निर्धार केला असून श्री हनुमान गणेश मंडळ यांच्या पासुन सुरुवात केली आहे .

शहरातील श्री हनुमान गणेश मंडळ दरवर्षी सामाजिक उपक्रम राबवून गणेशोत्सव साजरा करीत असतात. यंदा ही रितीरिवाजा प्रमाणे सामाजिक उपक्रम घेण्याची परंमपरा कायम ठेवली आहे . उमरी शहर स्वच्छता मध्ये माहेर असुन स्वच्छता अभियानाचा पुरस्कार बक्षीस शासनाकडून देण्यात आले होते .

त्याच अनुषंगाने मुख्यधिकारी निलम कांबळे गणपती मुर्ती स्थापना ते विसर्जन पर्यंत नगर परिषद कडून विशेष शहरातील प्रत्येक श्रीगणेश मंडळा समोर स्वच्छता अभियान राबविण्याचा चंग धरला आणि गणेश मंडळानी स्वच्छता राखावी असा सुचना दिल्या आहेत . दिनांक ९ सप्टेंबर रोजी श्री हनुमान गणेश मंडळा पासून स्वच्छता अभियान सुरुवात करण्यात आले आहे .यावेळी मुख्याधिकारी निलम कांबळे यांनी स्वतः हाती झाडू घेवून साफ सफाई केली आहे . यावेळी माजी नगराध्यक्ष तथा शिवसेना तालुकाप्रमुख शिंदे गटाचे सुभाष दशरथ पेरेवार यांच्या मार्गदर्शनाखाली गणेश मंडळ स्थापन झालेल्या हनुमान मंदिर परिसरात मुख्याधिकारी निलम कांबळे यांच्या नगरपरिषद टिमचे स्वागत सत्कार करण्यात आले यावेळी श्रीहनुमान गणेश मंडळाचे अध्यक्ष साईनाथ अरगुलवार, उपाध्यक्ष , माधव सोळंके , हनुमान गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्याचे वचन दिले आहे . या वेळी नगरपालिका चे वरिष्ट लिपीक गणेश मदने , सवई सह हनुमान गणेश मंडळ ,विनोद वर्मा , संदिप गंगासागर , अशोक लोध, दत्तात्रय अरगुलवार , सुनिल खांडरे , पांडूरंग खांडरे , सुरेश उमाटे , गोपाल लोध , बंटी लोध , दीपक खांडरे , मारोती उमाटे, राजिंदर खिच्ची , गुलाब पाटील , राकेश पेरेवार , साईप्रसाद पेरेवार आदी पदाधिकारी उपस्थित होते .

# किनवट नगरपरिषद अंतर्गत दलित वस्त्यातील प्रलंबित कामे मार्गी लावा अन्यथा आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. ११ सप्टेंबर -**

किनवट नगरपालिका अंतर्गत दलित वस्तीतील विविध पायाभूत विकासाची कामे पंधरा दिवसात मार्गी लावावीत असे निवेदन समस्त आंबेडकरप्रेमी नागरिकांच्या वतीने निखिल कावळे यांनी किनवट नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना दिले असून पंधरा दिवसात मागण्याची पूर्तता झाली नाही तर लोकशाही मार्गाने वेगवेगळ्या स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा दिला आहे.

किनवट शहरातील विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरातील अतिक्रमनाबाबत मागील दहा वर्षापासून किनवट नगर परिषदेला निवेदने तक्रारी सादर करण्यात येत आहेत पण त्याची कुठल्याही प्रकारे दखल घेतली जात नाही महात्मा फुले चौक व जेथून बुद्ध विहार सिद्धार्थ नगर या वस्त्यातील हायमास लाईट कित्येक दिवसापासून बंद अवस्थेत आहेत. सिद्धार्थनगर व साठे नगर भागातील नागरिकांना घाणीचे साम्राज्य असलेल्या बोरवेलमधून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात आहे.महात्मा फुले चौक ते बाबूलाल रेडिओरोड पर्यंत दलित वस्तीअंतर्गत पेवरब्लॉकचे काम अर्धवट अवस्थेत आहे. प्रलंबित कामे मार्गी लावण्यासंदर्भात नागरिकाकडून सातत्याने पाठपुरावा केला जात आहे मात्र प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे असा आरोप निखिल कावळे यांनी केला आहे.शहरातील विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरातील अतिक्रम तात्काळ हटून पुतळ्याचे सुशोभीकरण करावे, दलित वस्त्यातील बंद असलेले हायमास त्वरित सुरू करावेत,आठवडी बाजारातील बोरवेल परिसराची त्वरित स्वच्छता करून त्या ठिकाणी संरक्षणभिंत व लोखंडी दरवाजा बसविण्यात यावा व पेवर ब्लॉकचे अर्धवट काम तात्काळ पूर्ण करावे अशा मागण्या निवेदनात केल्या असून पंधरा दिवसात या मागण्यांची पूर्तता झाली नाही तर नगरपालिका प्रशासनाविरोधात लोकशाही मार्गाने वेगवेगळ्या स्वरूपाचे आंदोलन केले जाईल अशा इशारा दिला आहे. निवेदनावर सम्राट सर्पे,सम्राट कावळे, गौतम पाटील पवन सरपे,आकाश सर्पे, मुन्ना भगत, योगेश भवरे,अल्फ्रेड ठमके, योगेश भवरे, प्रसन्नजीत कावळे, निखिल सर्पे,सतीश कापसे,दया पाटील,राहुल सोनुले, सुमित कापसे, निखिल नगारे,संघर्ष घुले, कामेश मुनेश्वर स्वप्निल सर्पे,राहुल सर्पे,प्रतिक मुनेश्वर किरण लोखंडे, धम्मानंद, निवेदक कानिंदे आदिच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# कूळ उडवितो म्हणून जमिनच स्वत:च्या नावे केली; शेतकऱ्याची अत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**भोकर, दि. ११ सप्टेंबर -**

तालुक्यातील सावरगाव मेट येथील शेतकरी आरोपीच्या त्रासाला कंटाळून कोंडदेव नगर शिवारात आपल्या शेतातील चारीच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दि.९ नोव्हेंबर रोजी सकाळी सात वाजता उघडकीस आली.

यातील आरोपी विठ्ठल लक्ष्मणा देओड यांनी बाबू किसन कोळपेवाड् यांना तुझ्या जमीनीवरील कुळ उडवतो म्हणून दुय्यम निबंधक कार्यालय भोकर येथे दि.४ मार्च रोजी् बाबु यांच्या् नावे असलेली ५९आर जमीन त्याच्या पत्नी आथवा मुलाला कुठलीही कल्पना न देता विठ्ठल देओड यांनी आपल्या नावे करून घेतली.आणि बाबु कोळपेवाड यांच्यावर्च भोकर पोलीसात खोटी तक्रार केली. वारंवार धमक्या देत असल्याने होणाऱ्या त्रासाला कंटाळून बाबु किशन कोळपेवाड यांनी सोमवार ९ सप्टेंबर रोजी सकाळी सात च्या दरम्यान शेतातील चारीच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली.पत्नी यशोदाबाई यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांत विठ्ठल लसमन्ना देओड,लक्ष्मीबाई विठ्ठल देओड, प्रवीण विठ्ठल देओड यांच्या विरुद्ध कलम १०८,३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक सभषचंद्र मारकड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक सुरेश जाधव करित आहेत.

घटना उघडकीस आल्यानंतर घटनास्थळी नातेवाईकांनी एकच गर्दी करून जोपर्यंत आरोपी अटक होत नाही तोपर्यंत प्रेत ताब्यात घेत नाही असा पवित्रा घेतल्यामुळे तणाव निर्माण झाला होता. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिस अधीक्षक खंडेराय धरणे यांनी घटनास्थळी भेट देऊन नातेवाईकांची समजूत काढल्याने प्रकरण निवळले.

# राजेश पावडे यांच्या वतीने नाभिक समाज बांधवांना घड्याळ वाटप

**तभा वृत्तसेव**
**नांदेड, दि. ११ सप्टेंबर -**

उत्तर विधानसभा मतदारसंघात सातत्याने विविध उपक्रम राबविणारे जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष राजेश पावडे यांनी नाभिक समाज बांधवांना त्यांच्या प्रतिष्ठानासाठी घड्याळ वाटपाचा उपक्रम हाती घेतला आहे. दरम्यान महाराष्ट्र नाभिक समाज संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत राजेश पावडे यांनी घड्याळ वाटप उपक्रमाची नुकतीच सुरुवात केली आहे.

नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघात विविध समाज उपयोगी आणि समस्यांकडे लक्ष वेधण्याचे उपक्रम राबविण्यासाठी जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष राजेश पावडे हे परिचित आहेत. दरम्यान मतदारसंघातील नाभिक समाज बांधवांच्या प्रतिष्ठानासाठी, राजेश पावडे यांनी घड्याळाचे वाटप हा उपक्रम हाती घेतला आहे. महाराष्ट्र नाभिक समाज संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत या उपक्रमाची नुकतीच सुरुवात करण्यात आली.

# माहूर येथे सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन ; विजेत्यांना आकर्षक पारितोषिकांची लुट

**तभा वृत्तसेवा**
**माहुर, दि. ११ सप्टेंबर -**

श्री सुवर्णकार गणेश मंडळ, माहूरच्यावतीने 'सामान्य ज्ञान व चालु घडामोडी' या विषयावर भव्य सामान्य ज्ञान स्पर्धा शनिवार दिनांक १४ सप्टेंबर रोजी दुपारी ३ ते ४ वा.पर्यंत या १ तासाच्या कालावधीत शहरातील बालाजी मंगलम्, झंपटनाथ मंदिर जवळ आयोजित करण्यात आली आहे.



सदरील सामान्य ज्ञान स्पर्धेत पात्र स्पर्धकांना आपल्या तल्लख आणि चाणाक्ष अशा असामान्य बुद्धिमत्तेची क्षमता सिद्ध करण्यासाठी आयोजकांनी दंडक घालून दिलेल्या नियमानुसार पंचांच्या कसोटीवर खरे उतरुन आपल्या कुशाग्र बुद्धीचे अभ्यासकांसमोर प्रदर्शन करण्याची संधी यानिमित्ताने प्राप्त होणार आहे. स्पर्धेत सर्वसामान्यांसह आर्थिक दृष्ट्या दुर्बल अशा सर्व पात्र लाभार्थ्यांना सहभागी होता यावे म्हणून आयोजकाकडून स्पर्धा प्रवेश फी ही नाममात्र १० रुपये इतकीच ठेवण्यात आलेली आहे.

स्पर्धेत यशस्वी झालेल्यांपैकी पंचांमार्फत निवड करण्यात आलेल्या गुणानुक्रमे अव्वल आलेल्या तिघांना प्रथम पारितोषिक हे रू.५,००१ द्वितीय पारितोषिक रू.३,००१ व तृतीय पारितोषिक म्हणून रू.२,००१ अशी आकर्षक रकमेची लुट आयोजकांकडून ठेवण्यात आलेली आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शैक्षणिक पात्रता ही इयत्ता ७ वी ते १२ वी उत्तीर्ण अशी ठेवण्यात आलेली आहे.तसेच मागील वर्षाची गुणपत्रिका, स्पर्धकांचे आधार कार्ड व चालू मोबाईल क्रमांक इत्यादी आवश्यक कागदपत्रे स्पर्धेत सहभागी होण्यासाठी स्पर्धकांना नाव नोंदणी करताना आयोजकाकडे सादर करावी लागणार आहेत.

सदरील 'सामान्य ज्ञान व चालु घडामोडी' या सामान्य ज्ञान स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पुढीलप्रमाणे नियम व अटी ठेवण्यात आलेल्या आहेत.

पंचाचा निर्णय अंतिम राहणार आहे,परिक्षा बहुपर्यायी प्रश्न स्वरूपात असेल,समान गुण मिळाल्यास वयाने कमी असलेल्या स्पर्धकास प्राधान्य देण्यात येईल,परिक्षेत कुठलाही बदल करावयाचा असल्यास मंडळाचा निर्णय अंतीम असणार आहे,त्याचप्रमाणे परिक्षेत मोबाईल अथवा तत्सम कुठलेही साधने वापरता येणार नाहीत. या गोष्टीची खबरदारी स्पर्धेत सहभागी होण्याऱ्या स्पर्धकांना घ्यावी लागणार आहे.

स्पर्धेचा बक्षिस वितरण कार्यक्रम मंगळवार दि.१७ सप्टेंबर अनंत चतुर्दशी सार्वजनिक गणेश विसर्जन रोजी सायं.६ वा.शहराच्या मुख्यबाजारपेठेतील सराफा लाईन येथे आयोजित करण्यात आला आहे. स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी स्पर्धकांनी नाव नोंदणी करण्यासाठी शिवम संतोष सावळकर मो.क्र.९६२३४२४९१६, हर्ष गजानन शेवाळकर मो.क्र.८२६५०२४००५ गणेश सुभाष गायकवाड मो.क्र.८५५०९२६७२७ यांच्याशी आवश्यक कागदपत्रांसह संपर्क साधण्याचे आवाहन अध्यक्ष सुनील विलास गजांकुशकर, आयोजक श्री सुवर्णकार गणेश मंडळ,सराफा लाईन,माहूर यांनी केले आहे.